पुणे, मंगळवार, ३ जुन २०२५ · RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 185 · वर्ष ४ थे, अंक १८५ · किंमत ₹ ६ · पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




'गृहकलहाला' मृत्युपत्राच्या वादाची 'फोडणी'...!

P३



पंजाब ११ वर्षांनी फायनलमध्ये

१२

## At a Glance

### मेहबूबा मुफ्ती यांनी घेतली राज्यपालांची भेट

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या (पीडीपी) प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांनी सोमवारी पाच वर्षांत पहिल्यांदाच नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेतली. मी काश्मिरी पंडितांच्या परतीची मागणी राज्यपालांकडे केली आहे असे या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले. मेहबूबा मुफ्ती म्हणाल्या की

» पान ७ वर

### कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे आदेश

**नवी दिल्ली :** ग्रेटर नोएडा प्राधिकरणाच्या जल विभागाच्या आउटसोर्सिंग कंत्राटी पंप ऑपरेटर्सना अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. उच्च न्यायालयाने ९३ आउटसोर्सिंग कर्मचाऱ्यांना चार महिन्यांत नियमित करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, ज्या २३ आउटसोर्सिंग कर्मचाऱ्यांची सेवा रद्द करण्यात आली होती त्यांना तीन

» पान ७ वर

# हुंडा बंद, दोनशे लोकांत लग्न

## मराठा समाजाची आचारसंहिता जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अहिल्यानगर :** पुण्यातील वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. शाही विवाह सोहळे, हुंडा, मानपान, लग्नातले दिखावे याची जोरदार चर्चा सुरू झाली. मराठा समाजाने लग्न समारंभांसाठी नवीन आचारसंहिता लागू केली आहे. नगरमध्ये त्यासाठी विशेष बैठक बोलवण्यात आली होती. ह. भ. प. बद्रीनाथ महाराज तनपुरे, ह. भ. प. जंगले महाराज शास्त्री, पद्मश्री पोपटराव पवार, माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, सकल मराठा समाजाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत गाडे यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर या बैठकीसाठी उपस्थित होते.

वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर खडबडून जागे झालेल्या मराठा समाजामधील लोकांनी अहिल्यानगरात बैठक घेत कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. लग्न साध्या पद्धतीने आणि १०० ते २०० लोकांमध्ये करा, हुंडा प्रथा बंद करा, प्रिवेडींग शूट बंद, यासारखे नियम आचारसंहितेत ठरवण्यात आले आहे. या आचारसंहितेचं पालन करणा-या पालकांचा समाजातर्फे जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी ११ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मराठा समाजातील लग्न समारंभ साधे, कमी खर्चाचे आणि सामाजिक मूल्यांना प्रोत्साहन देणारे असावेत, असा या निर्णयामागील उद्देश आहे. या नियमांचे पालन न केल्यास सामाजिक बहिष्काराची कारवाई होऊ शकते, असे समितीने स्पष्ट केले आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडेल आणि आर्थिक ताण कमी होईल. या आचारसंहितेला सर्व स्तरांतून पाठिंबा मिळत आहे.

### आचारसंहितामध्ये ठरलेले मुद्दे

- मराठा समाजाने मुला-मुलींचा लग्न सोहळा १०० ते २०० अशा मर्यादित निमंत्रितांमध्येच केला जावा.
- काही लोक दुपारी लग्न विधी करतात आणि सायंकाळी पुन्हा एकदा मंगलाष्टक, जेवणावळी करतात. त्या ऐवजी संध्याकाळी फक्त स्वागत समारंभ ठेवावा. म्हणजे नातेवाईक, स्नेही त्यांच्या वेळेप्रमाणे येऊन भेट घेऊन जेवण करून जातील.
- डीजे ऐवजी पारंपरिक वाद्य आणि लोक कलावंताचा वापर करावा.
- प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये, कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे.
- नवरा-नवरीला हार घालताना वर उचलून घेऊ नये, कर्ज काढून लगात खर्च करू नये.
- नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणा-या तरुण-तरुणींना पायबंद घालावा.
- लग्नात फक्त वधूपिता आणि वरपिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे व इतर सत्कार बंद करावेत.
- लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात साड्या, भेटवस्तू देऊ नयेत. त्या ऐवजी पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.
- भांडी, फर्निचर (रुखवत) देण्याऐवजी रोख रक्कम वधूच्या नाणे बँकेत डिपॉझिट करावी.
- लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये. लग्नात हुंडा देऊ, घेऊ नये. खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी.

» पान ७ वर

# शेतकरी आक्रमक; लिलाव पाडले बंद

## टोमॅटो उत्पादकांचे अडीच कोटी थकवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतमध्ये टोमॅटो उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतक-यांनी कांद्याचे लिलाव बंद पाडले आहेत. कांदा लिलाव बंद पाडत शेतक-यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. गेल्या दीड तासांपासून कांदा लिलाव ठप्प आहेत. गेल्या सात महिन्यापासून व्यापा-यांनी टोमॅटो उत्पादकांचे अडीच कोटी रुपये थकल्याने टोमॅटो उत्पादक शेतकरी संतप्त झाले आहेत.

बाजार समिती प्रशासनाच्या विरोधात यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणा दिल्या आहेत. पैसे भेटत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार केल्याने तणाव निर्माण झाला आहे. सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडले आहेत. कारण त्यांचे मोठ्या प्रमाणात पैसे व्यापा-यांनी थकवले आहेत. यामुळे आज नाशिकच्या पिंपळगाव बसवंत बाजार समितीमध्ये टोमॅटो उत्पदक शेतकरी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. शेतक-यांनी थेट कांद्याचे लिलाव बंद पाडलेआहेत. तसेच लिलाव बंद पाडल्यानंतर शेतक-यांनी ठिय्या आंदोलन देखील सुरु केले आहे.

### टोमॅटो आणि कांद्याची आवक

- नाशिकच्या पिंपळगाव बसवंतमध्ये मोठ्या प्रमाणात टोमॅटो आणि कांद्याची आवक येत असते. दरम्यान, वापा-यांनी टोमॅटोची खरेदी करुन देखील पैसे दिले नसल्यानं शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव बसवंत या बाजार समितीच्या अंतर्गत व्यापा-यांना टोमॅटोची खरेदी केली होती. मात्र, त्यांनी शेतक-यांची तब्बल अडीच कोटी रुपयांची देणी थकवली आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, आंदोलन सुरु झाल्यावर व्यापारी काही निर्णय घेतात का हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

# निवडणुकांचे बिगुल लवकरच?

## निवडणूक आयोगाकडून राज्य सरकारला महत्वाचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठी माहिती समोर आली असून, राज्य निवडणूक आयोगाने राज्य सरकारला प्रभाग रचनेसंबंधी सूचना दिल्या आहेत. या सूचनांनुसार, आगामी निवडणुकींच्या तयारीला वेग आला असून, लवकरच निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपंचायतींच्या निवडणुका गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्या आहेत. या निवडणुकांसाठी चार आठवड्यांमध्ये प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते. कोर्टाच्या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने त्या दिशेने पावले टाकण्यास सुरूवात देखील केली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचनेसाठी राज्य सरकारला सूचना करण्यात आली आहे. त्यानंतर आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू होईल.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. निवडणुकींच्या तारखा आणि इतर तपशील लवकरच जाहीर होण्याची अपेक्षा आहे.

सर्वोच्च न्यायालयाने मागच्या महिन्यात राज्य सरकारला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. तसेच ४ आठवड्यात आधीसूचना जारी करण्यासही सांगितले होते. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोगाने प्रक्रिया करण्यास सुरूवात केली आहे. प्रभाग रचनेचे अधिकार महाविकास आघाडीच्या काळात सरकारने स्वत:कडे घेतले होते. आता प्रभाग रचना पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत.

भाजप, शिवसेनेकडून निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरु केली असून भाजप स्वबळावर लढणार असल्याच्या चर्चाही सुरु झाल्या आहेत. दुसरीकडे शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे मुंबई पालिका निवडणुकीत १०० जागांची मागणी केल्याचेही बोलले जात आहे.

### सुकमामध्ये १६ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सुकमा :** छत्तीसगडमध्ये नक्षलवादाच्या विरोधात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. नक्षलवादाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणा-या सुकमामध्ये १६ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. यामध्ये २ कट्टर नक्षलवाद्यांचा समावेश आहे. यातील ६ नक्षलवाद्यांवर २५ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. याशिवाय, एका महिला आणि एका पुरूष माओवाद्यावर प्रत्येकी ८ लाख रुपयांचे बक्षीसही होते.

सुकमामध्ये पोलिसांसमोर आत्मसमर्पण करणा-या १६ माओवाद्यांमध्ये अनेक भयानक नक्षलवादी आहेत, त्यांच्याविरोधात अनेक मोठे गुन्हे दाखल आहेत. सर्व नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण धोरण आणि नियाद नेल्ला नर योजनेअंतर्गत आत्मसमर्पण

» पान ७ वर

# 'नागपूर-मुंबई' सुस्साट!

## समृद्धी महामार्गातील अखेरच्या टप्प्याचे ५ तारखेला लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महाराष्ट्र दिनाच्या दिवशी (१ मे) ला समृद्धी महामार्गाच्या तिस-या व अखेरच्या टप्प्याच्या लोकार्पणाचा मुहूर्त ठरला होता. पण महाराष्ट्र दिनी समृद्धी महामार्गाचे लोकार्पण झाले नाही. काही कारणास्तव लोकार्पणाचा मुहूर्त पुढे ढकलण्यात आला होता. मात्र आता हा मुहूर्त ठरला असून महामार्गावरील अखेरच्या टप्प्यातील इगतपुरी ते आमणे ७६ किलोमीटरचे लोकार्पण येत्या गुरुवारी (ता. ५ जून ) सकाळी अकरा वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी येथे होणार आहे.

यासंदर्भात 'एमएसआरडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांन यामुळे नाशिककरांना आता समृद्धी महामार्गावरून मुंबईकडे प्रवास करता येणार आहे. नाशिक-मुंबई हा प्रवास आता अवघ्या तीन तासांतच होणार आहे. तर मुंबई नागपूर अंतर आठ तासांत गाठता येईल. समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून मुंबई व नागपूर ही दोन मोठी शहरे जोडली गेली असून त्याचे अनेक फायदे होणार आहेत. शिवाय स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तिस-या टप्प्याचे उद्घाटन होत असल्याने महाराष्ट्रासाठी ही आनंदाची गोष्ट आहे. समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या पहिल्या ५२० किमी टप्प्याचे लोकार्पण हे ११ डिसेंबर २०२२ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर शिर्डी ते भरवीर या ८० किमीच्या टप्प्याचे लोकार्पण २६ मे २०२३ ला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले होते. आता समृद्धी महामार्गाच्या तिस-या व शेवटच्या इगतपुरी ते आमणे ७६ किलोमीटरच्या टप्प्याचे लोकार्पण ५ जून ला मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते होणार आहे.

समृद्धी महामार्गाचा ६२५ किलोमीटरचा महामार्ग यापूर्वीच खुला झालेला आहे. मात्र शेवटच्या इगतपुरी ते आमणे या ७६ किलोमीटरच्या टप्प्याचे काम पूर्ण होऊनही शासकीय पातळीवरून विलंब झाला होता. हे उद्घाटन पीएम नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार की सीएम देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते याचीही चर्चा रंगली होती. अशातच १ मे ला पंतप्रधान मुंबईत होते. त्यामुळे त्यांच्या हस्ते उद्घाटनाचे नियोजन होते. मात्र तरीही समृद्धी महामार्गाचे लोकार्पण पुढे ढकलण्यात आल्याने विविध चर्चा रंगल्या

» पान ७ वर

### चंद्रकांतदादांकडून नवनियुक्त आयुक्तांचे अभिनंदन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेचे ३८ वे आयुक्त म्हणून नवलकिशोर राम यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. त्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. महापालिका क्षेत्राच्या सर्वसमावेशक विकासासोसाठी सकारात्मक धोरण ठेवण्याबाबत सूचित केले.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी., ओमप्रकाश दिवटे, भाजप पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, आ. भीमराव तापकीर, हेमंत रासने, माजी नगरसेवक गणेश बिडकर, श्रीनाथ भिमाले, राजू शिळीमकर, वर्षाताई तापकीर, दीपक पोटे, गणेश कळमकर, प्रमोद कोंढरे, राहुल भंडारे, रविंद्र साळेगावकर, महेश पुंडे, सुभाष जंगले आदी उपस्थित होते.

## अभिनंदन आणि शुभेच्छा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** पुणे महापालिकेचे ३८ वे आयुक्त म्हणून नवलकिशोर राम यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. त्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

### तृणमूल काँग्रेसचा अमित शहांवर पलटवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या टीकेवरून तृणमूल कॉंग्रेसने त्यांच्यावर जोरदार पलटवार केला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील त्या पक्षाने शहा यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली. शहा यांनी रविवारी बंगालचा दौरा केला. त्यावेळी त्यांनी ममता आणि तृणमूलवर टीकेची झोड उठवली. तृणमूल सरकार अवैध घुसखोरीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप त्यांनी केला. शहा यांच्या टीकेचा समाचार घेण्यासाठी तृणमूलच्या प्रमुख महिला नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली. सीमेपलिकडून होणारी घुसखोरी रोखण्याची जबाबदारी सीमा सुरक्षा दलावर (बीएसएफ) आहे. ते दल शहांच्या अखत्यारीत कार्य करते. घुसखोरी

» पान ७ वर

# भारतात जी-२० तर पाकिस्तानात टी-२०

## प्रियंका चतुर्वेदी यांची पाकवर घणाघाती टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत एक मोठा प्रयत्न सुरू केला असून, त्या पार्श्वभूमीवर हे प्रतिनिधीमंडळ ३३ जागतिक राजधानी शहरांना भेट देत आहे. लंडनमध्ये गेलेल्या शिष्टमंडळातील उबाठाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पाकिस्तानवर घणाघाती टीका केली.

भारत जी-२० चे यशस्वी अध्यक्षपद सांभाळतो, तर पाकिस्तान टी-२० म्हणजे टॉप २० दहशतवाद्यांचे आयोजन करतो, असे त्या म्हणाल्या. त्या भारताच्या दहशतवादविरोधी संदेशासोबत एक सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळाचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे मत मांडत आहेत.

प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या, आम्ही जी-२० चे अध्यक्षस्थान अतिशय यशस्वीरित्या पार पाडले. एक वर्षभर चाललेल्या या अध्यक्षपदात भारताने अनेक आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर नेतृत्व केले. पण जिथे आम्ही

» पान ७ वर

# मुंबई पालिकेकडून तुर्की कंपनीचे कंत्राट रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून चौपाट्यांवर बुडणाऱ्यांना वाचवण्यासाठी तुर्कीच्या कंपनीकडून उत्पादित रोबोटिक बचाव यंत्र (रोबोटिक वॉटर रेस्क्यू मशिन) तैनात केले जाणार होते. मात्र, भारत-पाक संघर्षादरम्यान पाकला मदत करणाऱ्या तुर्कीवर अनेक स्तरांवर बहिष्कार टाकण्यात येत असतानाच महापालिकेने घेतलेल्या या निर्णयावर सर्व बाजूंनी टीकेची झोड उठली होती. त्यामुळे उशिरा जाग आलेल्या महापालिकेने या यंत्राचे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबईतील गिरगाव, दादर, जुहू, वर्सोवा, अक्सा आणि गोराई या चौपाट्यांवर सध्या १११ जीवरक्षक तैनात आहेत. या चौपाट्यांवर अनेकदा बुडून मृत्युमुखी पडल्याचे अनेक घटना घडल्या आहेत. यामुळेच जीवरक्षकांच्या जोडीला रोबोटिक बचाव यंत्राची मदत घेण्याचा निर्णय मुंबई अग्निशमन दलाने घेतला होता. सहा रोबोट सहा चौपाट्यांवर तैनात करून ते रिमोट कंट्रोलने हाताळण्यात येणार होते. यासाठी महापालिकेने निविदा मागवल्या होत्या. त्यात दोन कंपन्यानी अर्ज सादर केले होते. निवड झालेली कंपनी स्वित्झर्लंडची असून, तिच्याकडून दोन्ही बाजूंना वॉटर जेट व १० हजार एमएएच क्षमतेच्या रिचार्जेबल बॅटरी असलेले तुर्कीत उत्पादित रोबोटिक

» पान ७ वर

# कोयना धरणात पाण्याची आवक सुरू

## पाणलोट

### 'नवजा' गावात सर्वाधिक पावसाची नोंद

**कोयना धरणात सध्या एकूण २२.७३ (निव्वळ पाणीसाठा १७.६१ टीएमसी) इतकं पाणी आहे. जुलै महिन्याच्या मध्यापर्यंत पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. दमदार पाऊस सुरू झाल्यास धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत जाईल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** कोयना धरणाच्या संदर्भात महत्वाची अपडेट आहे. पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळं धरणात प्रतिसेकंद १३३६ क्युसेक्स पाण्याची आवक सुरू झाली आहे. तसंच चोवीस तासात नवजा इथं सर्वाधिक २६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

मागील आठवड्यात मान्सून पूर्व पावसानं सातारा जिल्ह्याला सलग चार-पाच दिवस झोडपून काढलं होतं. त्यानंतर पावसानं दडी मारली आहे. मात्र, कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कोयना, नवजा आणि महाबळेश्वरमध्ये पावसाची रिपरिप सुरू आहे. पावसामुळं धरणात पाण्याची आवकही सुरू झाली आहे.




कोयना धरणात सध्या एकूण २२.७३ (निव्वळ पाणीसाठा १७.६१ टीएमसी) इतकं पाणी आहे. जुलै महिन्याच्या मध्यापर्यंत पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. दमदार पाऊस सुरू झाल्यास धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत जाईल. तसंच नद्यांची पाणी पातळी वाढल्यानंतर धरणातून पाणी सोडल्यास महापुराचा धोकाही उद्भवू शकतो. त्यामुळं पायथा वीजगृह कार्यान्वित करून कोयना नदीपात्रात पाणी सोडावं लागणार आहे.

सध्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची रिपरिप सुरू आहे. पावसामुळं धरणात प्रतिसेकंद १३३६ क्युसेक्स वेगानं पाण्याची आवक सुरू झाली आहे. कोयनानगरमध्ये २० मिलीमीटर, महाबळेश्वरमध्ये २४ तर नवजात सर्वाधिक २६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. पावसाचा जोर वाढल्यानंतर पाण्याची आवक देखील वाढेल.

### पश्चिमेकडे अखंड वीजनिर्मिती

- कोयना जलविद्युत प्रकल्पातून सध्या अखंड वीजनिर्मिती सुरू आहे. त्यामुळं वीजेचा प्रश्न सुटला आहे. पश्चिमेकडील वीजनिर्मितीचे चारही टप्पे सुरू आहेत. मात्र, धरणाच्या पायथा वीजगृहातील दोन्ही युनिट सध्या बंद आहेत. हे वीजगृह कार्यान्वित केल्यानंतर कोयना नदीपात्रात पाणी सोडलं जातं. संभाव्य पूर परिस्थिती टाळण्यासाठी आता पायथा वीजगृह कार्यान्वित केलं जाऊ शकतं.

#रा



## नणंदेच्या छळास कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**पुणे :** नणंद आणि तिच्या मुलांनी केलेल्या छळामुळे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना धनकवडीत घडली. याप्रकरणी नणंदेसह चौघांविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वर्षा तुकाराम रणदिवे (वय ३५, रा. व्यंकटेश अपार्टमेंटसमोर, गोविंदराव पाटीलनगर, धनकवडी) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी नणंद उज्वला बागाव, भाचा योगेश बागाव (वय ३५), भाची वैशाली बागाव (वय ३२) व भाची सुवर्णा बागाव (वय २५) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पती तुकाराम रणदिवे (वय ५३, रा. धनकवडी) यांनी फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उज्वला बागाव या फिर्यादी तुकाराम रणदिवे यांची बहीण आहे. रणदिवे आणि बागाव शेजारी राहायला आहेत. उज्वला, तिचा मुलगा योगेश, मुलगी वैशाली आणि सुवर्णा यांनी वर्षा यांना टोमणे मारून तिचा छळ केला. छळ असह्य झाल्याने वर्षा यांनी आठ मे रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली.

याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, आरोपींनी केलेल्या छळामुळे वर्षा यांनी आत्महत्या केल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात उघडकीस आले. त्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक विशाल पवार करत आहेत.

## औंध आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पुणे :** दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर एखादा अभ्यासक्रम पूर्ण करून लगेचच नोकरी मिळेल, किंवा एखादा व्यवसाय सुरू करता येईल, अशा तयारीने अनेक विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) प्रवेश घेऊ इच्छितात. परंतु, आपल्या आवडीनुसार किंवा एखाद्या विषयाचे कौशल्य आत्मसात करण्याच्या हेतूने नेमका कोणता आयटीआय अभ्यासक्रम निवडायचा, हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थी-पालक आयटीआयमध्ये समूपदेशनासाठी येत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अशाच पद्धतीने दररोज अनेक पालक विद्यार्थ्यांसह निःशुल्क मार्गदर्शनासाठी येत आहेत. अनेक पालक अभ्यासक्रमांची माहिती घेण्यासाठी येत असून त्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे याविषयीचे मार्गदर्शन आयटीआयमध्ये केले जात आहे. विद्यार्थ्यांचा कल पाहता त्याला योग्य असा अभ्यासक्रम निवडण्यासह शिक्षणानंतर रोजगाराच्या संधी याबाबत सांगितले जात आहे. एवढेच नव्हे, तर विद्यार्थी-पालकांसाठी 'प्रयोगशाळा भेट' आयोजन करून त्यांना प्रत्यक्ष आयटीआयमध्ये प्रात्यक्षिकांवर आधारित कसे शिकविले जाते, याची माहिती दिली जात आहे.

## रायसोनी कॉलेजच्या प्राध्यापकाला पुरस्कार

**पुणे :** स्प्रिंगर नेचरच्यावतीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित जर्नल्समध्ये त्यांच्या उत्कृष्ट संपादकीय योगदानासाठी देण्यात येणारा स्प्रिंगर नेचर एडिटर ऑफ डिस्टिंक्शन अवॉर्ड्स २०२५ हा पुरस्कार जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, पुणे येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. हिमाद्री मुजुमदार यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

डॉ. मुजुमदार यांना स्प्रिंगर नेचर आणि सायंटिफिक रिपोर्ट्स - स्प्रिंगर नेचरच्या छत्राखालील एक SCI इंडेक्स्ड बहुविद्याशाखीय जर्नल द्वारे डिस्कव्हर अप्लाइड सायन्सेस आणि स्कोपस इंडेक्स्ड जर्नल सारख्या प्रतिष्ठित जर्नल्सच्या संपादकीय कार्यासाठी हा सन्मान करण्यात आला आहे. डॉ. मुजुमदार यांची संपादकीय उत्कृष्टता पीअर-रिव्ह्यू केलेल्या संशोधनाचे उच्च मानक राखण्यात आणि विविध वैज्ञानिक शाखांमध्ये नवोपक्रमांना गती देण्यास योगदान दिले आहे.

रायसोनी कॉलेज पुणेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खराडकर म्हणाले की, आम्हाला डॉ. हिमाद्रीच्या कामगिरीचा अभिमान आहे. त्यांचे योगदान केवळ आमच्या संस्थात्मक प्रतिष्ठा उंचावत नाही तर प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता आणि संशोधन सचोटी राखण्यासाठी प्रेरणा देते."

रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी, रायसोनी एज्युकेशनचे कार्यकारी संचालक श्रेयस रायसोनी आणि रायसोनी कॉलेज पुणेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खराडकर यांनी डॉ. मुजुमदार यांचे या यशाबद्दल अभिनंदन केले.

## 'प्रेमाच्या गावा जावे' कार्यक्रम ७ जून रोजी

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत 'शुभांगी मुळे,पुणे' प्रस्तुत 'प्रेमाच्या गावा जावे' हा कार्यक्रम शनिवार,दि.७ जुन रोजी सायंकाळी ५.३० वाजता भारतीय विद्या भवनच्या सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,सेनापती बापट रस्ता येथे आयोजित करण्यात आला आहे.प्रेमाचे विविध रंग उलगडणाऱ्या मनोहारी गीतांचा हा कार्यक्रम आहे.शुभांगी मुळे,हेमंत वाळुंजकर आणि अविनाश सलगरकर हे प्रेमाचे विविध रंग उलगडणाऱ्या लोकप्रिय गीतांचा नजराणा सादर करणार आहेत.जयंत साने(हार्मोनियम),तुषार दीक्षित(सिंथेसायझर),मोहन पारसनीस(तबला),हेमंत पोटफोडे(तालवाद्य) हे कलाकार या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.नीना भेडसगावकर हे या कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

सर्व रसिकांना प्रवेश विनामूल्य असल्याची माहिती भारतीय विद्या भवन पुणे केंद्राचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी दिली.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत प्रस्तुत होणारा हा २४७ वा कार्यक्रम आहे.

## सन्मान खेळाडूंचा...!




पुणे महापालिका क्रिडा विभागाच्या वतीने सुधारीत क्रिडा धोरणानुसार खेळाडूंना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली; त्यासाठी तब्बल ७४३ खेळाडूंनी प्रशासनाकडे अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ३४४ खेळाडूंना या शिष्यवृत्तीच्या निधीचे वाटप नुकतेच खर्च करण्यात आले.

## महापालिकेतर्फे गुणवंत खेळाडूंना शिष्यवृत्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका क्रिडा विभागाच्या वतीने सुधारीत क्रिडा धोरणानुसार खेळाडूंना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली; त्यासाठी तब्बल ७४३ खेळाडूंनी प्रशासनाकडे अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ३४४ खेळाडूंना या शिष्यवृत्तीच्या निधीचे वाटप नुकतेच खर्च करण्यात आले; त्यासाठी ८७ लाख २० हजार रुपयांचा निधी खर्ची टाकण्यात आला. यापुढील कालावधीतही प्रशासनाच्या वतीने गुणवंत खेळाडूंना या निधीचे वाटप करण्यात येइल; असे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे; प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपायुक्त आशा राऊत; मिळकतकर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील, मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे, प्राथमिक शिक्षण विभागाचे क्रिडा अधिकारी माणिक देवकर आदी याप्रसंगी उपस्थित होते. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू सिद्धार्थ कांबळे आणि राष्ट्रीय खेळाडू सुचिता खरवंडीकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपायुक्त किशोरी शिंदे यांनी उपक्रमाची माहिती दिली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश परदेशी यांनी केले.

# अबब...! 'गाळा'तून लाखोंचा 'मलिदा'...!

महापालिका म्हणजे राजकीय नेत्यांसह त्यांचे कार्यकर्ते आणि प्रशासनासाठी भ्रष्टाचाराचे अक्षरशः कुरण बनले आहे; येथील भ्रष्टाचाराच्या माध्यमातून भल्याभल्यांनी आपली पोळी भाजून घेतली आहे. त्यातूनच ते गलेलठ्ठ झाले आहेत; विशेष म्हणजे गेल्या तीन वर्षाहून अधिक काळ महापालिकेत प्रशासकीय राज असल्याने हे कुरण पूर्णपणे मोकळे झाले असून त्यातून अनेकजण मालामाल झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे या 'बड़े बाबू'नी 'गाळात' ही लाखोंचा 'मलिदा' खाल्ला आहे; विशेष म्हणजे शहर सुशोभीकरणाच्या नावाखाली या धेंडानी लाखो रुपयांचा 'घोळ' घातला आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाचा भ्रष्ट आणि गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

> "या कामाची सखोल चौकशी झाली पाहिजे. गाळ जर तलावाबाहेर गेला नव्हता, तर पाटबंधारे खात्याला दिलेले पैसे महापालिकेने परत घ्यावेत. कात्रज तलावापासून सुरू होणाऱ्या आंबिल ओढ्यालाही यामुळे पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. तलावामध्ये साचलेल्या गाळामुळे पाणीप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो,
> **-भारत सुराणा,** शहराध्यक्ष, काँग्रेस व्यापारी सेल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील तलावांचे सुशोभीकरण करण्याच्या उद्देशाने पुणे महापालिकेने महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली होती. याअंतर्गत कात्रज प्राणिसंग्रहालयातील तलावातील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, गाळ उचलून सुरक्षितरीत्या अन्यत्र हलवण्याऐवजी तो तलावाच्या कडेला साठवून ठेवण्यात आला. नियोजनाच्या अभावामुळे आणि वेळेआधी आलेल्या पावसामुळे हा गाळ पुन्हा तलावातच परत गेला आहे. परिणामी, पुणेकरांच्या कररूपी लाखो रुपये गाळातच गेले असून महापालिकेच्या नियोजनशून्य कारभाराची पुन्हा एकदा गंभीर झलक समोर आली आहे.

कात्रज, जांभूळवाडी आणि पाषाण या तीन तलावांच्या सुशोभीकरणासाठी प्रत्येकी ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी कात्रज तलावाच्या कामाची जबाबदारी पाटबंधारे विभागाकडे सोपवण्यात आली. तलाव कोरडा करून, दोन जेसीबी आणि चार डंपरच्या साह्याने सुमारे १०,००० क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला.

या गाळाचा उपयोग तलावामध्ये कृत्रिम बेट उभारण्यासाठी करायचा असल्याचे सांगितले गेले, मात्र बेट मध्यभागी की कडेला उभारायचे याबाबत ठोस निर्णय घेण्यात आलेला नव्हता. त्यातच मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पावसाची हजेरी लागल्याने गाळ पुन्हा तलावात वाहून गेला.

तलावांच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, त्यापैकी १ कोटी रुपये अॅडव्हान्स स्वरूपात पाटबंधारे खात्याला देण्यात आले आहेत. मात्र, महापालिकेच्या आढाव्यानुसार हे काम प्रत्यक्षात १५ कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते. गाळ पुन्हा तलावात गेल्याने, तो पुन्हा काढण्याची जबाबदारी ठेकेदारावरच राहणार असल्याचे ड्रेनेज विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष तांदळे यांनी स्पष्ट केले आहे. कात्रज तलावापासून सुरू होणाऱ्या आंबिल ओढ्यालाही यामुळे पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झाला आहे. तलावामध्ये साचलेल्या गाळामुळे पाणीप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## ट्रॅफिक अॅपद्वारे वाहतूक शिस्तीला चालना



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील वाढती वाहतूक आणि त्यासोबत वाढणारे वाहतूक नियमांचे उल्लंघन लक्षात घेता, पुणे पोलिसांनी वाहतूक व्यवस्थापनात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने, लवकरच 'पुणे ट्रॅफिक अॅप' नावाचे एक विशेष मोबाइल अॅप सुरु करण्यात येणार आहे.

या अॅपद्वारे सामान्य नागरिकांना वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे फोटो आणि माहिती थेट अपलोड करता येणार आहे. नागरिकांच्या तक्रारींची शहानिशा करून संबंधित वाहनचालकांविरुद्ध तात्काळ आणि कठोर कारवाई करण्यात येईल.

विशेष म्हणजे, यासोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित स्मार्ट कॅमेरा प्रणाली शहरात कार्यान्वित केली जाणार आहे. हे कॅमेरे वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवतील आणि त्यांचे वाहन क्रमांक स्वयंचलितपणे नोंदवतील. नियम मोडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वाहनचालकाच्या मोबाईल क्रमांकावर थेट दंडाची (ई-चालान) सूचना पाठवली जाईल.

या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शहरात वाहतुकीला अधिक शिस्तबद्ध बनवणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि नागरिकांच्या सहभागातून सुरक्षित रस्ते संस्कृती घडवणे.

पुणे ट्रॅफिक अॅप लवकरच उपलब्ध होणार असून, शहरातील अनेक नागरिक याच्या लाँचसाठी उत्सुकतेने प्रतीक्षा करत आहेत. या अॅपच्या माध्यमातून पुणेकरांना वाहतूक व्यवस्थापनात थेट सहभाग घेण्याची संधी मिळणार असून, ही एक सकारात्मक आणि डिजिटल दिशा ठरणार आहे.

## अल्पसंख्यांक समाजातर्फे हाजी फिरोज शेख यांचा सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर कार्यकारी अध्यक्षपदी कोंढवा येथील कार्यकर्ते हाजी फिरोज शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे मुस्लिम समाजामध्ये आनंदाचे वातावरण असून मुस्लिम समाजाचे प्रलंबित प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी हक्काचा प्रतिनिधी मिळाला असल्याची भावना निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पुणे शहर कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हाजी फिरोज शेख यांचा अल्पसंख्याक समाजाचे नेते रशिद शेख यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिया ब्रदर्स कम्युनिटीचे खिसाल जाफरी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

हाजी फिरोज हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. सन 2017 च्या मनपा निवडणुकीत त्यांच्या पत्नी परवीन हाजी फिरोज यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मोठ्या मताधिक्याने विजय झाला होता. आमदार चेतन तुपे यांच्या विजयामध्ये देखील हाजी फिरोज यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. महानगरपालिका निवडणुकीत पुन्हा एकदा कोंढवा व उर्वरित भागातून मुस्लिम लोकप्रतिनिधी निवडून आणणे व मुस्लिम समाजाची मते मिळविण्यासाठी ही निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.



पुणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर कार्यकारी अध्यक्षपदी कोंढवा येथील कार्यकर्ते हाजी फिरोज शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानिमित्त त्यांचा अल्पसंख्याक समाजाच्या वतीने माजी नगरसेवक रशीद शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# जागतिक स्तरावर भारतीय निर्यातदारांना वाढत्या संधी -डॉ. सहाय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** "देशाच्या अर्थव्यवस्थेचा आलेख जागतिक पातळीवर सातत्याने उंचावत आहे. तसेच राष्ट्रीय स्तराप्रमाणे जिल्हास्तरावरील वैशिष्ट्यपूर्ण घटकांच्या निर्यातीसाठी विविध योजना आहेत. भारतीय व्यावसायिकांना निर्यातीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत", असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशनचे (एफआयईओ-फिओ) महासंचालक डॉ. अजय सहाय यांनी केले. या पार्श्वभूमीवर उद्योगाभिमुख व विविध निर्यातपूरक योजनांच्या मदतीने निर्यातवाढीच्या संधींचा निर्यातदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.




केंद्रीय वाणिज्य मंत्रालयांतर्गत फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन (एफआयईओ), मिटकॉन पुणे व कॅनरा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक्स्पोर्ट कॉन्क्लेव्ह'चे (निर्यात परिषद) आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत 'एफआयईओ'चे महासंचालक डॉ. अजय सहाय यांनी वाढते निर्यात अर्थकारण, ई-कॉमर्स क्षेत्रातील निर्यात, निर्यात क्षेत्रातील जोखीम तसेच निर्यातीच्या संधी, योजना अशा मुद्यांवर विवेचन केले. याप्रसंगी फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन्स आणि मिटकॉन यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या व कराराचे आदानप्रदान करण्यात आले. तसेच डॉ. अजय सहाय यांच्या हस्ते मिटकॉनच्या पिंपरी-चिंचवड केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. मिटकॉनचे चेअरमन अजय अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक आनंद चलवादे, चंद्रशेखर भोसले, डॉ. गणेश खामगळ, संकेत लोंढे आदी उपस्थित होते.

'डीजीएफटी'चे अमित शर्मा, रिझर्व्ह बँकेच्या विदेशी चलन विनिमय विभागाच्या महासंचालक लता राधाकृष्णन, ईसीजीसीच्या महासंचालक अर्पिता सेन, इंडिया पोस्ट पुणे विभागाचे संचालक अभिजीत बनसोडे, कॅनरा बँकेच्या ट्रेझरी विभागाचे उपसंचालक केजेएस नाईक, मिटकॉनचे व्यवस्थापकीय संचालक आनंद चाळवदे आदी उपस्थित होते. विदेशी व्यापार महासंचालनालय, भारतीय पोस्ट, कॅनरा बँक, मिटकॉन व एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे २०० हून अधिक निर्यातदार, उद्योजक आणि स्टार्टअप प्रतिनिधी परिषदेत सहभागी झाले होते.

> 'निर्यातीच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा घटक होण्याची संधी उद्योजकांसह स्टार्टअपवाल्यांनीही घेतली पाहिजे. त्यांच्यासाठी एफआयईओची प्रादेशिक कार्यालये त्यांना साह्यकारी ठरतील. डिजिटल माध्यमाद्वाराही निर्यातीच्या अनेक संधी आहेत. भारतीय टपाल विभागाच्या अनेक योजना आहेत.
> **— डॉ. अजय सहाय,** महासंचालक; एफआयईओ-फिओ)



## ‘दीपक’ कार्यक्रमाचे ८ जून रोजी आयोजन

**पुणे :** सुप्रसिद्ध कथक नृत्यांगना शीतल कोलवालकर यांच्या कथक नाद या संस्थेच्या वतीने येत्या रविवार दि. ८ जून रोजी मयूर कॉलनी येथील एमईएस बालशिक्षण सभागृहात सायं ५ वाजल्यापासून ‘दीपक - अ सोर्स ऑफ लाईट’ या नृत्यविषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर त्यासाठी प्रवेश देण्यात येईल.

कार्यक्रमाविषयी अधिक माहिती देताना शीतल कोलवालकर म्हणाल्या, “माझ्या आजवरच्या नृत्याच्या प्रवासात माझे वडील दीपक कोलवालकर यांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी कायमच मला प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले.

यावर्षी दीपक या कार्यक्रमाची सुरुवात नवोदित व आश्वासक नर्तिका अन्वी श्री यांच्या कथक सादरीकरणाने होईल. यावेळी वेदांत जोशी (तबला), अमेय बिच्चु (संवादिनी), सुरंजन खंडाळकर (गायन) आणि मुक्ती श्री (पढंत) हे साथसंगत करतील. यानंतर पं हरिप्रसाद चौरासिया यांचे शिष्य असलेले पं रूपक कुलकर्णी यांचे बासरीवादन रंगेल. कुलकर्णी यांना यशवंत वैष्णव हे तबलासाथ करतील. कार्यक्रमाचा समारोप जयपूर अत्रौली घराण्याचे सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं रघुनंदन पणशीकर यांच्या गायनाने होईल. यावेळी त्यांना ऋषिकेश जगताप (तबला) व अमेय बिच्चु (संवादिनी) हे साथसांगत करतील.

## स्नेहल दामले यांना उद्धव कानडे स्मृती पुरस्कार

**पुणे :** रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या उद्धव कानडे स्मृती पुरस्काराने प्रसिद्ध निवेदिका स्नेहल दामले यांचा गौरव केला जाणर आहे.



पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि.८ जून रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन, दुसरा मजला, नवी पेठ येथे होणार आहे. पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार असून साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून यात प्रभा सोनवणे, मृणालिनी कानिटकर-जोशी, तनुजा चव्हाण, स्वप्नील पोरे, स्वाती दाढे, डॉ. मिलिंद शेंडे, चंचल काळे, सचिन हनमघर, विनायक अनिखिंडी, केतकी देशपांडे, सुजाता पवार यांचा सहभाग असणार आहे.

## पीएमपी प्रवासी महिलेची बांगडी चोरी

**पुणे :** पीएमपीने प्रवास करत असलेल्या ज्येष्ठ महिलेच्या हातातील दीड लाखांची सोन्याची बांगडी चोरट्याने चोरून नेली. घटना स्वारगेट परिसरात हा प्रकार घडला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार या स्वारगेट परिसरातील पीएमपी स्थानकात बसमध्ये प्रवेश करत होत्या. गर्दीत चोरट्याने कटरचा वापर करून महिलेच्या हातातील बांगडी कापली.

## खराडीतील महिलेची बारा लाखांची फसवणूक

**पुणे :** घरातून ऑनलाइन पद्धतीने काम करत चांगले पैसे कमवता येतील, असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी खराडी भागातील एका महिलेची १२ लाख ६३ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एका महिलेने खराडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी तक्रारदार महिलेच्या मोबाईल क्रमांकावर संदेश पाठविला होता. ऑनलाइन पद्धतीने काम केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी महिलेला दाखविले होते. सुरुवातीला चोरट्यांनी महिलेला परताव्यापोटी काही रक्कम दिली. त्यामुळे महिलेच्या विश्वास बसला. महिलेला चोरट्यांनी आणखी रक्कम गुंतविण्यास सांगितले. महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी १२ लाख ६३ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक बंद केले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण तपास करत आहेत.

# ‘गृहकलहाला’ मृत्युपत्राच्या वादाची ‘फोडणी’...!

### ज्येष्ठांसाठी नोंदणी विभाग मृत्युपत्रासाठी थेट घरी जाणार : घराघरातील वादाला मिळणार ‘चालना’

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मृत्युपत्रावरून पुढे वाद निर्माण होतात. हे टाळण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने पुढाकार घेतला आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या घरी जाऊन या संदर्भातील मार्गदर्शन करण्याचा तसेच मृत्युपत्र करून देण्याचा राज्यातील पहिलाच प्रयोग पुण्यात सुरु करण्यात आला आहे. मात्र; हा निर्णय घेताना संबधित विभाग घराघरातील वाद आता विकोपाला जाणार असून मृत्युपत्रातील गुप्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. परिणामी हा निर्णय चांगला असला तरीही त्यातून गृहकलहातील वादाला चांगलीच फोडणी मिळणार आहे.

तुमच्यानंतर तुमच्या मालमत्तेवरून कुटुंबात वाद निर्माण होऊ नयेत, अथवा तुम्हाला तुमच्या मर्जीनुसार विल्हेवाट लावयाची असेल, त्यासाठी तुम्ही मुत्युपत्र तयार करू शकता. परंतु ते कसे करावे, ते करताना काय काळजी घ्यावी, या संदर्भातील कायदा काय सांगतो, याची कल्पना अनेकांना नसते. राज्य शासनाच्या शंभर दिवसीय कार्यालयीन सुधारणा उपक्रमात जिल्हा सहनिबंधक वर्ग पुणे शहर कार्यालयाने विविध उपक्रम राबविले होते. साईराम या उपक्रमात ‘रिस्पेक्ट’ (आदर भाव) याअंतर्गत ज्या ज्येष्ठ नागरिकांना ‘मृत्युपत्र’ या विषयावर मार्गदर्शन करण्याचे ठरविले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात मोहम्मदवाडीतील सोनाश्रय वृद्धाश्रमाला जिल्हा सहनिबंधकांनी भेट देऊन तेथे वास्तव्यास असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मृत्युपत्र विषयावर मार्गदर्शन केले. पुढील टप्प्यात ज्येष्ठ नागरिकांना या संदर्भात माहिती हवी असल्यास त्यांच्या घरी जाऊन मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



### गुप्तता पाळली जाणार का?

- नियमानुसार ज्या व्यक्तीला स्वत:चे मृत्युपत्र तयार करायचे असेल त्याला त्याचे सर्वाधिकार असतात; विशेष म्हणजे त्यासाठी पत्नीच्या व्यतिरिक्त कुटुबांतील सदस्यांना त्याची माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक नसते. मात्र; आता नव्या रचनेत नोंदणी कार्यालयाचे अधिकारी ते तयार करण्यासाठी थेट घरी धडकणार असल्याने त्यातून नवे वाद निर्माण होणार असून हे वाद ज्येष्ठांसाठी निश्चितच डोकेदुखी ठरणार आहेत.



### मृत्युपत्र नोंदणीसाठी खर्च किती येतो?

- मृत्युपत्राची नोंदणी करण्यासाठी शासनाने नाममात्र नोंदणी शुल्क (१०० रुपये) निश्चित केलेले आहे. त्याची नोंदणी कोणत्याही दस्तनोंदणी कार्यालयात करता येते. मृत्युपत्राच्या दस्ताची प्रमाणित प्रत निष्पादित करणाऱ्यास त्याच्या हयातीमध्ये केव्हाही ते मिळू शकते. लाभार्थ्याला मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युपश्चात मृत्यू दाखला आणि अन्य आवश्यकत कागदपत्रे सादर केल्यानंतर त्याची प्रमाणित प्रत संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाकडे मिळू शकते. नोंदणीकृत मृत्युपत्र न्यायालयामध्ये आणि अन्य सरकारी कामकाजामध्ये पुरावा म्हणून वापरता येते. त्यामुळे मृत्युपत्राच्या दस्ताची नोंदणी करणे केव्हाही फायदेशीर आहे.

### असे होणार मृत्युपत्र...!

- मृत्युपत्र हे लेखी स्वरूपात असणे आवश्यक आहे.
- ते कोऱ्या कागदावर लिखित स्वरूपात असणे पुरेसे आहे.
- त्याला मुद्रांकशुल्काची आवश्यकता नाही.
- त्याच्या दस्ताची नोंदणी कायद्याने बंधनकारक नाही, ती ऐच्छिक आहे.
- या पत्राची अंमलबजावणी मृत्युपश्चात होत असल्याने मृत्युपत्राचा दस्त सुस्पष्ट लिखित स्वरूपात करून ठेवणे व त्याची रितसर नोंदणी करणे फायद्याचे ठरते.
- मृत्युपत्र नोंदणी करतेवेळी सोबत वैद्यकीय दाखला असणे सोयीचे. त्यातून मृत्युपत्र करणारी व्यक्ती शारीरिक आणि मानसिकरित्या सक्षम आहे, हे सिद्ध होते.
- मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीने या पत्रावर दोन साक्षीदारांसमक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक
- साक्षीदार हे मृत्युपत्राचे लाभार्थी नसावेत व तेही कायद्याने सजाण असावेत. तसेच ते मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीपेक्षा वयाने मोठे नसावेत.
- अर्जाचा नमुना विभागाच्या igrmaharashtra.gov. in या संकेतस्थळावर उपलब्ध
- मृत्युपत्र करणारी व्यक्ती आजारी असली तरी मृत्युपत्र करण्यासाठी मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र आवश्यक
- अर्ज केल्यानंतर दुय्यम निबंधक दोन-तीन दिवसांमधील त्यांच्या सोयीची वेळ देणार
- यासाठी तीनशे रुपये गृहभेट शुल्क आकारे जाते
- गृहभेटीसाठी जाताना व गृहभेट प्रक्रियेचे व्हिडिओ शूटिंग करून त्याची सीडी दुय्यम निबंधक द्यावी
- अधिक माहितीसाठी नोंदणी विभागाच्या सारथी कॉल सेंटर ८८८८००७७७७ कडे संपर्क साधावा

# बस खरेदीला ‘बेस्ट धक्का’...!

### मुंबईच्या ‘बेस्ट’ संस्थेमुळे ‘पीएमपी’ गोत्यात: बसेसची खरेदी रखडली

आर्थिक नुकसान आणि संचलन तुटीचे गोंडस कारण पुढे करत ‘पीएमपीएमएल’ प्रशासनाने १ जूनपासून तिकिट दरात घसघशीत वाढ करत अखेर पुणेकर प्रवाशांच्या खिशावरच डल्ला मारला; हे वास्तव असतानाही पुणेकरांना त्याच त्या आणि खिळखिळया झालेल्या बसेसमधून प्रवास करावा लागत आहे. आश्चर्याची बाब म्हणजे पावसाळयात तर प्रवाशांना बसमध्ये बसूनच ‘रेन सफर’ अनुभवयास मिळत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून पुणेकरांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला होता, त्याची सर्व कार्यवाही ‘पीएमपी’ प्रशासनाने पूर्ण केली होती. मात्र; ‘बेस्ट’ प्रशासनाने वेळेत प्रस्तावच दाखल न केल्याने पीएमपीचा प्रस्तावही ‘लालफितीत’ अडकला आहे.



"पीएमपीला नवीन ई-बस मिळाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्य सरकारकडून अद्याप 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळालेले नाही. या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहोत."
— **मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री



"पीएमपीने वेळेत प्रस्ताव सादर केला असूनही राज्य सरकारने अद्याप NOC दिलेले नाही. राज्याच्या हमीशिवाय केंद्र सरकारकडून बस मिळणे शक्य नाही. त्यासंदर्भात प्रशासनाच्या वतीने शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असून हा प्रकल्प मार्गी लावण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.
— **दीपा मुधोळ मुंडे,** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारच्या ‘पीएम ई-ड्राईव्ह’ योजनेअंतर्गत पुणे आणि मुंबई यांना एकत्रितपणे ई-बसचा लाभ मिळणार होता. मात्र मुंबईतील 'बेस्ट'ने वेळेत प्रस्ताव सादर न केल्यामुळे या योजनेतून पुण्याला मिळणाऱ्या एक हजार ई-बसच्या प्रकल्पाला सध्या ब्रेक लागलेला आहे.

या योजनेअंतर्गत ४० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांना शून्य कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने सार्वजनिक वाहतूक यंत्रणा सुधारण्यासाठी मदत करण्यात येत आहे. केंद्र सरकारने देशभरातील सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनांमुळे होणारे कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्धार केला आहे. सध्या देशातील एकूण कार्बन उत्सर्जनात सार्वजनिक वाहतुकीचा १३ टक्के वाटा आहे. त्यामुळे आगामी पाच वर्षांत हे उत्सर्जन शून्यावर आणण्याचे केंद्राचे धोरण आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल)ने योजनेनुसार १००० ई-बससाठी प्रस्ताव केंद्र सरकारकडे वेळेत सादर केला आहे. हा प्रस्ताव सध्या केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडे प्रक्रियेत आहे. मात्र या बससाठी राज्य सरकारकडून ‘ना हरकत प्रमाणपत्र’ मिळणे आवश्यक आहे. बेस्टने आपला प्रस्ताव विलंबाने सादर केल्यामुळे राज्य सरकारकडून अद्याप पुणे व मुंबई दोघांनाही एनओसी मिळालेले नाही. त्यामुळे पीएमपीच्या प्रस्तावाची अंमलबजावणी रखडली आहे.

पीएमपीच्या सध्याच्या ताफ्यात ४९० ई-बस आहेत. या बस २०१९ मध्ये सेवेत आणल्या गेल्या असून, त्यांचे आयुर्मान २०२९ मध्ये संपेल. दरवर्षी काही बस सेवा समाप्तीच्या टप्प्यावर येत असल्याने नवीन ई-बस लवकरात लवकर ताफ्यात दाखल होणे आवश्यक आहे. अन्यथा नागरिकांना वाढती गर्दी व सेवा अडथळ्यांचा सामना करावा लागणार आहे.

एकीकडे पर्यावरणपूरक वाहतूक सुविधांसाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असताना, दुसरीकडे शासकीय यंत्रणांमधील समन्वय अभावी पुणे शहराच्या हजार ई-बस प्रकल्पावर गतीचा ब्रेक लागला आहे. नागरिकांच्या दृष्टीने ही विलंबित प्रक्रिया चिंताजनक ठरत आहे. यावर तातडीने तोडगा निघावा, अशी अपेक्षा आहे.

# अकरावी प्रवेश अर्जासाठी ३ जून डेडलाईन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य मंडळाद्वारे यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे केंद्रीय आणि ऑनलाइन पद्धतीने राबविली जात आहे. तांत्रिक अडचणी दूर करून, विद्यार्थी सोमवार, २६ मेपासून अर्ज भरण्यासाठी प्रणाली वापरू शकतात. अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत मंगळवार, ३ जून असून, विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज सादर करण्याचे शिक्षण संचालनालयाने आवाहन केले आहे. पहिल्या नियमित फेरीची अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी ८ जूनला जाहीर होणार आहे.



राज्यात आतापर्यंत १०,००,३३२ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. पुणे विभागामध्ये नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या १,६४,९८३ आहे, ज्यात पुणे जिल्ह्यात ९४,२४३, अहिल्यानगरमध्ये ३९,७५९ आणि सोलापूरमध्ये ३०,९८१ विद्यार्थी आहेत.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार १ ते १० उच्च माध्यमिक विद्यालयांची प्राधान्यक्रम यादी तयार करता येणार आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण, आरक्षण आणि प्राधान्यक्रमानुसार महाविद्यालयांमध्ये प्रवेश दिला जाईल. एकाच वेळी विद्यार्थी कोटाप्रवेशासाठीही अर्ज करू शकतात.

प्रत्येक फेरीसाठी विद्यार्थ्यांनी संमती नोंदवणे आवश्यक आहे. प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीसाठी पसंतीक्रम अद्ययावत करण्याची सोय देखील उपलब्ध आहे.

तातपुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी ५ जूनला जाहीर होईल, त्यानंतर दोन दिवस हरकतीसाठी राखीव राहतील. अंतिम गुणवत्ता यादी ८ जून रोजी प्रसिद्ध होईल, आणि त्यानंतर महाविद्यालय निहाय प्रवेश वाटप यादी १० जूनला जाहीर होणार आहे.

प्रवेश घेणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे तसेच प्रवेश नाकारण्याची प्रक्रिया ११ ते १८ जून दरम्यान पूर्ण होईल.

राज्यातील ‘कॅप’ अंतर्गत एकूण १८,७५,७३५ आणि ‘कोटा’ अंतर्गत २,१३,४१५ म्हणजे एकूण २०,८९,१५० प्रवेश जागा उपलब्ध आहेत.

# कामकाजासाठी रस्ते खोदाईची परवानगी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळ्यापूर्वी मनपाच्या विविध विभागांना त्यांच्याकडील कामकाजासाठी रस्ते खोदाईची परवानगी देण्यात आली आहे . संबंधित विभागाच्या सर्व मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांचे समवेत आज ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी आढावा बैठक घेतली.

सदर बैठकीमध्ये सर्व संबंधित विभागांच्या पथ विभागाकडुन दिलेल्या रस्ते खोदाई परवानगीच्या सर्व ठिकाणच्या तसेच प्रमुख रस्त्यावरील ठिकाणांचा आढावा घेण्यात आला. काही अपवाद वगळता बहुतांश विभागांचे काम झालेले असून रस्ते पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे , या सर्व खोदलेल्या रस्त्यांचे पर्नपृष्ठीकरण आवश्यकता भासल्यास जास्त मनुष्यबळ वापरून ७ जून पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांनी दिले. पुर्नपृष्ठीकरण करताना कामे गुणवत्तापूर्वक करण्याबाबत संबंधित म.न.पा. कनिष्ठ अभियंते यांचे प्रशिक्षण आयोजित करावे व त्यांच्या उपस्थितीत हि कामे करून घ्यावी. तसेच त्या कामांची देयके पावसाळा पूर्ण होईपर्यंत आदा करण्यात येऊ नये.



पुणे पावसाळ्यापूर्वी मनपाच्या विविध विभागांना त्यांच्याकडील कामकाजासाठी रस्ते खोदाईची परवानगी देण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी सर्व विभागाच्या प्रमुखांची बैठक घेण्यात आली.

# पैशाने मोठे होण्यापेक्षा कर्तृत्वाने मोठे व्हा : प्रवीण दीक्षित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याच्या गतिमान काळात स्वार्थाचा आजार झालेल्या लोकांची संख्या वाढत असून सगळे लोक केवळ स्वार्थासाठी एकमेकांच्या जवळ येतात. आपण माणूस आहोत आणि आपल्यातली माणुसकी जिवंत राहावी, यासाठी प्रयत्नशील असणारी प्रत्येक व्यक्ती मोठी असते. वयाने तर सगळेच मोठे होतात. मात्र, वयाने आणि पैशाने मोठे होण्यापेक्षा कर्तृत्वाने मोठे होणे आवश्यक असते, असे मत माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी व्यक्त केले.

श्री मुकुंद भवन ट्रस्ट आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून दीक्षित बोलत होते.



विवेक स्पार्क फाउंडेशन संचलित स्पार्क अकॅडमी एमपीएससी व यूपीएससी मार्गदर्शन केंद्राच्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त माहेश्वरी सांस्कृतिक भवन येथे आयोजित यशवंतांच्या सत्कार समारंभ प्रसंगी

कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त संतोष राऊत, श्री मुकुंद भवन ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम लोहिया, स्पार्क अकॅडमीचे संचालक महेश पोहनेरकर, स्पार्क अकॅडमीच्या संचालक मुग्धा वाड, समन्वयक मनीषा नरडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या समवेत उपस्थित पालक, भावंडे आणि त्यापेकी काहींच्या जोडीदाराचाा देखील छोटेखानी सन्मान करण्यात आला. यावेळी अकॅडमीच्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेणाऱ्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रवीण दीक्षित म्हणाले की, संकटाची परिस्थिती आपण लगेच बदलू शकत नाही, परंतु चांगल्या विचारांतून वाईट परिस्थिती बदलण्याचा मार्ग नक्की काढू शकतो. त्यामुळे नेहमी सकारात्मक विचार ठेवावे. तसेच आयुष्यात ध्येय निश्चित करावे आणि ते पूर्ण करण्यासाठी मेहनत केल्यास यशाचा मार्ग नक्की सापडतो. आयुष्यात वारंवार परीक्षा द्याव्या लागतात. त्यामुळे अपयशाने खचू न जाणे आणि यशाने हुरळून न जाणे हा मंत्र लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

### ...म्हणून आई-बाबांना कधीही विसरू नका !

जगात आई-वडिलांसारखा मित्र आणि हितचिंतक कोणीही नाही. परिस्थितीने जे भोग आपल्या वाट्याला आले, निदान ते आपल्या लेकरांच्या नशिबी येऊ नयेत. आपली मुले मोठी व्हावीत, हीच प्रांजळ भावना पालकांची असते. कधी त्यांनी चांगल्याशी तुमची तुलना केली असेल ते तुम्हीही त्याच्याप्रमाणे चांगले व्हावे, गुणवान व्हा. त्यांचा रागही त्यांचे खरे प्रेम असते, हे ओळखले पाहिजे. आई-बाबांना कधीही विसरू नका, त्यांच्या आज्ञेत राहा, असा कानमंत्र प्रवीण दीक्षित यांनी नवनिर्वाचित अधिकाऱ्यांना उद्देशून दिला.




# अत्याधुनिक तंत्रासह ज्ञानाची जोड आवश्यक : डॉ. ए. वेलूमणी

## ‘कम्यूनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट’ परिषदेचा समारोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यशस्वी उद्योजक होण्यासाठी संयम, कल्पना, काटकसर , लक्ष्य आणि शिस्त हे अत्यंत महत्वाचे आहे. कम्फर्ट झोन हे सर्वात धोकादायक आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच ज्ञानाची जोड असणे अत्यंत महत्वाचे आहे.” असे विचार थॉयोकेअरचे संस्थापक डॉ. ए. वेलूमणी यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित दोन दिवसीय ‘कम्यूनिटी बिल्डींग फॉर इन्कलुसिव्ह इकॉनॉमिक ग्रोथ अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट’ परिषदेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड होते.

तसेच, थर्माकॉल मॅन रामदास माने, नाशिक येथील वेदमुथा इंडिस्ट्रीज लि.चे व्यवस्थापकीय संचालक अजय वेदमुथा, टायमस लाईफ स्टाइलचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुमीत तिवारी, निर्मिती प्रोमक कन्स्लटन्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल वैद्य, वास्तू ग्रुप चे चेअरमन उदय घुगे, राष्ट्रीय सरपंच संसदेचे मुख्य समन्वयक योगेश पाटील, एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे हे उपस्थित होते.

डॉ.ए.वेलूमणी म्हणाले, " यशस्वी होण्यासाठी तुमच्यात जीद्द असणे अत्यंत महत्वाचे आहे. यशस्वीतेचे पाऊल उचलण्यासाठी रिस्क अत्यंत महत्वाची आहे. कोणतेही कार्य करताना त्यात गुणवत्तापूर्ण कार्य असावे. प्रगतीसाठी सतत शिकत रहावे आणि त्यावर विचारमंथन करून प्रॅक्टिस करावी.”

अजय वेदमुथा म्हणाले, " व्यवसाय करतांना सतत परिस्थिती बदलत राहते त्यामुळे नफा, नुकसान होत राहणार. यासाठीच पॅशन असावे आगते. सातत्य असल्याने यश मिळते आणि सतत शिकत राहिल्याने ज्ञान मिळते. जीवनात कधीही मूल्यांबरोबर कधीही तडजोड करू नका. शॉर्टकट ने कधीही यश मिळत नाही. सोबत असणारे कामगार ही सर्वात मोठी ताकत असते त्यांचा सांभाळ करावा.”

यानंतर थर्माकोल मॅन रामदास माने, सुमित तीवारी आणि राहुल वैद्य यांनी व्यवसायातील चढ उताराची माहिती दिली. तसेच त्यांनी सांगितले की कष्ट, जिद्द आणि वेळेच्या नियोजनामुळे सर्व काही सिद्ध होऊ शकते.

राष्ट्रीय सरपंच संसदेचे मुख्य समन्वयक योगेश पाटील यांनी संपूर्ण परिषदेची माहिती देऊन उद्देश्य सांगितला.

आयोजित परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास शेकडो व्यावसायिक व उद्योजक उपस्थित होते.

प्रा.डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.



## कोथरुडमध्ये घरफोडीत १७ लाखांचे दागिने लंपास

**पुणे :** कोथरूड भागात सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी १७ लाख २० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविले. याबाबत एका महिलेने कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोथरूड भागातील उजवी भुसारी कॉलनीतील व्यंकटेश्वरा अपार्टमेंटमध्ये राहायला आहेत. चोरट्यांनी मध्यरात्री बंद सदनिकेचे कुलूप तोडले. शयनगृहातील कपाट उचकटून सोने-चांदीचे दागिने, तसेच हिरेजडीत दागिने असा १७ लाख २० हजार रुपयांचा ऐवज चोरला. पसार झालेल्या चोरट्यांचा पोलिसांकडून माग काढण्यात येत आहे. व्यंकटेश्वरा अपार्टमेंट परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांनी तपासले असून सहायक पोलिस निरीक्षक बालाजी सानप तपास करत आहेत.



## बाह्यवळण मार्गावर प्रवाशाला लुटले

**पुणे :** कोल्हापूरला निघालेल्या प्रवासी तरुणाला मारहाण करून लुटल्याची घटना मुंबई-बंगळूर बाह्यवळण मार्गावर घडली. प्रवासी तरुणाकडील सोनसाखळी, मोबाईल संच, रोकड असा ३५ हजारांचा मुद्देमाल लुटून चोरटे पसार झाले. याबाबत तरुणाने सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवासी तरुण कोल्हापूरला निघाला होता. बाह्यवळण मार्गावर खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या थांब्यावर तो थांबला होता. त्या वेळी कारमधून चौघेजण आले. त्यांनी तरुणाला कोल्हापूरला सोडतो, असे सांगितले. तरुण कारमध्ये बसला. त्यानंतर चोरट्यांनी मोटार बाह्यवळण मार्गावरुन खेड शिवापूरकडे नेली. प्रवासादरम्यान चोरट्यांनी तरुणाला मारहाण करून त्याच्याकडील दोन हजारांची रोकड, मोबाईल संच, सोनसाखळी असा मुद्देमाल लुटला. ससेवाडी परिसरात तरुणाला सोडून चोरटे मोटारीतून पसार झाले.

## महिलेच्या पिशवीतील तीन लाखांचे दागिने लांबविले

**पुणे :** खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून तीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरले. लक्ष्मी रस्त्यावरील बेलबाग चौकात हा प्रकार घडला. महिलेने याबाबत विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पिंपरी-चिंचवडमधील चिखली परिसरात राहायला आहेत. त्या कुटुंबीयांसह लक्ष्मी रस्ता परिसरात खरेदीसाठी आल्या होत्या. बेलबाग चौकातून त्या हुतात्मा बाबू गेनू चौकाकडे निघाल्या होत्या. गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या पिशवीतून तीन लाख १० हजार रुपयांचे दागिने लांबविले. पिशवीतून दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने विश्रामबाग पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.

# ‘वहिवाट’ ने खुलली गाववाल्यांची ‘कळी’...!

### पाणंद रस्ते गाववाल्यांसाठी खुले : अन्य गावांसमोर नवा आदर्श

गाव म्हटले की गावातील ‘गावकी’ आणि ‘भावकी’ शिवाय गावाची ओळख दूरदूरपर्यंत पोचतच नाय; त्यातूनच गाववाल्यांची भांडणे अगदी टोकाला जाण्याची उदाहरणे यापूर्वी अनेकवेळा घडली आहेत, परिणामी या भांडणामुळे गावातील पुढारी आणि पोलीसही अगदी मेटाकुटीला आले आहेत. विशेष म्हणजे बांधावरुन आणि शेतातील रस्त्यावरुन इतरांवरा हल्ला करण्याचे आणि एकमेकांचे खून करण्यापर्यंत मजल गेली आहे; त्यासाठी माजी उपमुख्यमंत्री स्व. आर. आर. आबा यांनी गावागावात ‘तंटामुक्ती अभियान’ सुरु केले आहे. त्यांनी लावलेल्या इवल्याशा रोपट्याचा आज वटवृक्ष झाला असून गावागावातील बांधाची आणि शेतातील पाणंद रस्त्याची भांडणे आता मिटली आहेत.





या भागातील गावांमधील शिव वहिवाट पाणंद रस्ते खुले करण्याची गरज होती.हे रस्ते खुले केल्याने याचा फायदा शेतकरी वर्गालाच होत असतो.हे रस्ते खुले केल्यास शेतातील पिकांची वाहतूक व्यवस्थित करता येते तर शेतात जाण्यासाठी भक्कम रस्ते करता येतात.शेतकरी वर्गा बरोबर महसूल खातेही हे रस्ते खुले करण्यासाठी आग्रही असून सहकार्य करते. **- संदिप जगताप,सरपंच**
ग्रामपंचायत शिंदेवाडी-जगतापवाडी.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** पूर्व हवेलीतील शेतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या शिंदेवाडी-जगतापवाडी शिव वहिवाट पानंद रस्ते ग्रामस्थ,शेतकरी वर्गाच्या सहकार्याने खुले करण्यात आल्याचे शिंदेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच संदिप जगताप यांनी माहिती देताना सांगितले.रस्ते सहकार्य खुले करण्यासाठी ग्रामस्थ,शेतकरी यांनी सहकार्य व मदत केल्याबद्दल त्यांचे आभार सरपंच जगताप यांनी मानले. याबद्दल पूर्व हवेलीत उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

पूर्व हवेली तालुक्यात शिंदेवाडी-जगतापवाडी व दौलतबाबा मठ असे वहिवाट असलेले पाणंद रस्ते आष्टापूर शिंदेवाडी महसूल विभागाचे तलाठी संजय गारकर,सरपंच संदिप जगताप,तसेच शेतकरी,ग्रामस्थ,गावचे आजी माजी पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिव पानंद रस्ते खुले करण्यात आले आहे.याप्रसंगी तरुण शेतकरी गोरख शिंदे,सतीश शिंदे,मंगेश शिंदे,कैलास शिंदे,कुंडलिक शिंदे,बाळासाहेब शिंदे,राहुल सावंत,कुणाल शिंदे,आदी शेतकरी उपस्थित होते.

उपस्थित सर्व शेतकऱ्यांनी मोजणी करून वीस फुटाचा रस्ता करण्यास संमती दर्शवली असून गावातील क्षेत्र रस्ते व पाणंद रस्ते खुले करण्यास शासनाच्या महसूल विभागाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत शेतकरी,ग्रामस्थांनी केले.

यावेळी तलाठी संजय गारकर व सरपंच संदिप जगताप यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले त्यावेळी सर्व शेतकऱ्यांनी मोजणी करून वीस फुटाचा रस्ता करण्यास संमती दर्शविली गावातील क्षेत्र रस्ते व आनंद रस्ते खुले करण्यास शासनाने महसूल विभागाने घेतलेल्या निर्णयाचे सर्व शेतकरी बांधवांनी स्वागत केले.यावेळी चेअरमन हरिभाऊ शिंदे,चेअरमन दिलीप दत्तात्रेय शिंदे,माजी सरपंच बापूराव शिंदे,माजी उपसरपंच कैलास शिंदे,माजी उपसरपंच परशुराम शिंदे, सुनील शिंदे उपस्थित होते.

# कचरा प्रकल्पाविरोधात नागरिक आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सूस खिंड, बाणेर परिसरातील सर्व्हे क्र. ४८/२/१ मध्ये महापालिकेने उभारलेल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पाविरोधात रविवारी शेकडो नागरिकांनी मानवी साखळी करून तीव्र निषेध व्यक्त केला. "प्रकल्प बंद करा, स्वच्छ हवा मिळू द्या" अशा घोषणा देत नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेचा विरोध केला.

या आंदोलनाचे आयोजन सूस रोड बाणेर विकास मंचच्या वतीने करण्यात आले होते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, २०१६ मध्ये कीर्ती गार्डन टेकडीजवळ महापालिकेने हा प्रकल्प उभारला. मात्र, संबंधित जागा महापालिकेच्या ताब्यात नसतानाही प्रकल्प उभारण्यात आला असून, त्यामुळे परिसरात दुर्गंधी व आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात धसका घेतला होता.

नागरिकांचा आरोप आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करता महापालिकेने प्रकल्प सुरू ठेवला आहे. परिणामी परिसरातील विविध सोसायट्यांतील रहिवाश्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, त्यांनी प्रकल्प तातडीने दुसरीकडे हलविण्याची मागणी केली आहे.

या आंदोलनात बाणेर, बालेवाडी, पाषाण व सूस परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माजी नगरसेवक ज्ञानेश्वर तापकीर यांनी सांगितले की, "महापालिका गेल्या नऊ वर्षांपासून माझी खासगी जागा बेकायदेशीरपणे वापरत आहे. या जागेचा वापर थांबवावा, यासाठी अनेकदा अर्ज करूनही महापालिकेकडून कोणतीही दखल घेतली जात नाही. प्रकल्पासाठी वापरलेला रस्ताही खासगी मालकीचा असून, तो बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे."

या आंदोलनात विनायक देशपांडे, हरिश पाटील, बाळासाहेब भांडे, गणेश तापकीर, अ‍ॅड. सत्या मुळे, पुष्कर कुलकर्णी, शैलेंद्र पटेल, सतीश पाषाणकर, दिलीप कळमकर, राशिनकर, मोहोळकर यांच्यासह अनेक रहिवासी सहभागी झाले होते.

"प्रकल्पासाठी वापरल्या गेलेल्या जागेसंदर्भात मालमत्ता व्यवस्थापन विभागाशी पत्रव्यवहार केला आहे. नागरिकांना त्रास होणार नाही, याची योग्य ती काळजी घेतली जाईल. सदर कचरा प्रक्रिया प्रकल्प महापालिकेच्या आरक्षित जागेवरच उभारलेला आहे.
**— संदिप कदम,** उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे मनपा

# गोठलेला काळ जागृतीचे काम पुस्तके करतात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाजात खूप उलथापालथ झाली, तर समाजाला त्यातून तारून नेण्याचे काम साहित्य करते, एवढी ताकद साहित्यामध्ये असते. गोठलेला काळ जागृत करण्याचे काम पुस्तके करतात, असे मत महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह आणि संस्कृती प्रकाशनाच्या संचालिका सुनीताराजे पवार यांनी व्यक्त केले.

साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे संवेदना प्रकाशन प्रकाशित कवयित्री प्रतिभा पवार यांच्या ‘ती अजून जिवंत आहे...’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन सुनीताराजे पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे, कार्याध्यक्ष धनंजय तडवळकर, कवयित्री प्रतिभा पवार, संदिप पवार, संवेदना प्रकाशनाचे संचालक नितीन हिरवे आणि कविता पवार आदी उपस्थित होते.

यावेळी ‘ती अजून जिवंत आहे...’ या कवितासंग्रहातील कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम झाला. संहिता आणि संकल्पना कवयित्री ज्योत्स्ना चांदगुडे यांची असून धनंजय तडवळकर, सुनिता टिल्लू, ऋचा कर्वे, तनुजा चव्हाण आणि संदिप पवार आणि स्वतः प्रतिभा पवार यांनी हा कार्यक्रम सादर केला.



पुणे साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे संवेदना प्रकाशन प्रकाशित कवयित्री प्रतिभा पवार यांच्या ‘ती अजून जिवंत आहे...’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना सुनीताराजे पवार. यावेळी (डावीकडून) ज्योत्स्ना चांदगुडे, प्रतिभा पवार, सुनिताराजे पवार, संदिप पवार, धनंजय तडवळकर आणि नितीन हिरवे.

# एकपात्री कला आणि कलाकारांचे भविष्य उज्ज्वल : डॉ. देसाई




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विभक्त कुटुंब पध्दती आणि समाज माध्यमांच्या प्रभावामुळे माणसांचा एकमेकांबरोबरचा संवाद खुंटला आहे. दिवसागणिक संवादाची भूक वाढत असताना व्यक्ती-व्यक्ती आणि कुटुंबातील संवादाच्या अभावाची ही पोकळी एकपात्री कलाकारच भरून काढू शकतो. त्यामुळे एकपात्री कला आणि कलाकारांना उज्ज्वल भविष्य आहे, असे मत पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी व्यक्त केले.

मराठी रंगभूमीवर एकपात्री कलाप्रकार रुजवणाऱ्या पहिल्या पिढीतील जेष्ठ एकपात्री कलाकार मधुकर टिल्लू यांच्या रौप्य महोत्सवी स्मृतीदिनानिमित्त एकपात्री कलाकार परिषद महाराष्ट्र आणि निळू फुले कला अकादमी यांच्यावतीने आयोजित विविध कला महोत्सवाचे उद्‌घाटन पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रम प्रसंगी एकपात्री कलाकार परिषदेच्या उपाध्यक्ष मंजुषा जोशी आणि प्रसिध्द एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू आदी उपस्थित होते.

यावेळी अंजली शहा यांना आर्टिस्ट ऑफ द इयर हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच कथाकथन स्पर्धा आणि एकपात्री स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रसिध्द एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू यांनी पुरस्कार देण्यामागील भूमिका विशद केली. एकपात्री कलाकार परिषदेच्या सचिव पल्लवी परब भालेकर यांनी मनोगत व्यक्त केले."आर्टिस्ट ऑफ द इयर" या पुरस्काराच्या मानकरी अंजली शहा यांनी पुरस्काराला उत्तर देत मनोगत व्यक्त केले. भाग्यश्री देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

एकपात्री क्षेत्रात चांगल्या अर्थाने टिल्लू कुटुंबाने त्यांची तिसरी पिढी याच क्षेत्रात प्रस्थापित करून समाजासमोर घराणेशाहीचे उत्तम उदाहरण निर्माण केले आहे. मधुकर टिल्लू यांच्या एकपात्री कलेचा मी प्रत्यक्ष साक्षीदार असून त्यांनी एकपात्री कला क्षेत्रात सुवर्णकाळ तयार केला होता. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे हे त्यांचे निस्सीम चाहते होते.
**— डॉ. सतीश देसाई,**
अध्यक्ष पुण्यभूषण फौंडेशन



## नगरपरिषदेत दिव्यांग कल्याण निधी वितरण

**तळेगाव दाभाडे :** दिव्यांग बांधव हे समाजाचा अविभाज्य भाग असून, त्यांच्या सक्षमीकरणाला चालना देणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिकांनी एकत्र येऊन दिव्यांगांसाठी संधी निर्माण केल्या तरच त्यांच्या विकासाचा खरा अर्थ साधता येईल, असे प्रतिपादन आमदार सुनील शेळके यांनी केले. तळेगाव दाभाडे नगर परिषदेतर्फे दिव्यांग कल्याण निधी व सानुग्रह अनुदान वितरणाचा कार्यक्रम शनिवारी नगर परिषद कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमात आमदार शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात आमदार शेळके यांनी पुढे बोलताना सांगितले की, "दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर सक्षमपणे जगण्यासाठी संधी व आधार देणं गरजेचं आहे. त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रशासनाने सातत्याने अशा योजनांची अंमलबजावणी करत राहावी."



## मावळातील २४ शाळा बनणार 'पुणे मॉडेल स्कूल'

**मावळ :** मावळ तालुक्यातील २४ शाळा लवकरच आधुनिक पायाभूत सुविधांनी सुसज्ज 'पुणे मॉडेल स्कूल' (आदर्श शाळा) म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून हा महत्वाकांक्षी प्रकल्प साकारण्यात येत असून, त्यासाठी एकूण २० कोटी ५७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली. या २४ शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या, प्रवेशद्वार, व्यासपीठ, पदपथ, हँडवॉश स्टेशन, शौचालये आणि संरक्षक भिंती अशा आधुनिक पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. ऐतिहासिक शालेय विकास प्रकल्पामुळे मावळ तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षण क्षेत्रात मोठी गुणवत्ता वाढ होणार आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण मिळण्यासाठी ही पायाभूत कामे अत्यंत महत्वाची ठरणार आहेत. आमदार सुनील शेळके म्हणाले, "ही केवळ शाळांची डागडुजी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी साकारलेला एक शासकीय व सामाजिक संकल्प आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व राज्य सरकारचे मनःपूर्वक आभार! ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी स्वतः लक्ष ठेवणार आहे."`



## दातांच्या आरोग्याबाबत ज्येष्ठांना मार्गदर्शन

**पिंपळे सौदागर :** अन्नपचन प्रक्रियेत दातांची भूमिका महत्वाची असून वाढत्या वयात दातांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी तसेच दातांची स्वच्छता, सौंदर्य आणि मजबुती यासंदर्भात ज्येष्ठांनी काळजी घेणे आवश्यक आहे असा सल्ला सुप्रसिद्ध दंतरोग तज्ञ डॉ. कश्मिरा जठार यांनी दिला. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित " ज्येष्ठांचे दंत आरोग्य " या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात त्या बोलत होत्या. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार यांच्या अध्यक्षतेखाली कुणाल आयकॉन रोडवरील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर शनिवार दि. ३१ रोजी हा कार्यक्रम झाला. लहान मुलांसाठी दातांच्या उत्तम आरोग्यासाठी कच्च्या भाज्या, फळे यांचा आहारात उपयोग करण्याचे डॉ. जठार यांनी सांगितले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसानिमित्त उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने डॉ. कुंदा भिसे आणि संजय भिसे यांच्या हस्ते पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शकुंतला शिंदे आणि शोभा राजगुरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संध्या मशाळकर यांनी करुन दिला. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयपाल सिदनाळे, विवेकानंद लिगाडे, सुभाष पाटील, अशोक येळंमकर, सुरेश विधाते, रमेश चांडगे, अनिलकुमार शाह आदींनी परिश्रम घेतले.

## 'निर्जली' ठरला सर्वोत्तम चित्रपट

**आकुर्डी :**पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'निर्जली' चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान पटकावला. तमिळ भाषेतील 'थुनाई' लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार प्राप्त केला. सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन फिल्ममध्ये 'लेस' ने बाजी मारली. भारतासह ४० देशांमधून ९० पेक्षा अधिक चित्रपट, लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि ६० सेकंद फिल्म्स महोत्सवात प्रदर्शित झाल्या. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्रियंका भेरिया आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार तुषार शिंगाडे यांना प्रदान केला. पिंपरी चिंचवड महापालिका आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी यांच्यातर्फे आयोजित पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे पारितोषिक वितरण आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात झाले.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी सोहळ्याची सांगता

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्रिशताब्दी समारोहाची सांगता शनिवारी सायंकाळी मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात करण्यात आली. भारतीय जनता पार्टीच्या वतीने पिंपळे सौदागर येथील महादेव मंदिरात महिलांच्या हस्ते भव्य 'शिव महाआरती' चे आयोजन करून या आठ दिवसीय सोहळयाची सांगता झाली.

या कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांना आदरांजली वाहिली. तसेच, हा जयंती कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. महिलांच्या मोठ्या उपस्थितीने आणि त्यांच्या हस्ते झालेल्या शिव महाआरतीने हा सोहळा अधिकच भक्तिमय आणि अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतींना उजाळा मिळाला आणि त्यांच्या आदर्श विचारांना पुन्हा एकदा समाजात रुजविण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

# ॲपद्वारे नोंदवा खड्ड्यांची तक्रार

### पालिकेचा नाविन्यपूर्ण उपक्रम





पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते खड्डेमुक्त असावेत, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांना देखील महानगरपालिका हद्दीत असणाऱ्या रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार सहज करता यावी, यासाठी खड्डे व्यवस्थापन प्रणाली सुरू करण्यात येत आहे. खड्डे व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि कार्यक्षमतेची वाढ करून रस्ते अधिक सुरक्षित व सुरळीत करण्याचा आमचा प्रयत्न आहे.
**-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पालिका.

### अशी नोंदवता येणार तक्रार..

- ॲपद्वारे खड्ड्याची तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना प्रथम पॉटहोल ॲपमध्ये लॉगिन करावे लागणार आहे. त्यानंतर नागरिक खड्याचे फोटो काढून त्याच्या स्थानासह (Geo Location) ते अपलोड करू शकतात. ही माहिती आपोआप संबंधित विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना त्यांच्या प्रभागानुसार पाठवली जाईल. याच वेळी ती माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठवली जाईल. तक्रारी नोंदवल्यानंतर तिचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याकडे दिली जाईल. दिलेल्या तक्रारीचे निराकरण झाले नाही, तर त्या भागातील वरिष्ठ अधिकारी यांना ईमेल व संदेश पाठवण्यात येईल. एखादी तक्रार कनिष्ठ अभियंता यांच्या अधीन नसल्यास ती महानगरपालिकेच्या ज्या विभागाशी आहे, त्या संबंधित विभागाकडे पाठवण्यात येईल. तक्रारीचे निराकरण संबंधित विभाग किंवा अभियंता यांनी केल्यानंतर ती तक्रार ॲपमध्ये बंद केली जाईल आणि तक्रारदारास फोटोसह निराकरणाची माहिती ईमेल / संदेशाद्वारे कळवली जाईल.

### मोबाईल ॲप डाऊनलोड करा..

- 1. Smart Sarathi PCMC Mobile Application आपल्या मोबाईलवर Google Play Store किंवा Apple App Store वरून डाऊनलोड करा (जर आधीपासून इंस्टॉल नसेल तर).
- 2. ॲपमध्ये PCMC Services विभागात जाऊन "Report Pothole / खड्डे नोंदवा" App निवडा. यामुळे आपल्याला ॲप स्टोअरवर रिडायरेक्ट केले जाईल.
- 3. थेट ॲप स्टोअरमध्ये "PCMC Pothole Management" असे शोधून ॲप डाऊनलोड करता येईल.
- 4. किंवा खालील QR कोड वापरुन मोबाइल अप्लिकेशन डाउनलोड करू शकता.

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने खड्डे व्यवस्थापन प्रणाली विकसित केली असून आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर ती सुरू करण्यात येणार आहे. या अंतर्गत 'पॉटहोल मॅनेजमेंट' हे नाविन्यपूर्ण ॲप विकसित करण्यात आले असून नागरिकांना या ॲपद्वारे खड्ड्यांची तक्रार नोंदवता येणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मान्सूनपूर्व तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. पावसाळ्यामध्ये खड्ड्यांची समस्या सातत्याने उद्भवते. या समस्येवर उपाय म्हणून महानगरपालिकेने पॉटहोल ॲप विकसित केले आहे. या ॲपमुळे खड्ड्यांची तक्रार नोंदवणे आणि त्या तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सोपी व सुलभ होणार आहे. नागरिक या ॲपद्वारे खड्ड्याची तक्रार नोंदवू शकतात, आणि त्या तक्रारीच्या निराकरणाविषयी अद्ययावत माहिती मिळवू शकतात.

# लग्न समारंभात आता आचारसंहिता..

### काळेवाडी येथील बैठकीत नियम व अटी लागू

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**काळेवाडी :** पिंपरी चिंचवड शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने रविवार दि.१ जून २०२५ रोजी आरंभ बँक्वेट, बी.आर.टी.रोड, काळेवाडी येथे महत्वाच्या सामाजिक विषयांवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नुकतीच शहरातील कन्या वैष्णवी हगवणे - कस्पटे हिच्या बाबतीत जी दुर्घटना घडली त्या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यातच नव्हे तर देशभर पडले आहेत. या घटनेमुळे मराठा समाजाबद्दल उलट सुलट चर्चा सुरु आहेत. त्यामुळे पुणे शहरातील सकल मराठा समाजाने लग्नव्यवस्थेसंदर्भात एकत्र बैठक घेऊन काही अटी व नियम लागू केलेले आहेत. याच धर्तीवर आपल्या पिंपरी चिंचवड शहर सकल मराठा समाजाच्या धोरणात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. लग्न समारंभा संदर्भात ती आचारसंहिता, तसेच नियम अटी हे या बैठकीत ठरवण्यात आले.

कै. वैष्णवीस श्रद्धांजली अर्पण करून सदर बैठकीस सुरुवात करण्यात आली. या बैठकीत समाजाची भविष्यातील वाटचाल व त्यासंदर्भात काही नियम व धोरणे निर्धारीत करण्यात आली आहेत. लग्न व्यवस्था व इतर कार्यक्रम व समारंभ याबाबतीत आचारसंहिता घालून देण्यात आलेली आहे. सर्व समाज बांधवांनी या आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.

यावेळी पिंपरी चिंचवड शहरातील मोठ्या प्रमाणात मराठा समाज बांधव व इतर समाजबांधवही उपस्थित होते. हा विषय फक्त मराठा समाजापुरता मर्यादित नसल्याने इतर समाज बांधवांनाही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी बऱ्याच उपस्थितांकडून वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या सदर सूचनांचा समावेश आचारसंहितेत करण्यात येणार आहे.



# बौद्ध विहाराचे तब्बल ३३ वर्षांनंतर सुशोभीकरण

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** त्रिरत्न बौद्ध महासंघ, पिंपरी केंद्राच्या वतीने नव्याने सुसज्ज करण्यात आलेल्या धम्मानुस्मृती विहार चे उद्घाटन अत्यंत मंगलमय वातावरणात उत्साहात पार पडले. या विहाराच्या नूतनीकरणासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी माननीय आमदार अमित गोरखे यांच्या आमदार निधीतून मंजूर करण्यात आला होता.

या धम्मविहाराची मूळ संकल्पना सन १९९२ मध्ये साकारण्यात आली होती. तब्बल ३३ वर्षांनंतर, नव्या स्वरूपात व आधुनिक सुविधांनी सुसज्ज असा हा धम्मविहार पुन्हा एकदा समाजाच्या सेवेसाठी नव्या रुपात खुला करण्यात आला.



माझ्या आमदार निधीतून बाबासाहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या बौद्ध विहारासाठी काम करण्याचे भाग्य मला मिळाले, हे माझ्यासाठी अत्यंत गौरवाचे आहे. मागील ३३ वर्षांपासून या विहाराकडे कोणी लक्ष दिले नव्हते. हा उपक्रम म्हणजे माझे एक मोठे सामाजिक कर्तव्य आहे. धम्मप्रिय बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग आणि त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून मला अत्यंत आनंद झाला..
**-आमदार अमित गोरखे**



**पिंपरी** धम्मानुस्मृती विहार चे उद्घाटन करताना आमदार अमित गोरखे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिपक मेवानी, माजी नगरसेविका कोमल मेवानी, राजकिरण दाभाडे, जयेश चौधरी, महादेव सोनवणे, रंगनाथ साळवे, रणजीत कांबळे, शिवा पिल्ले, मारुती सोनटक्के हे पदाधिकारी सामील होते.

# अहिल्यादेवींनी महिला सबलीकरणाचा पाया रचला : आ. चित्रा वाघ

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** "आजच्या पिढीतील महिलांसाठी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या एक दीपस्तंभ आहेत. त्यांनी केवळ न्यायप्रिय शासिका म्हणूनच नव्हे, तर एक कुशल प्रशासक आणि समाजसुधारक म्हणूनही आपले कार्य सिद्ध केले. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही आपल्याला विविध क्षेत्रांत दिसतो, असे प्रतिपादन भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष तथा आमदार चित्रा वाघ यांनी केले.



राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विशाल जनसेवेच्या स्मरणार्थ सखी सोबती फाउंडेशनच्या वतीने आयोजित "अहिल्या पुरस्कार २०२५" गौरव समारंभ रविवारी प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. पुणे जिल्ह्यातील समाजसेवा, प्रशासन, क्रीडा, संस्कृती आणि स्त्री सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ९ महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

निलेश गद्रे यांनी सांगितले की, "राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी ज्या दूरदृष्टीने आणि लोककल्याणाच्या भावनेने राज्यकारभार केला, तो आजही आदर्श आहे. सखी सोबती फाउंडेशनने त्यांच्या नावाने पुरस्कार देऊन समाजात विधायक कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करणे हे अत्यंत स्तुत्य आहे. उपस्थित महिलांसाठी चिठ्ठी काढून माहेश्वरी साडी भेट देण्यात आली. तसेच, १० आणि १२ वी च्या ९ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९ हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली.



सखी सोबती फाउंडेशनने अहिल्यादेवींच्या नावाने हा पुरस्कार देऊन, समाजात निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला आहे, हे अतिशय कौतुकास्पद आहे. अहिल्यादेवींनी महिला सबलीकरणाचा पाया रचला आणि आजच्या महिलांनी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करावे.
**— आमदार चित्रा वाघ**

संपादकीय विशेष

# आणखी एका शत्रूची आपबिती!

अलिकडेच बांगलादेशाचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांच्या अचानक राजीनाम्यामुळे युनूस यांच्याही राजीनाम्याची चर्चा सुरू झाली. तत्पूर्वी, 'बीएनपी' नेते इशराक हुसेन यांच्या समर्थकांनीही ढाक्यातील रस्त्यांवर निदर्शने करून स्थानिक सरकार सल्लागार आसिफ महमूद संजीव भुईयान आणि माहिती सल्लागार महफुज आलम यांच्या राजीनाम्याची मागणी केली. वस्तुत: एका जनआंदोलनानंतर मोहम्मद युनूस यांची या पदासाठी निवड झाली; पण आता ज्या पद्धतीने आंदोलन सुरू आहे आणि त्यांना ज्या प्रकारे ओलीस ठेवले जात आहे, त्या स्थितीत काम करणे शक्य नाही. याच वेळी 'बीएनपी'ने पत्रकार परिषद घेऊन अंतरिम सरकारच्या वादग्रस्त सल्लागारांना काढून टाकण्याची मागणी केली. नव्याने स्थापन झालेला राष्ट्रीय नागरिक पक्ष (एनसीपी) गेल्या वर्षी जुलैमध्ये झालेल्या बंडाचे नेतृत्व करणारा युवा पक्ष ठरला. त्याचे मुख्य संयोजक हसनत अब्दुल्ला यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे की, देश आणि राष्ट्राच्या हितासाठी या अनपेक्षित विभाजनावर तोडगा काढला पाहिजे. दरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'चे अमीर शफीकुर रहमान यांनी देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन लवकरच सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचे आवाहन युनूस यांना केले; मात्र बांगलादेशच्या अंतरिम सरकारने अवामी लीगवर बंदी घातली. लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी डिसेंबरपर्यंत सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे आवाहन केले. परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांनी राजीनामा दिला आहे. युनूस आणि परराष्ट्र व्यवहार सल्लागार तौहीद हुसेन यांच्याशी कथित मतभेद आणि समन्वयाचा अभाव यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जाते.

गेल्या वर्षी एका मोठ्या जनआंदोलनातून हंगामी सरकार आले, तेव्हा हे सरकार अल्पकाळ असेल आणि तिथल्या संसदेच्या निवडणुका लवकर घेतल्या जातील, असे सांगण्यात आले होते; परंतु गेल्या दहा महिन्यांमध्ये निवडणुका झालेल्या नाहीत. आता लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी सरकारला मुदत घालून दिली आहे. पुढील सात महिन्यांमध्ये बांगलादेशमध्ये निवडणुका घ्याव्या लागतील. गेल्या वर्षी आंदोलन होईपर्यंत बांगलादेशचा जीडीपी आशिया खंडात नोंद घेण्यासारखा होता. या देशातून जगभर निर्यात होत होती. विशेषतः कापड उद्योगाने जगभरात नावलौकिक कमावला होता. गेल्या दहा महिन्यांमध्ये मात्र बांगलादेशमधील हिंसाचार आणि भारतविरोधी भूमिकेमुळे बांगलादेशची कोंडी झाली आहे. चीन मदत करत असला, तरी तो काहीही फुकट करत नाही. ज्या पश्चिम पाकिस्तानच्या छळाला कंटाळून बांगलादेशची निर्मिती झाली, त्यानेच आता पाकिस्तानसोबत जुळवून घेतले आहे. अतिरेकी संघटनांना रान मोकळे केले आहे. भारताने आर्थिक कोंडी केल्याचा परिणाम म्हणून बांगलादेशची निर्यात महागणार आहे. भारताने बांगलादेशच्या मुक्तीसंग्रामात महत्त्वाची भूमिका बजावली; परंतु तोच बांगलादेश आता भारताविरोधात गरळ ओकत आहे. त्याचा परिणामही त्यालाच भोगावा लागतो आहे. भारताने बांगलादेशला 'मोस्ट फेवर्ड नेशन'चा दर्जा दिला होता. भारतीय कापड उद्योगाला नुकसान सहन करून बांगलादेशसाठी दरवाजे खुले केले होते. आता भारताने बांगलादेशच्या या सवलती काढून घेतल्या आहेत. त्यामुळे या देशाचा वस्त्रोद्योग तसेच अन्य उद्योग अडचणीत आले आहेत.

दुसरीकडे, 'बीएनपी'चे सदस्य मिर्झा फखरुल इस्लाम यांनी म्हटले आहे की, देशाच्या लोकशाही भविष्यावर 'नवीन काळी सावली' पसरत आहे. निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यासाठी एक सुनियोजित कट रचला जात आहे. धोक्यात आलेली लोकशाही व्यवस्था, सातत्याने सुरू असलेला हिंसाचार यामुळे कुणीच बांगलादेशमध्ये गुंतवणूक करण्यास धजावत नाही. बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली, तेव्हा दक्षिण आशियातील या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाची अर्थव्यवस्था वाईट स्थितीत होती. देशातील ८० टक्के लोकसंख्या अत्यंत गरिबीमध्ये जगत होती. त्यानंतर पुढील काही वर्षे बांगलादेश लष्करी उठाव, राजकीय संकट, गरिबी आणि दुष्काळाशी झुंजत राहिला. पाच वर्षांपूर्वी मात्र या देशाची परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली झाली होती. विकासवाटेवरील अग्रणी म्हणून बांगलादेशकडे पाहिले जात होते. त्याच्या विकासावर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. बांगलादेशचा सामाजिक-आर्थिक विकास आणि लोकांच्या उत्पन्नात झालेली असाधारण वाढ पाहून जग थक्क होत होते. तिथल्या लोकांचे उत्पन्न दहापट वाढले होते. बांगलादेश विकासात पुढे जात होता. कोरोनापूर्वी बांगलादेशची अर्थव्यवस्था खूप वेगाने वाढत होती. त्याचा वार्षिक आर्थिक विकास दर आठ टक्के होता. आता मात्र हा देश पुन्हा समस्यांच्या खाईमध्ये जात आहे.

बांगलादेश सुमारे १६७ दशलक्ष लोकसंख्येला पुरेल इतके अन्नधान्य पिकवतो. येथील माता आणि बालमृत्यू दरही लक्षणीयरीत्या कमी झाला होता. २०१५ मध्ये बांगलादेशने कमी-मध्यम उत्पन्न असलेल्या देशाचा दर्जा प्राप्त केला. तो संयुक्त राष्ट्रांच्या 'अल्प विकसित देशांच्या' यादीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर होता. या देशातील ९८ टक्के मुलांनी प्राथमिक शिक्षण घेतले असून माध्यमिक शाळांमध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. अलिकडच्या काळात मुस्लिमबहुल राष्ट्राने मुली आणि महिलांचे जीवन सुधारण्यासाठी मोठी गुंतवणूक केली होती. बालकुपोषण आणि पुनरुत्पादक आरोग्याच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रगती केली होती. मुलींच्या शिक्षणाच्या परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे बांगलादेशची सामाजिक-आर्थिक रचना बदलली. मुली आणि महिलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे हीदेखील एक येथे महत्त्वाची बाब ठरली. आता महिला पूर्वीपेक्षा जास्त बोलक्या आहेत. त्या चार दशकांपूर्वी होत्या तितक्या लाजाळू नाहीत. शेतीपासून उद्योगांपर्यंत बांगलादेश जगातील ३७ व्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाली होती. त्याचा जीडीपी ४०९अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. २०३० पर्यंत त्याची अर्थव्यवस्था दुप्पट होण्याचा अंदाज विविध संस्था व्यक्त करत होत्या; परंतु गेल्या वर्षी आरक्षणाचे निमित्त झाले आणि बांगलादेशला दिशा देणाऱ्या शेख हसीना यांना देश सोडून जावे लागले. त्यांच्या पक्षाचे अनेक नेते तुरुंगात आहेत. त्यांचा पक्ष मध्यममार्गी होता. कट्टरवाद्यांपेक्षा त्यांची विकासाची दृष्टी आणि धोरणे चांगली होती; परंतु अंतरिम सरकारच्या भूमिकेमुळे देश पुन्हा कट्टरवाद्यांच्या हाती गेला आणि त्याची प्रगतीकडून अधोगतीकडे वाटचाल सुरू झाली.

# चीन-पाक कॉरिडॉरमध्ये अफगाणचा प्रवेश

वेध

शंतनु चिंचाळकर

**चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर या भारतासाठी डोकेदुखी ठरू पाहणाऱ्या भागीदारीत आता अफगाणिस्तानची भर पडली आहे. चीन हा कॉरिडॉर त्रिपक्षीय विकास योजना म्हणून भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा त्यामागील छुपा अजेंडा आहे. हा कॉरिडॉर भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत.**

चीनने व्यापारवृद्धीसाठी, दक्षिण आशियाई देशांना अधिक जवळ आणण्यासाठी आणि पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी एक मोठा द्विपक्षीय प्रकल्प राबवला आहे. २०१५ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प चीन - पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून प्रसिद्ध असा हा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांचा विकास करताना चीनची ऊर्जा आयात आणि व्यापार वाढवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये ग्वादर आणि कराचीमधील बंदरांना उत्तर पाकिस्तान आणि चीनच्या शिनजियांग प्रदेशाशी जोडणारे आधुनिक वाहतूक नेटवर्क समाविष्ट आहे. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत या कॉरिडॉरमध्ये चीनने सुमारे ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने ऊर्जा प्रकल्पांसह पायाभूत सुविधांच्या विकासावर केंद्रित आहे. याचा मोठा भाग वीज निर्मितीकडे जातो. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यानंतर २०२५ पर्यंत इतर सर्व देशांप्रमाणे चीनने पुनर्स्थापित इस्लामिक अमिरातीला मान्यता दिली नाही, परंतु देशात त्यांच्या दूतावासाला काम करण्याची परवानगी दिली. मान्यता नसतानाही चीन तालिबान सरकारशी व्यापार, गुंतवणूक आणि मदतीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करतो. अफगाणिस्तानच्या खाण क्षेत्रातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणजे उझबेकिस्तान, तुर्की, चीन आणि इराणमधील कंपन्या; ज्यांनी तेल आणि वायू, सिमेंट प्रकल्प आणि तांबे, सोने आणि लोखंडाच्या खाणींमध्ये गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमध्ये तेलाचे साठेदेखील आहेत. विशेषतः उत्तर अफगाणिस्तानमध्ये, विशेषतः बल्ख आणि जाव्झान प्रांतांमध्ये अंदाजे १.८ अब्ज बॅरल तेल आहे, चीनची या तेलसाठ्यांवर आणि खाणींवर नजर आहे. या दृष्टीने पाऊल टाकत चीनने अफगाणिस्तानला चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये सामील करून घ्यायचा निर्णय घेतला आहे.

समुद्र आणि जमिनीवर आधारित चीनच्या कॉरिडॉरचा मुख्य उद्देश मध्यपूर्वेतून चीनच्या ऊर्जाआयातीचा मार्ग सुरक्षित आणि कमी अंतराचा करणे हा आहे. मलेशिया आणि इंडोनेशियादरम्यान मलाक्का सामुद्रधुनीतून जाणारा विद्यमान मार्ग युद्धाच्या प्रसंगी बंद होऊ शकतो. त्यामुळे चीनच्या ऊर्जा-अवलंबित अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो. पाकिस्तान आणि चीनने चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास सहमती दर्शवली आहे. तिन्ही राष्ट्रांमधील त्रिपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याचे हे प्रयत्न असल्याचे चीन भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा चीनचा छुपा अजेंडा आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने भारतासाठी सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सीपीईसीचे काम भारताच्या सहभागाशिवाय प्रगतीपथावर आहे, जे गंभीर चिंतेचा विषय बनले आहे. चीनच्या पथ्यावर पडलेली आणखी एक घटना म्हणजे अलिकडच्या एका अहवालात पाकिस्तानने त्याच्या प्रादेशिक पाण्यात मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूचे साठे शोधले असल्याचे सूचित केले आहे. हे जगातील सर्वात मोठ्या साठ्यांपैकी एक असू शकतात. युनायटेड स्टेट्स एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या मते पाकिस्तानकडे नऊ अब्ज बॅरलपेक्षा जास्त पेट्रोलियम तेल आणि 105 ट्रिलियन घनफूट नैसर्गिक वायूचे साठे आहेत. हे लक्षात घेता भारताला या कॉरिडॉर त्रिकुटापासून सावध रहावे लागेल.

तालिबानच्या नेतृत्वाखालील इस्लामिक अमिरात ऑफ अफगाणिस्तान आता सत्तेमध्ये चौथे वर्ष पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये या राजवटीपर्यंत भारताची पोहोच हळूहळू वाढत गेली. आता ती अधिक थेट पण सावध व्यावहारिक सहभागामध्ये रूपांतरित झाली आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि आयईएचे अंतरिम परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील अलिकडच्या फोनकॉलने या भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारत-अफगाणदरम्यानचे हे व्यापारी संबंध चीन आणि पाकिस्तानला सलत आहेत. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल मुत्ताकी यांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर विश्वास न ठेवल्याबद्दल कौतुक केले. याला पाकिस्तानने केलेल्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा अप्रत्यक्ष संदर्भ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने तालिबानला मानवतावादी आणि विकास सहकार्य हळूहळू वाढवण्याचे वचन दिले आहे.

या वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईमध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली. ही दोन्ही बाजूंमधील सर्वोच्चस्तरीय बैठक होती. डिसेंबर २०२४ मध्ये हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध बिघडल्यानंतर ही बैठक होत आहे. काबूलमधील पाकिस्तानचा प्रभाव कमी झाल्यामुळे भारताला आपला सहभाग वाढवण्यासाठी आणि या प्रदेशात आपले धोरणात्मक आणि सुरक्षा हितसंबंध अधिक चांगल्या प्रकारे सुरक्षित करण्याची संधी मिळाली. व्यापारासाठी अफगाणिस्तानच्या चाबहार बंदराचे महत्त्व, अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पोहोचवणे आणि काबूलला इस्लामाबादवरील अत्यधिक अवलंबित्वातून मुक्त करणे यानिमित्ताने भारताने सहकार्याचे एक पर्व सुरु केले. आता भारताने या बाबींवर भर देऊन अफगाणिस्तानशी व्यापार संबंध बळकट करण्याची आवश्यकता आहे. अर्थात असे असले तरी, या प्रदेशातील इतर देश, खास करून चीन, तालिबान आणि अफगाणिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्याकामी अधिक सक्रिय आहे. रशियाने अलिकडेच तालिबानला दहशतवादी संघटनांच्या यादीतून काढून टाकले आहे. इराण आणि मध्य आशियाई प्रजासत्ताक, जसे की कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान यांनीही अफगाणिस्तानशी संपर्क वाढवला आहे. तालिबानदेखील या घडामोडींचा फायदा घेत आहे, परस्पर हितसंबंधांवर आधारित तटस्थ परराष्ट्र धोरणाचा पुनरुच्चार करत आहे.

चीन आपला आर्थिक कॉरिडॉर नजरेसमोर ठेऊन पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यामधील संबंध सुधारण्यासाठी मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडत आहे. म्हणूनच दोन पारंपरिक शत्रूंशी अफगाणिस्तानच्या वाढत्या जवळीकीकडे भारताला काटेकोर लक्ष द्यावे लागणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारताने अफगाणशी संपर्क वाढवला आहे. २७ एप्रिल रोजी परराष्ट्र मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर मुत्ताकी पाकिस्तान आणि चीनशीही संवाद साधत आहेत. १० मे रोजी काबूलमध्ये पाकिस्तान आणि चीनच्या विशेष प्रतिनिधींच्या बैठकीनंतर पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दार आणि मुत्ताकी यांनी २०-२१ मे रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्याशी त्रिपक्षीय सल्लामसलत करण्यासाठी चीनमध्ये भेट घेतली. यावेळी परस्पर हितसंबंध आणि चांगल्या शेजाराच्या आधारावर संबंध विकसित करण्याच्या वचनबद्धतेचा तिन्ही बाजूंनी पुनरुच्चार केला. त्यांनी आर्थिक तसेच संपर्क राखण्याच्या आघाड्यांवर सहकार्य वाढवण्याचे ठरवले आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारण्यास सहमती दर्शवली. भारताच्या दृष्टीने या निर्णयाला महत्व आहे. ही उपद्रवी राष्ट्रे एकत्र येत असल्याने अफगाणिस्तानशी असलेले संबंध वाढवण्याच्या दृष्टीने भारताची कसोटी लागणार आहे.

गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध लक्षणीयरीत्या बिघडले आहेत. मात्र तरीही दोन्ही बाजू प्रश्न सोडवण्याचा आणि एकमेकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षानंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानला पुन्हा आपल्या हद्दीत समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न भारतासाठी अडचणीचा ठरू शकतो. भारताशी प्रस्थापित केलेले चांगले संबंध अफगाणिस्तानला पाकिस्तानपासून स्वावलंबन मिळवून देतात, परंतु तालिबानशी असलेले संबंध आपल्याला हवे असलेले फायदे देऊ शकतात का, यावर भारताची कडक नजर असणे आवश्यक आहे. या आर्थिक कॉरिडॉरची भारताच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे पाकिस्तानी आणि चिनी निवेदनांमध्ये सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरोध आणि त्याचा सामना करण्याची त्यांची वचनबद्धता नमूद करण्यात आली. मुत्ताकी यांनी वांग यी यांच्यासोबतच्या द्विपक्षीय बैठकीत अफगाणिस्तानची भूमी त्यांच्या कोणत्याही शेजारी देशांविरुद्ध वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही, असेही वचन दिले. भारताला अफगाणिस्तानशी संबंध वाढवताना अल कायदासारख्या गटांच्या उपस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीवदेखील असली पाहिजे. अफगाणिस्तानमध्ये अजूनही अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. त्यांचे भारताशी वैर जगजाहीर आहे. यामुळे नवी दिल्लीला मोठ्या धोक्यापासून सावध रहावे लागणार आहे.

खेचाखेची

## उन्हाळ्यातील नृत्य

शुल्क नाही... शुल्क नाही...

.

ज्या कोणाला नृत्य येत नाही व शिकण्याची खूप मनोमन इच्छा आहे....

त्यांनी दुपारी १२ ते ४ या वेळात पायात कोणतीही पादत्राणे न घालता बिल्डींगच्या गच्चवर जावं

.

**तुमच्या पायांची लयबद्ध हालचाल आपोआप दिसून येईल.**

वेगळं काही

अमेरिकेतल्या टेनेसी राज्यातल्या क्रासविले या शहरात जगातलं सर्वात मोठं ट्री हाउस आहे. सहा झाडांच्या आधाराने ते बनवण्यात आलं आहे. हे ट्री हाउस १०० फूट म्हणजे १० मजली इमारतीएवढं उंच आहे. विशेष म्हणजे इथे टेनेसी राज्याचे एक मंत्री राहतात. त्याचं क्षेत्रफळ दहा हजार चौरस फूट आहे. असं ट्री हाउस बांधण्याची कल्पना एका वास्तूविशारदाला १९९३ मध्ये सुचली. त्यानंतर तब्बल ११ वर्षांनी हे स्वप्न प्रत्यक्षात उतरलं. या घराला गॅलरी आहे. तसंच छोटं बास्केटबॉल कोर्टही आहे. यात एक पेंट हाउसही आहे. या घराचा पाया ८० फूट खोल आहे. हे घर खूप मजबूत आहे. या घराच्या बांधकामासाठी १२ हजार डॉलर्सचा खर्च आला.


सौंदर्यसाधना

## विमानातली सौंदर्यसाधना



विमान प्रवास बराच दूरचा असेल तर शारीरिक ताण येतो त्याचप्रमाणे त्वचा टवटवीत कशी ठेवावी हा प्रश्नही उपस्थित होतो. ही समस्या टाळण्यासाठी कामी येतील अशा काही टिप्स...

✻ प्रवासाला निघताना मेक अप केला असला तरी कालांतराने उतरवावा. चेहऱ्यावर मेक अप ठेवून विमानात विश्रांती घेणं योग्य नाही. जास्त काळ मेक अप चेहऱ्यावर राहिल्याने त्वचेचं नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे हायड्रेटिंग क्लिंजिंग मिल्कने मेक अप उतरवावा. ✻ विमानासारख्या बंद ठिकाणी त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतोच असं नाही. त्यामुळे हायड्रेटिंग मिस्टचा स्प्रे चेहऱ्यावर फवारावा. यामुळे त्वचा रिफ्रेश होईल. ✻ अधिक कालावधीच्या विमान प्रवासात चेहऱ्यावर फेस मास्क लावू शकता. त्यामुळे एरवी या प्रक्रियांना द्यावा लागणारा वेळ वाचेल. ✻ अधिक कालवधीच्या प्रवासात पुरेशी झोप मिळाली नाही तर डोळ्याखाली काळी वर्तुळं निर्माण होण्याचा संभव असतो. अनेकांचे डोळे सुजतात. त्यामुळे प्रवासात अंडर आय मास्कचा उपयोग करावा. ✻ मोठ्या प्रवासादरम्यान सिरमचा वापरदेखील लाभदायक ठरू शकतो. यामुळे त्वचा मऊ होते आणि टवटवीत दिसते.




राशीभविष्य

- **मेष** : जोडीदाराशी मतभेद टाळावेत. लांबचे प्रवास तुर्तास नको. व्यवसायात जुनी येणी वसुल होतील.
- **वृषभ** : विश्वासू व्यक्तिकडून विश्वासघात संभवतो. आर्थिक बाबतीत ताण राहील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **मिथुन** : आजचा दिवस विशेष फायद्याचा ठरेल. व्यवसायात महत्त्वाचे करार होतील. बाकी चिंता नसावी.
- **कर्क** : विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. कुलदेवतेची उपासना करावी. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील.
- **सिंह** : घरगुती प्रश्नांचा ताण राहील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **कन्या** : लक्ष विचलित करणाऱ्या घटना संभवतात. संयम बाळगावा. व्यवसायात साधारण स्थिती राहील.
- **तूळ** : सरकारी कामांना गती येईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. धार्मिक कार्यात योगदान देता येईल.
- **वृश्चिक** : प्रवासातील भेटी लाभदायक ठरतील. नव्या विचारांना चालना मिळेल. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **धनु** : आपल्याच मतावर आग्रही राहू नका. परिस्थितीची जाण असू द्या. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **मकर** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **कुंभ** : दिलासादायक घटना घडतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. शिक्षण क्षेत्रात संधी लाभतील.
- **मीन** : अनावश्यक खर्च टाळावा. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.

सल्ला मोलाचा

## एंजॉय ऑफिस पार्टी

सर्व व्यवस्थापनांमध्ये ताळमेळ असावा, सहकाऱ्यांना जाणून घेता यावं, यासाठी ऑफिस पार्टीचं आयोजन केलं जातं. पार्टीमधील तुमचा वावर आत्मविश्वासपुर्वक असला पाहिजे. पार्टीमध्ये खाणं आणि ड्रिंक्स किती प्रमाणात घ्यावीत, हे ठरवायला हवं. कितीही आत्मविश्वास असला तरी ऑफिस पार्टीमध्ये प्रमाणाबाहेर ड्रिंक्स घेणं टाळावं. एटीकेट्ससाठी एखादं ड्रिंक्स चालू शकतं. आत्मविश्वासाच्या कमतरतेमुळे अनेकजण ऑफिस पार्टीला जाणं टाळतात. खरं पाहता पार्टीमध्ये न गेल्याने तुमच्या स्वभावातील उर्मटपणा दिसून येतो. ऑफिस पार्टीकडे आव्हान म्हणून न बघता संपर्क निर्मितीची संधी म्हणून पाहणं गरजेचं आहे. पार्टीत गप्पा मारताना नाजूक विषयांवर थेट टिप्पणी करणं देखील टाळावं. नवीन व्यक्तींशी ओळख करून घेताना स्वत:बद्दल संक्षिप्त स्वरुपात माहिती द्या. पार्टीमध्ये सिनीयर-ज्युनिअर हा भेद नसला तरी वरिष्ठ तुमचे मित्र नाहीत ही बाब विसरू नका. पार्टी सुरू झाल्यापासून संपेपर्यंत थांबणं गरजेचं नसतं. तुम्ही पार्टीतून लवकर निघणार असाल तर टीम मॅनेजरला तशी कल्पना द्यायला विसरू नका. पार्टीमधून निघायच्या आधी संयोजकांचे आभार मानायला विसरू नका.

## ३ जून

दिनविशेष

- **२०१३** : अभिनेता विंदू दारासिंग कोलकाता नाइट राइडर्सचा सीईओ वेंकी मैसूरच्या संपर्कात असल्याची धक्कादायक माहिती उघड.
- **२०१५** : 'मॅगी'वरून हलकल्लोळ. दिल्लीमध्ये बंदी.
- **२०१७** : 'जीएसटी'त सोन्यावर तीन टक्के कर. समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब.
- **२०१८** : भारताने स्वदेशी बनावटीच्या अण्वस्त्रवाहू 'अग्नी-५' या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

महत्त्वपूर्ण काही

## ५ तास चार्जिंग ५०० तास बॅकअप

स्मार्टफोन उत्पादित करणाऱ्या सर्व कंपन्यांचा बॅटरीची क्षमता वाढवण्यावर भर असतो. बॅटरीचा बॅकअप वाढवण्यासाठी फोनच्या हार्डवेअरमध्येही बरेच बदल करणं गरजेचं असतं. हे लक्षात घेऊनच अमेरिकेतल्या मिसौरी विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी नवं तंत्रज्ञान विकसित केलं आहे. या तंत्रज्ञानामुळे स्मार्टफोन आणि लॅपटॉपच्या बॅटरीची क्षमता दुपटीने वाढवता येऊ शकेल.

संशोधकांनी एक चुंबकीय उपकरण तयार केलं आहे. 'युनिडायरेक्शनल' असं या तंत्रज्ञानाचं नाव आहे. यात वीज एकाच दिशेने पुढे सरकवली जाते. त्यानंतर उपकरणातले मॅग्नेटिक डायोड ट्रांझिस्टर आणि ॲम्प्लिफायर विजेची क्षमता वाढवतात. या उपकरणाने मोबाईल किंवा लॅपटॉप पाच तास चार्ज केला तर ५०० तासांचा बॅटरी बॅकअप मिळू शकतो. सध्या हे अनोखं तंत्रज्ञान चर्चेत आहे. येत्या काळात फाईव्ह जी तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. सहाजिकच मोबाईलचा वापर वाढणार आहे. अशा परिस्थितीत ५०० तासांपेक्षा जास्तीचा बॅटरी बॅकअप उपयोगी पडू शकतो. हे तंत्रज्ञान लवकरच उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

पंचांग

**मंगळवार, ३ जून २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ शु.८, नक्षत्र : पू. फाल्गुनी
चंद्रराशी : सिंह , योग : हर्षण
सूर्योदय: ६.०३, सूर्यास्त: ७.११

फॉरवर्डस


**आज गैरों से खोल बैठे हैं वो राज अपने।**

**शायद अपनों ने इतना तन्हा कर दिया।**

आरोग्यमंत्र

## भागवा प्रथिनांची गरज

आहारातून शरीराची प्रथिनांची गरज भागत नसेल तर. ती भागवण्यासाठी सप्लिमेंट्स म्हणजे प्रोटिन शेक, प्रोटिन बार यासारख्या पर्यायी पदार्थांचा वापर केला जातो. पण ही वेळ येऊ नये यासाठी प्रथिनयुक्त घटकांचा आहारात समावेश करायला हवा. त्यासंबंधी...



✻ अंडी हा प्रथिनांचा सर्वोत्तम स्रोत आहे. स्नायूंची क्षमता वाढवण्यासाठी अंडी खाण्याचा सल्ला दिला जातो. प्रथिनांसोबतच यात अमिनो ॲसिड्सही असतात. ✻ अंड्यांनंतर चिकनमध्ये बरीच प्रथिनं असतात. त्यामुळे आहारात चिकनचा समावेश करता येईल. ✻ सुरमईमध्ये प्रथिनांचं प्रमाण २५ टक्क्यांनी जास्त असतं. हा मासा ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सने समृद्ध असतो. त्यामुळे आहारात याचा समावेश असावा. ✻ शाकाहारींसाठी पनीर हा प्रथिनांचा चांगला स्रोत मानला जातो. ✻ चवळी, राजमा यासारखी कडधान्यंही प्रथिनांचा उत्तम स्रोत मानली जातात. वजन कमी करायचं असेल तर हा पर्याय निवडता येईल. ✻ बदाम, सूर्यफुलाच्या बिया, जवस, सुका मेवा आणि भोपळ्याच्या बियांमधून तुम्हाला प्रथिनं मिळू शकतात. ✻ रोजच्या आहारात डाळींचा समावेश करा. सकाळी आणि रात्रीच्या जेवणात आमटी, वरण अवश्य ठेवा. डाळींमध्ये प्रथिनांचं प्रमाण बरंच जास्त असतं. मिश्र डाळींची आमटी किंवा चणा डाळ घालून केलेल्या भाज्या हा सुद्धा प्रथिनं मिळवण्याचा चांगला पर्याय आहे. ✻ चणे आणि शेंगदाण्यामधूनही प्रथिनांची गरज भागवली जाते.

वाचा तर खरं

त्यामुळे माध्यमांच्या बदलत्या पर्यायांबाबतही तुमच्याकडे माहिती असायला हवी. माध्यम क्षेत्र आता प्रेस रिलीजवर फार अवलंबून रहात नाही. वार्ताहर, पत्रकारांनी आणलेल्या बातम्यांवर त्यांनी लक्ष केंद्रित केलं आहे. माध्यमांचा आवाका वाढल्याने या क्षेत्रात रियल टाईम पीआरला महत्त्व आलं आहे. बातमी झटपट लोकांपर्यंत पोहोचवण्याचं कौशल्य आत्मसात करणं गरजेचं आहे. येत्या काळात पीआरचं क्षेत्र व्हिडिओवर अवलंबून राहणार आहे. संबंधित माहितीसोबत डेटाही जारी करण्यावर पीआर कंपन्यांचा भर असेल. त्यामुळे पीआरच्या क्षेत्रात काम करण्यासाठी आता स्वत:मध्ये बदल घडवावे लागणार आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### कोर्टाबाहेर रणजीत कासलेची घोषणाबाजी

**मुंबई :** बीडचा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यानं मुंबई मुख्य न्याय दंडाधिकारी कोर्टाबाहेर "इन्कलाब जिंदाबाद, महाराष्ट्र सरकार हायहाय आणि स्वराज्य शक्तीसेना जय हो, करूणा मुंडे जय हो" अशी घोषणाबाजी केली. कासलेला मुंबईतील मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्टानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील सायबर विभागात कासलेविरोधात दोन गुन्हे नव्यानं दाखल करण्यात आले आहेत. तसेच मुंबईत देखील कासलेविरोधात गुन्हा दाखल आहे. समाजात तेढ निर्माण करणं आणि राजकीय नेत्यांवर बेछूटपणे गंभीर आरोप केल्याप्रकरणात फरार कासलेला अटक करण्यात आली आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या पथकानं सापळा रचून त्याला दिल्लीतून अटक केली आहे. रणजीत कासलेला रिमांडसाठी किल्ला कोर्टात सोमवारी हजर करण्यात आलं होतं. पुढील चौकशीकरता मुंबई पोलिसांनी त्याची पोलीस कोठडी आणखी दोन दिवसांनी वाढवून मागितली होती. तो जर पुरावे देत आहे त्याचा मागचा उद्देश काय आहे, याचा तपास करण्यासाठी सरकारी वकिलांनी पोलीस कोठडी वाढवून मागितली. मात्र रणजित कासले पहिल्या दिवसापासूनच तपासात सहकार्य करत आहे. त्यामुळं अधिक पोलीस कोठडीची गरज नाही, असं कासलेचे वकील नवनाथ देवकते यांनी कोर्टाला सांगितलं होतं.

# बिहारमध्ये दिवाळीत मतदान?

## मुख्य निवडणूक आयुक्तांचा जून महिन्यात दौरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुका दोन किंवा तीन टप्प्यांमध्ये घेतल्या जाऊ शकतात, अशी माहिती निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिली आहे. यावेळी दिवाळी (२० ऑक्टेबर) आणि छठपूजा (२८ ऑक्टोबर) या मोठ्या सणांचा विचार करून मतदानाचे वेळापत्रक ठरवले जाणार आहे. सध्याच्या विधानसभा कालावधीचा शेवट २२ नोव्हेंबरला होत असल्यामुळे, त्याआधी सर्व निवडणूक प्रक्रिया – मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर – पूर्ण व्हायला हवी. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार या महिन्यात तिथल्या निवडणूक तयारीची पाहणी करण्यासाठी बिहारच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

निवडणूक आयोगाकडून सध्या बीएलओ यांना प्रशिक्षण दिलं जात आहे, जेणेकरून निवडणूक निष्पक्ष राहील आणि मतदार यादीविषयी कोणतेही आरोप टाळता येतील. २०२४ च्या महाराष्ट्र, हरियाणा आणि दिल्ली निवडणुकांनंतर काँग्रेस व इतर विरोधी पक्षांनी मतदार यादीत गोंधळाचा आरोप केला होता. त्याच पार्श्वभूमीवर बीएलओ अधिकाऱ्यांना ओळखपत्रं देण्यात येणार आहेत आणि ते घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करतील.

मतदार यादी अपडेट करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे, ज्यामुळे नवीन मतदार (१८ वर्षे पूर्ण केलेले) नोंदवता येतील आणि डुप्लिकेट मतदार ओळखपत्रांचा त्रास टाळता येईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) गैरवापराच्या संभाव्य धोक्यांविषयी जागरूक असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करत आहे.

२०२० मध्ये बिहार विधानसभा निवडणुका तीन टप्प्यांमध्ये पार पडल्या – २८ ऑक्टोबर, ३ नोव्हेंबर आणि ७नोव्हेंबर. निकाल १० नोव्हेंबरला जाहीर झाले. भाजप आणि जनता दल (युनायटेड) आघाडीकडून जोरदार विजय झाला होता. मात्र, त्यानंतर मोठं राजकीय नाट्य उभं राहिलं. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २०२२ मध्ये भाजपला रामराम ठोकत आरजेडी (राष्ट्रीय जनता दल) सोबत हातमिळवणी केली. पण २०२४ च्या सुरुवातीलाच त्यांनी पुन्हा एकदा पलटी मारत भाजपकडे पुनरागमन केलं.

# दहशतवादी साकिब नाचनच्या घरावर छापा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बोरिवली गावात असलेल्या दहशतवादी साकिब नाचनच्या घरावर महाराष्ट्र एटीएसने छापा टाकलाय. भिवंडी ग्रामीण पोलिसांच्या मदतीने मध्यरात्रीनंतर हा छापा टाकण्यात आला. छापेमारीची कारवाई अद्यापही सुरू आहे. यापूर्वी एनआयए आणि एटीएस दोघांनीही साकिब नाचनच्या घरावर कारवाई केली होती. साबिक नाचनचा मुलगा अकिब नाचनला यापूर्वीही एनआयएच्या कारवाईचा सामना करावा लागला होता. त्यालाही अटक केली होती.

ठाणे ग्रामीणचे अतिरिक्त एसपी डॉ. डी. एस. स्वामी, अतिरिक्त एसपी ठाणे ग्रामीण शेकडो पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी उपस्थित आहेत. सर्च ऑपरेशन अद्यापही सुरू आहे. २० ते २२ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून, त्यांची चौकशी सुरू आहे. २०१७ मध्ये शिक्षा पूर्ण केल्यानंतर साकिब नाचनने पुन्हा दहशतवादी कारवायांमध्ये भाग घेतल्याचा एटीएसला संशय आहे.

२००३ मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून, या घटनांनी संपूर्ण देशाला हादरवून टाकले. साकिब नाचनवर या बॉम्बस्फोटांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावल्याचा आरोप होता. छाप्यादरम्यान काही महत्त्वाचे पुरावे सापडले आहेत, असे मानले जाते.

बंदी घातलेल्या स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) च्या साकिब याला आधीच २ दहशतवादी प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले होते. यामध्ये २००२-२००३ मध्ये मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन विलेपार्ले आणि मुलुंड बॉम्बस्फोटांचा समावेश आहे. या दहशतवादी घटनांमध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. २०१७ मध्ये शिक्षा पूर्ण झाल्यानंतर पुन्हा कट्टरपंथी कारवायांमध्ये सहभागी झाल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

# 'त्या' बलात्कार प्रकरणातील आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** तामिळनाडूसह देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या चेन्नई येथील अण्णा विद्यापीठातील बलात्कार प्रकरणातील आरोपी ज्ञानशेखरन याला सोमवारी (दि. २) विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ज्ञानशेखरनला किमान ३० वर्षे तुरुंगवास भोगावा लागेल.न्यायाधीशांनी त्याच्याविरुद्ध सिद्ध झालेल्या ११ आरोपांपैकी प्रत्येकी ११ आरोपांबाबत शिक्षा सुनावली. न्यायाधीशांनी सांगितले की, शिक्षा एकाच वेळी भोगाव्या लागतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मागील आठवड्यात चेन्नईतील महिला न्यायालयाने ज्ञानशेखरनला सर्व ११ आरोपांमध्ये दोषी ठरवले होते. तसेच आरोपी कागदोपत्री आणि फॉरेन्सिक पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्याचेही स्पष्ट केले होते. शिक्षा सुनावणीपूर्वी ज्ञानशेखरन याने आईच्या खराब प्रकृतीचा हवाला देत दया दाखवण्याची विनंती केली होती. न्यायालयाने ही विनंती फेटाळली.

ज्ञानशेखरन हा अण्णा विद्यापीठ कॅम्पसजवळ बिर्याणीचा स्टॉल चालवत होता. २३ डिसेंबर २०२४ रोजी रात्री त्याने विद्यापीठ आवारात प्रवेश करुन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केला तसेच पीडितेच्या मित्रावर हल्लाही केला होता. ज्ञानशेखरनने या घटनेचा व्हिडिओ रेकॉर्ड केला आणि पीडितांना ब्लॅकमेल करण्यासाठी त्याचा वापर केला. ग्रेटर चेन्नई पोलिसांनी त्याला अटक केली होती. या प्रकरणाच्या चौकशीसाठी राष्ट्रीय महिला आयोगाने एक समिती स्थापन केली होते. गुन्हा घडलले ठिकाण हे उच्च-सुरक्षा क्षेत्रातील राजभवन आणि आयआयटी मद्रास विद्यापीठ कॅम्पसजवळ होते. येते. पोलिसांनी कॅम्पसमध्ये लावलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि आरोपी ज्ञानशेखरनला अटक केली होती.

# वैमानिकामुळे वाचला १७५ प्रवाशांचा जीव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पाटणा येथून रांचीकडे येणाऱ्या इंडिगोच्या प्रवासी विमानाला ४ हजार फूट उंचीवर गिधाडाटा धक्का बसल्याने विमानात तांत्रिक बिघाड झाला. या घटनेनंतर वैमानिकाने तातडीने निर्णय घेत, विमानाची सुरक्षितपणे आपत्कालीन लँडिंग रांचीच्या बिरसा मुंडा विमानतळावर केली. विमानात १७५ प्रवासी प्रवास करत होते, आणि सर्व प्रवासी सुखरूप असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

ही घटना सोमवारी दुपारी १.१४ वाजता घडली. विमान रांचीपासून १० ते १२ नॉटिकल मैल अंतरावर होते आणि ३ हजार ते ४ हजार फूट उंचीवर उड्डाण करत असताना, विमानाला गिधाडाने धडक दिली. त्यामुळे विमानाला धक्का बसला. विमानाच्या संरचनेला (फ्युसेलाज) डेंट पडल्याची माहिती देण्यात आली आहे.

बिरसा मुंडा विमानतळाचे संचालक आर. आर. मौर्य यांनी माहिती देताना सांगितले की, "विमानात सर्व प्रवासी सुरक्षित असून कोणालाही दुखापत झालेली नाही. विमानाला झालेल्या नुकसानाची इंजिनीअर तपासणी करत आहेत. विमानाचे पुढील उड्डाण कोलकात्याच्या दिशेने होणार होते, पण आता ते पुढील निर्णयासाठी थांबवण्यात आले आहे."

### विमानाला पक्ष्यांची धडक – वाढती चिंता

- भारतातील विमानवाहतुकीमध्ये पक्ष्यांनी दिलेल्या धडकांमुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढताना दिसत आहे. यामुळे प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेची बाब बनली आहे. अशा घटना टाळण्यासाठी विमानतळ परिसरातल्या घनकचरा व्यवस्थापनाकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे विमानतळ प्रशासनाने यापूर्वीही नमूद केले आहे.

# देशात कोरोनाचा संसर्ग वाढला



**नवी दिल्ली :** मागील काही दिवसांपासून देशातील विविध राज्यांमध्ये कोरोना संसर्ग वाढल्याचे चित्र आहे. सोमवारी (दि. २ जून) सकाळी सकाळी ८:०० वाजेपर्यंत देशात कोरोनाचे सक्रिय रुग्णांची संख्या ३९६१ वर पोहोचली. तसेच यावर्षी संसर्गामुळे झालेल्या एकूण मृत्यूंची संख्या ३२ झाली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मते, मागील दिवसाच्या तुलनेत सक्रिय रुग्णांच्या संख्येत २०३ ची वाढ झाली आहे, तर मागील २४ तासांमध्ये चौघांचा मृत्यू झाला आहे.

ताज्या आकडेवारीनुसार, रविवारपासून दिल्लीत सर्वाधिक ४७ रुग्णांची नोंद झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये ४४, केरळमध्ये ३५, महाराष्ट्रात २१, गुजरातमध्ये १८ आणि कर्नाटकात १५ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेशबद्दल रविवारपासून येथे आठ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. राजस्थानमध्ये सात, मध्य प्रदेशात चार, बिहारमध्ये तीन आणि छत्तीसगडमध्ये एक रुग्ण आढळला आहे.

# दहशतवादाचा तीव्र निषेध

## शशी थरूर यांच्यासह सर्वपक्षीय शिष्टमंडळाची भूमिका



**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी अमेरिकेतील कोलोराडो येथे ज्यूंच्या कार्यक्रमावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. यावेळी त्यांनी संपूर्ण जगाला संदेश दिला आहे की, भारत आणि अमेरिकेसारख्या देशांमध्ये दहशतवादाला स्थान नाही. कोलोरॅडोमध्ये एका पॅलेस्टिनी समर्थकाने ज्वलनशील पदार्थ फेकून लोकांच्या जमावावर हल्ला केला. या हल्ल्यात अनेक जण जखमी झाल्याची माहिती आहे.

शशी थरूर यांनी सोमवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, भारतीय खासदारांच्या शिष्टमंडळातील सदस्यांनी कोलोरॅडोमधील बोल्डर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. कोणीही मारले गेले नाही, हे ऐकून आम्हाला दिलासा मिळाला आहे. दहशतवादाला आपल्या देशात स्थान नाही, या परराष्ट्रमंत्री रुबिओ यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत.

काँग्रेस खासदार शशी थरूर सध्या पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद आणि ऑपरेशन सिंदूरशी संबंधित घडामोडींची माहिती देण्यासाठी भारताने पाठवलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत आहेत. तत्पूर्वी थरूर रविवारी ब्राझीलची राजधानी ब्रासिलिया येथे पोहोचले. मंगळवारी शशी थरूर आणि इतर खासदार अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारतीय खासदारांच्या शिष्टमंडळातील सदस्यांनी आज कोलोरॅडोतील बोल्डर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची चिंता व्यक्त केली. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचा आम्हाला दिलासा आहे.

### कोलोराडो हल्ला

- अमेरिकेत एका पॅलेस्टिनी समर्थकाने ज्यू कार्यक्रमासाठी जमलेल्या वृद्धांच्या जमावावर हल्ला केला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हल्लेखोराने कोलोराडोमधील बोल्डर शहरातील एका न्यायालयाजवळ ही घटना घडवून आणली, ज्यात किमान ८ जण जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित मोहम्मद साबरी सोलीमान याने मोलोटोव्ह कॉकटेल फेकून जमावावर हल्ला केला. एफबीआयने या प्रकरणाचा तपास सुरू केला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

पान १ वरून

### भारतात जी-२० तर...

जी-२० आयोजित करतो, तिथे पाकिस्तान टी-२० टॉप २० दहशतवाद्यांचे आयोजन करतो. या दहशतवाद्यांना पाकिस्तान सरकारकडून थेट मदत, निवारा, प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ दिले जाते. हे त्यांच्या धोरणाचाच भाग आहे.

प्रियंका चतुर्वेदी यांनी पाकिस्तानवर "हात मिळवून पाठीत खंजीर खुपसणारा" असा आरोप करत, ओसामा बिन लादेनचा दाखला दिला. ओसामा बिन लादेन याला पाकिस्तानमध्ये लपवून ठेवलेला होता. अमेरिकेचा सहयोगी असूनही त्यांनी बिन लादेनला लपवले. एक डॉक्युमेंटरी आहे – तुम्ही सर्वांनी पाहावी, त्यातून हे स्पष्ट होते की पाकिस्तान त्याला कसा संरक्षण देत होता, असे त्या म्हणाल्या. भारताच्या या अतिरेकीविरोधी मोहिमेचा उद्देश जगभर पाकिस्तानच्या भूमिकेचे वास्तव समोर आणणे असल्याचे त्यांनी सांगितले

### 'नागपूर-मुंबई' सुस्साट!

होत्या. दरम्यान, मुंबईहुन नाशिकला जाण्यासाठी साधरण पावणेचार तासांपेक्षा अधिक वेळ लागतो. मात्र समृद्धी महामार्गामुळे हा वेळ कमी होऊन अवघ्या अडीच ते तीन तासांवर येणार आहे. जवळपास सव्वा तासाची बचत होणार आहे. सुमारे ४० किलोमीटरचे अंतर घटल्याने ७.७४ किलोमीटरच्या शहापूर तालुक्यातील वाशाळा येथील राज्यातील सर्वात मोठ्या बोगद्यामुळे कसारा घाट ओलांडणे सोपे झाले आहे. या समृद्धी महामार्गाची एकुण लांबी ७०१ किलोमीटर आहे. तर रुंदी १२० मीटर इतकी आहे. ६ लेन आहेत. दरम्यान तब्बल २६ टोलनाके व ५ बोगदे आहेत.

### सुकमामध्ये १६ नक्षलवाद्यांचे...

करण्याचा निर्णय घेतला. यावेळी एसपी किरण चव्हाण, एसएसपी उमेश गुप्ता आणि सीआरपीएफसह अनेक पोलिस अधिकारी उपस्थित होते. सुकमाचे एसपी किरण चव्हाण म्हणाले, सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद संपवण्याच्या मोहिमेत पोलिस आणि सीआरपीएफकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांमुळे प्रभावित होऊन, आज १६ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. एसपी किरण चव्हाण यांच्या माहितीनुसार, यापैकी ६ नक्षलवाद्यांवर प्रशासनाने २५ लाखांचे बक्षीस जाहीर केले आहे. बटालियन आणि ओडिशासारख्या इतर विभागातील नक्षलवाद्यांनीही आत्मसमर्पण केले आहे. या नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणानंतर एक गाव पूर्णपणे नक्षलमुक्त झाले आहे, ज्याला प्रशासनाकडून १ कोटी रुपये दिले जातील.


### मेहबूबा मुफ्ती यांनी घेतली राज्यपालांची भेट

त्यांनी नायब राज्यपालांना एक पत्र दिले आहे, जे मुख्यमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही पाठवण्यात आले आहे. ७४ हजारांहून अधिक विस्थापित काश्मीरी कुटुंबांपैकी अनेकांना परत यायचे आहे आणि त्यांना यामध्ये आपण मदत केली पाहिजे. २०१९ मध्ये कलम ३७० हटवल्यानंतर पहिल्यांदाच मेहबुबा नायब राज्यपालांना भेटल्या आहेत.

त्या म्हणाल्या परत येणाऱ्या सर्व काश्मिरी पंडितांना त्यांच्या गृहजिल्ह्यात अर्धा कनाल जमीन देण्यात यावी. जम्मू आणि काश्मीर विधानसभेत काश्मिरी पंडितांना दिलेल्या दोन नामांकित जागांच्या जागी त्यांची जागा राखीव ठेवण्यात यावी. काश्मिरी पंडितांना सन्मानाने आणि शांततेने परतण्यास मदत केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या आहेत.

# सोने पुन्हा महागले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** सोने दरात सोमवारी (दि.२ जून) वाढ झाली. २४ कॅरेट सोन्याचा दर आज ८३७ रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅम ९६,१९२ रुपयांवर खुला झाला. याआधी सोन्याचा दर ९५,३५५ रुपयांवर होता. दरम्यान, चांदीच्या दरात किरकोळ घट दिसून आली आहे.

इंडिया बुलियन आणि ज्वेलर्स असोसिएशनच्या माहितीनुसार, २४ कॅरेट दर प्रति १० ग्रॅम ९६,१९२ रुपये, २२ कॅरेट ८८,११२ रुपये, १८ कॅरेट ७२,१४४ रुपये आणि १४ कॅरेट सोन्याचा दर ५६,२७२ रुपयांवर खुला झाला आहे. तर चांदीचा दर प्रति किलो ९७,३९२ रुपयांवर आहे. याआधी एप्रिल महिन्यात सोने दराने १ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला होता. चांदीनेही मार्च महिन्यात १ लाख ९०० रुपयांवर व्यवहार करत सर्वकालीन उच्चांक गाठला होता.

जगातील वाढत्या व्यापार आणि भू-राजकीय तणावामुळे सोन्याच्या दरात वाढ झाली असल्याचे सराफा बाजारातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून सोन्याकडे वळतात. डॉलरमधील घसरणदेखील सोन्याच्या दरवाढीला कारण ठरली आहे.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांना...

**महिन्यांत पुन्हा कामावर घ्यावे असे आदेशही देण्यात आले आहेत. तक्रारदार सतीश कुमार म्हणाले की, जल विभाग आणि अधिकारी संगनमताने आउटसोर्सिंग कर्मचाऱ्यांचे वेतन, ईपीएफ, ईएसआय निधीमध्ये घोटाळा करत होते. यासंदर्भात विभागाच्या ९३ आउटसोर्सिंग कंत्राटी पंप ऑपरेटर्सनी अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात आपली बाजू मांडताना भारत सरकारने तयार केलेल्या जीईएम पोर्टलद्वारे नोएडा प्राधिकरणाच्या जल विभागाच्या आउटसोर्सिंग कंत्राटी पंप ऑपरेटर्सइतकेच वेतन देण्याची मागणी केली होती.**

### तृणमूल काँग्रेसचा...

रोखण्याची जबाबदारी तृणमूल सरकारची नाही. मात्र, आमच्यावर आरोप करून शहा स्वत:चीच अकार्यक्षमता सिद्ध करत आहेत. त्यांनी राजीनामा द्यायला हवा. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला घडला. त्यातून सुरक्षा आणि गुप्तचरविषयक त्रुटी उघड झाल्या. तो हल्ला घडवणारे दहशतवादी अद्याप हाती लागलेले नाहीत. राष्ट्रीय सुरक्षा स्थिती खालावण्याला शहा यांना जबाबदार धरायला हवे, असा शाब्दिक हल्लाबोल महिला नेत्यांनी केला. ममतांच्या नेतृत्वाखाली तृणमूल सलग चौथ्यांदा बंगालची सत्ता मिळवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### मुंबई पालिकेकडून तुर्की कंपनीचे कंत्राट रद्द

बचाव यंत्र खरेदी केले जाणार होते.

मात्र, भारत-पाक संघर्षात पाकला तुर्कीकडून मदत करण्यात आली होती.



यामुळे हे भाजप आणि उद्धवसेनेने या कंत्राटाला विरोध दर्शवला. अखेर या प्रकल्पासाठी देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला.

असे होते रोबोटिक बचाव यंत्र...

रिमोट कंट्रोलने हाताळणी. रोबोटची वहनक्षमता २०० किलोग्रॅमपर्यंत.

समुद्रात प्रतितास १८ किमी वेगाने हा रोबोट पोहोचू शकतो.

साधारण ८०० मीटर आणि त्याही पेक्षा जास्त लांब रोबोट जाऊ शकतो.

हा रोबोट एक तास कार्यरत राहू शकतो व त्याला पुन्हा चार्ज करता येते.

### हुंडा बंद, दोनशे लोकांत लग्न

#### आचारसंहितामध्ये ठरलेले मुद्दे

- लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मुलीशी मोबाईलचा वापर गरजे पुरताच करावा.
- पैशासाठी सुनेचा छळ करू नये.
- भोजन प्रसंगी, अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी किंवा जेवणात ७ पेक्षा जास्त पदार्थ नकोत.
- लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आर्शीवाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा, गरज वाटल्यास श्रद्धांजलीसाठी वेगळा विशेष कार्यक्रम घ्यावा.

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार विठ्ठल हरिभाऊ कुमकर रा. महुडे खुर्द ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म - मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार अर्जदार यांची पत्नी कै. अनुसया विठ्ठल कुमकर यांचा मृत्यु मौजे. महुडे खुर्द ता. भोर जि. पुणे येथे दि. ११/१२/२००३ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म - मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून १५ दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप/हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि.२७/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यु/एस. आर/४३८/२०२५
दिनांक :- २७/०५/२०२५
ठिकाण :- भोर

सही/-
**डॉ. विकास खरात**
उपविभागीय अधिकारी
तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर



## सिक्कीममध्ये लष्करी छावणीवर भूस्खलन

**गंगटोक :** सिक्कीममधील छातेन येथे लष्करी छावणीवर भूस्खलन झाल्याने तीन लष्करी जवानांचा मृत्यू झाला आणि सहा सैनिक बेपत्ता झाले, अशी माहिती संरक्षण अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. रविवारी संध्याकाळी ७ वाजता मंगन जिल्ह्यातील लाचेन शहराजवळ भूस्खलन झाले, परंतु या भागात मुसळधार पाऊस पडला, असे त्यांनी सांगितले. "... या प्रदेशात मुसळधार आणि सततच्या पावसामुळे एक भयानक भूस्खलन झाले ज्यामध्ये हवालदार लखविंदर सिंग, लान्स नाईक मुनीश ठाकूर आणि पोर्टर अभिषेक लखाडा असे तीन सैनिकांचा मृत्यू झाला," असे अधिकाऱ्यांनी एका निवेदनात म्हटले आहे.



सिक्कीम: मंगन जिल्ह्यातील लाचेन शहराजवळ भूस्खलन झाले

## पत्रिका वाटून परतणाऱ्या जोडप्याचा अपघाती मृत्यू

**बिजनोर (उत्तरप्रदेश) :** उत्तर प्रदेशातील बिजनोर जिल्ह्यात आपल्या मुलाच्या लग्नाची पत्रिका वाटून मोटारसायकलवरून परतणाऱ्या एका जोडप्याचा रस्ते अपघातात मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. नगीना स्टेशन हाऊस ऑफिसर तेजपाल सिंह यांनी सांगितले की, ६२ वर्षीय खुब सिंग आणि त्यांची पत्नी ५६ वर्षीय लाली देवी हे रविवारी रात्री ९ जून रोजी होणाऱ्या त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी नातेवाईकांना कार्ड वाटून मोटारसायकलवरून परतत होते, तेव्हा एका अज्ञात वाहनाने नगीना-धामपूर रस्त्यावर त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यांना सामुदायिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, असे पोलिसांनी सांगितले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

## केरळमध्ये उन्हाळी सुट्टीनंतर विद्यार्थी परतले




**अलाप्पुझा (केरळ) :** दोन महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर केरळमधील शैक्षणिक संस्था पुन्हा सुरू झाल्याने सोमवारी ४० लाखांहून अधिक मुले शाळांमध्ये परतली. नैऋत्य मान्सूनच्या आगमनामुळे गेल्या आठवड्यात राज्यातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला असला तरी, सोमवारी सकाळी केरळमध्ये सामान्यतः तुलनेने चांगले हवामान होते. शहरे आणि गावे दोन्ही ठिकाणी असलेल्या शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचे औचित्य साधून नवीन पुस्तके, दप्तरे आणि गणवेश घेऊन परतणाऱ्या उत्साही मुलांची गर्दी दिसून आली.

## चहाचे मळे इको टुरिझम पार्क होणार

**आगरतळा :** त्रिपुरा सरकारने पर्यटनाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यासाठी दक्षिण त्रिपुराच्या सबरूममधील लुधुआ चहाच्या मळ्याचा इको टुरिझम स्पॉट म्हणून विकास करण्याचा निर्णय घेतला आहे, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. २२ एकर जमिनीवर उभारलेल्या या चहाच्या मळ्यातून काळ्या आणि हिरव्या चहासह मोठ्या प्रमाणात चहाचे उत्पादन होते. राज्याच्या पर्यटन मंत्री सुशांत चौधरी यांनी सोमवारी पर्यटन संचालक प्रशांत बादल नेगी आणि माजी आमदार शंकर रॉय यांच्यासह चहाच्या मळ्याला भेट दिली आणि स्थानिक अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

## जंगली म्हशींच्या हल्ल्यात २ जणांचा मृत्यू

**तेजपूर (आसाम) :** आसामच्या सोनितपूर जिल्ह्यातील तेजपूर शहरात सोमवारी एका जंगली म्हशीने हल्ला केल्याने दोन जणांचा मृत्यू झाला आणि इतर दोघे जखमी झाले, अशी माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्याने दिली. तेजपूरमधील दलदलीत अडकलेला प्राणी असल्याने स्थानिक वन अधिकारी त्याला शांत करण्यासाठी काझीरंगाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्कात आहेत, असे त्यांनी सांगितले. विभागीय वन अधिकारी (तेजपूर) चंपक डेका यांनी सांगितले की, सोमवारी पहाटे जहाजघाट परिसरात जंगली म्हशीने धरसन दासवर हल्ला करून त्याला ठार मारले.

# पहलगाम प्रकरणाशी आपला संबंध नाही

## पाकच्या प्रतिनिधीचा सिंगापूर येथे दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या महिन्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षामुळे वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सिंगापूरमध्ये झालेल्या 'शांगरी-ला डायलॉग'मध्ये दोन्ही देशांच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी आपली मते मांडली. शांगरी-ला डायलॉग हा आशियातील प्रमुख संरक्षण मंच म्हणून ओळखला जातो.

दोन्ही शेजारी देशांमधील दीर्घकाळापासून सुरू असलेल्या तणावाकडे शुक्रवार ते रविवार दरम्यान झालेल्या जागतिक संरक्षण मंचाच्या बैठकीकडे लक्ष वेधले गेले. एप्रिल महिन्यात जम्मू-काश्मीरच्या पहलगाम मध्ये पर्यटकांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यासाठी भारताने पाकिस्तानस्थित दहशतवादी गटांना जबाबदार धरले, तर पाकिस्तानने यात आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. भारत आणि पाकिस्तान भौगोलिकदृष्ट्या एकमेकांच्या शेजारी आहेत, त्याचप्रमाणे दोन्ही देशांचे काही वरिष्ठ जनरल शनिवारी दुपारी शांगरी-ला डायलॉगदरम्यान शेजारच्या कॉन्फरन्स रूममध्ये बसले आणि त्यांनी डिफेन्स इनोव्हेशन सोल्यूशन्सपासून ते प्रादेशिक संकट-व्यवस्थापन यंत्रणेपर्यंतच्या विषयांवर एकाच वेळी सत्रांमध्ये भाग घेतला.

ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करताना भारतीय लष्कराचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल अनिल चौहान म्हणाले की, भारताने राजकीयदृष्ट्या जे काही केले आहे, त्यामुळे दहशतवाद सहन न करण्याची नवी लक्ष्मणरेषा निर्माण झाली आहे. लष्करी क्षेत्रात मोडणारी ही विशेष मोहीम आपल्या शत्रूंसाठीही धडा ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. भारताच्या सहिष्णुतेची हीच मर्यादा आहे, याचा धडा त्यांना मिळेल, अशी आशा आहे. आम्ही जवळपास दोन दशकांपासून या छद्म युद्धाचा सामना केला आहे आणि आम्ही बरेच लोक गमावले आहेत. आता आम्हाला या दहशतवादी कारवाया पूर्णपणे थांबवायच्या आहेत, असे ते म्हणाले.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या





दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यासाठी ७ मे रोजी सकाळी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू करण्यात आले होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. पाकिस्तानी हल्ल्यांनंतरच्या सर्व प्रत्युत्तरात्मक कारवाया या मोहिमेअंतर्गत करण्यात आल्या. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चार दिवसांपासून सुरू असलेला लष्करी संघर्ष १० मे रोजी लष्करी कारवाई थांबवण्याच्या कराराने संपुष्टात आला.

पुन्हा संघर्ष झाल्यास काय होऊ शकते, असा इशारा पाकिस्तानी लष्कराच्या जॉइंट चीफऑफ स्टाफ कमिटीचे अध्यक्ष जनरल साहिर शमशाद मिर्झा यांनी दिला. पुढच्या वेळी असा संघर्ष झाला आणि शहरांना आधी टार्गेट केले गेले आणि सीमा अप्रासंगिक ठरल्या तर परिस्थिती धोकादायक पातळीवर बिघडू शकते, असे ते या कार्यक्रमात म्हणाले. मर्यादित कालावधीमुळे आंतरराष्ट्रीय समुदायाच्या हस्तक्षेपामुळे आधीच नुकसान आणि विनाश झाला असावा, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. नुकत्याच झालेल्या शत्रुत्वाच्या पार्श् वभूमीवर दोन्ही बाजूंनी शस्त्रास्त्रांकडे पाठ फिरवली असून, भारताने जगभरातील ३० हून अधिक राजधान्यांना भेटी देण्यासाठी अनेक शिष्टमंडळे पाठवली आहेत.

२ जूनपासून पाकिस्तानकडूनही असाच प्रयत्न केला जाणार आहे. २७ मे रोजी सिंगापूरमधील मुक्कामादरम्यान पूर्व आणि आग्नेय आशियाचा दौरा करणाऱ्या सर्वपक्षीय भारतीय शिष्टमंडळाचे सदस्यही या चॅनेलचे होते. काँग्रेस पक्षाचे नेते आणि माजी परराष्ट्रमंत्री सलमान खुर्शीद यांनी हा प्रयत्न अभूतपूर्व असल्याचे मत व्यक्त केले. हे एक प्रकारचे इनोव्हेशन आहे. आणि वस्तुस्थिती अशी आहे की (यूएन) सुरक्षा परिषदेचे सर्व सदस्य आणि सुरक्षा परिषदेच्या संभाव्य सदस्यांसाठी जगभरात सात सर्वपक्षीय शिष्टमंडळे आहेत. हे त्या अर्थाने अभूतपूर्व आहे आणि आम्हाला मोठा पाठिंबा मिळाला आहे. पाकिस्तान दहशतवाद संपवण्यासाठी पुरेसे प्रयत्न करत नसल्याच्या भारताच्या आरोपांवर ही कथा पूर्णपणे केंद्रित आहे, असे माध्यमांनी म्हटले आहे.

जनरल मिर्झा म्हणाले की, पाकिस्तान आपल्या भूमीवरील दहशतवादाचा सामना करत आहे आणि तालिबानशासित अफगाणिस्तानमधील गटांकडून सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी काम करत आहे. मिर्झा म्हणाले की, त्यांच्या देशाचे शेकडो अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले आहे आणि दहशतवादामुळे हजारो लोक ांचा मृत्यू झाला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात ९६ तास चाललेल्या या संघर्षाकडे फ्रान्सनिर्मित राफेल लढाऊ विमाने आणि चीननिर्मित जे १०-सी विमाने (चिनी बनावटीच्या क्षेपणास्त्रांनी सज्ज) यासह शत्रूंच्या शस्त्रास्त्र प्रणालीची चाचणी म्हणून पाहिले जात होते.

# बिहारमध्ये चिराग पासवान यांची भूमिका महत्त्वाची

## नितीश कुमार यांच्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमधील निवडणुकीचे रंग आता अधिक उजळू लागले आहेत. निवडणुकीच्या काळात चिराग पासवानची गुगली चर्चेचा केंद्रबिंदू बनली आहे. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या पक्ष लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) ने प्रथम ३० विधानसभा जागांवर दावा केला. आता चिरागच्या एका निर्णयामुळे बिहारमध्ये राजकीय हालचाली वाढल्या आहेत. चिराग पासवान यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचे संकेत देताना म्हटले आहे की याचा फायदा फक्त राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) होईल. चिराग पासवान यांच्या पक्षाने निवडणूक लढवण्याबाबतचा ठराव मंजूर केला आहे. नितीश कुमार यांच्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या तरुणांमध्ये चिरागची गणना होते.

चिराग पासवान हे केंद्र सरकारमध्ये मंत्री आहेत. जर ते केंद्रीय मंत्री असताना बिहार विधानसभा निवडणूक लढवण्याबद्दल बोलत असतील, तर त्यांचे उद्दिष्ट मंत्री बनणे हे नाही हे स्पष्ट आहे. मग त्यांची योजना काय आहे? खरंतर, चिराग पासवान यांना माहिती आहे की जोपर्यंत ते बिहारमध्ये मजबूत आहेत तोपर्यंत



ते केंद्रीय राजकारणात आपले स्थान टिकवून ठेवू शकतील. शेवटी, त्यांच्या राजकारणाचा पाया बिहार आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानपासून हरियाणापर्यंत, भाजप विधानसभा निवडणुकीत आपल्या केंद्रीय मंत्र्यांना उभे करत आहे. २०२० च्या बिहार निवडणुकीत चिरागच्या पक्षाला शून्य जागा मिळाल्या. चिरागची स्वतः निवडणूक रिंगणात उतरण्यामागील रणनीती अशी असू शकते की कदाचित यामुळे काही जागांवर लोजपाला फायदा मिळू शकेल.

बिहारमधील राजकीय तज्ज्ञांच्या मते, राजकारणात कोणतेही तात्पुरते मित्र किंवा शत्रू नसतात. चिरागची रणनीती काही जागा जिंकून त्यांची सौदेबाजीची शक्ती वाढवणे असू शकते, विशेषतः अशा वातावरणात जेव्हा नितीश कुमार यांच्या भविष्याबद्दल अनिश्चितता आहे. 'बिहार फर्स्ट, बिहारी फर्स्ट' सारख्या मोहिमांमध्ये चिरागचीही गणती भावी मुख्यमंत्रीपदाच्या दावेदारांमध्ये होते. त्यांना बिहारचा राजकीय मैदान रिकामा सोडायचा नाही. कमी जागा असूनही जेडीएसचे एचडी कुमारस्वामी मुख्यमंत्री होऊ शकतात, स्वतंत्र मधु कोडा झारखंडचे मुख्यमंत्री होऊ शकतात, नितीश कुमार तिसऱ्या क्रमांकाच्या पक्षाचे नेते असूनही पाच वर्षे सरकार चालवू शकतात, त्यामुळे राजकारणात काहीही होऊ शकते. नितीशच्या भविष्याबद्दलच्या अनिश्चिततेतही चिरागला स्वतःसाठी आशा दिसत आहे.

२००५ मध्ये बिहार विधानसभेच्या निवडणुका दोनदा झाल्या. पहिल्या निवडणुकीत त्रिशंकू जनादेश मिळाला. तेव्हा चिराग पासवान यांचे वडील रामविलास पासवान हे तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारमध्ये मंत्री होते. केंद्र सरकारमध्ये आघाडीचा भागीदार असूनही, लोजपने बिहार निवडणूक एकट्याने लढवली आणि २९ जागा जिंकून पक्ष किंगमेकर म्हणून उदयास आला. त्यानंतर राजद ७५ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आणि एनडीए ९२ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष बनला. काँग्रेसकडे १०, सपाकडे ४, राष्ट्रवादीकडे ३ आणि डाव्यांकडे ११ आमदार होते. आरजेडीला काँग्रेस आणि या लहान पक्षांच्या तसेच केंद्रातील त्यांच्या मित्रपक्ष एलजेपीच्या पाठिंब्याने सरकार स्थापन करण्याचा विश्वास होता, परंतु तसे झाले नाही.

सत्तेची चावी हातात घेऊन चालणाऱ्या रामविलास पासवान यांनी नंतर मुस्लिम मुख्यमंत्रीची मागणी करून समस्या निर्माण केली. नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएने सरकार स्थापन केले, परंतु हे अल्पसंख्याक सरकार जास्त काळ टिकू शकले नाही. नितीश यांना अध्यक्षपद सोडावे लागले आणि त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये पुन्हा निवडणुका झाल्या. २००५ च्या दुसऱ्या निवडणुकीत, लोजपने सत्तेची गुरुकिल्ली गमावली आणि एनडीएने पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले. या निवडणुकांमध्ये चिरागही त्यांच्या पक्षासाठी सत्तेची गुरुकिल्ली शोधत आहे का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# शर्मिष्ठाला बार कौन्सिलचा पाठिंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (बीसीआय) अध्यक्ष मननकुमार मिश्रा यांनी इन्स्टाग्रामची 'इन्फ्लुएंसर' शर्मिष्ठा पनोली ची तात्काळ सुटका आणि निष्पक्ष सुनावणी करण्याची मागणी केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'वर हिंदी चित्रपट अभिनेत्री गप्प असल्याचा दावा करणारी शर्मिष्ठा सोशल मीडियावर पोस्ट केल्याच्या आरोपाखाली कोलकाता पोलिसांनी शर्मिष्ठाला अटक केली आहे.

ज्येष्ठ वकील आणि राज्यसभेचे खासदार मिश्रा म्हणाले की, सोशल मीडिया व्हिडिओबद्दल तात्काळ माफी मागितल्यानंतरही अटक करण्यात आलेल्या आणि न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलेल्या पानोली यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे आहोत. कोलकात्याचा रहिवासी आणि पुण्याच्या लॉ युनिव्हर्सिटीत शिकणाऱ्या २२ वर्षीय 'इन्फ्लुएंसर'ला शुक्रवारी रात्री गुरुग्राममधून अटक करण्यात आली. पनोलीला शनिवारी कोलकाता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिला १३ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

निरपराध लोकांच्या निर्घृण हत्येचा बदला घेण्यासाठी



ऑपरेशन सिंदूरला विरोध करणाऱ्या सरकारला आता अशा दुटप्पीपणावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या कायद्याच्या एका तरुण विद्यार्थ्याला गप्प बसवायचे आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे, असे मिश्रा यांनी म्हटले आहे. खऱ्या लोकशाहीसाठी निष्पक्षता, संयम आणि अधिकारांचे समान संरक्षण आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

शर्मिष्ठा यांच्या अटकेवरून भारतीय जनता पक्षाने रविवारी पश्चिम बंगाल सरकारवर निशाणा साधला आणि तृणमूल काँग्रेस सरकार आपली व्होट बँक खूश करण्यासाठी एका 'तरुण हिंदू महिलेला' लक्ष्य करत असल्याचा आरोप केला. पनोली यांच्या अटकेवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना पश्चिम बंगालचे भाजपचे सहप्रभारी अमित मालवीय यांनी तृणमूल काँग्रेस सरकार तुष्टीकरणाच्या राजकारणाखाली निवडकपणे कायद्याची अंमलबजावणी करत असल्याचा आरोप केला.

# वक्फ दुरुस्ती विधेयक, सर्वोच्च न्यायालयाने निर्णय राखला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वक्फ दुरुस्ती कायद्यावरून झालेल्या गदारोळानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यावर आपला निर्णय राखून ठेवला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तयारी सुरू केली आहे. केंद्रातील भाजप सरकार वक्फ मालमत्तांच्या नोंदणीसाठी नवी वेबसाईट सुरू करणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वक्फच्या संचालनाच्या नियमांबाबत केंद्र सरकार लवकरच राज्यांशी चर्चा करण्याचा विचार करत आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, नव्या वेबसाईटवर देशभरातील वक्फ मालमत्तांचा संपूर्ण तपशील असेल, ज्यात त्यांच्या मुतवल्लींच्या मालमत्तांचा ही समावेश असेल. त्याचबरोबर वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ साठी नियम बनवण्याबाबतही केंद्र सरकार राज्य सरकारांशी चर्चा करणार आहे. या कायद्यानुसार राज्यस्तरीय वक्फ मंडळे राज्य सरकारच्या अखत्यारीत असतील आणि त्यात राज्य सरकारांचेही प्रतिनिधित्व असेल. राज्यांशी सल्लामसलत केल्यानंतर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर केंद्र सरकार वक्फ मालमत्ता आणि वक्फ बोर्डासाठी नियम अधिसूचित करू शकते.

यापूर्वी केंद्र सरकारने एप्रिलमध्ये वक्फ दुरुस्ती कायदा २०२५ अधिसूचित केला होता, त्यानंतर ५ एप्रिल रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाली होती. मात्र, यानंतर काही मुस्लिम संघटना आणि काही खासदारांनी या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्याचवेळी केंद्र सरकारने या याचिकांविरोधात सुधारित वक्फ कायद्याचे समर्थन करणारे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल केले. गेल्या महिन्यात तीन दिवस चाललेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता.



**उत्तर कोरिया** उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांनी लष्करी तळाला भेट दिली, तेव्हा तोफखान्याने त्यांना अशा पद्धतीने सलामी दिली.

# भारताची घुसखोरांविरोधात मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने दहशतवादाविरोधात मोठं युद्ध छेडलं आहे. दरम्यान, भारतानेही घुसखोरांविरोधात मोठी कारवाई सुरू केली आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या महिन्यात ही कारवाई सुरू झाल्यापासून देशात बेकायदा वास्तव्यास असलेल्या हजारो बांगलादेशींना हाकलून देण्यात आले आहे. एका रिपोर्टनुसार, आतापर्यंत २ हजार घुसखोरांना सीमेपलीकडे पाठवण्यात आले असून ही कारवाई अजूनही सुरूआहे. यावेळी भारत-बांगलादेश सीमेवर तणाव




वाढल्याच्या बातम्याही येत आहेत.

७ मे पासून ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यापासून भारतीय अधिकाऱ्यांनी २,००० हून अधिक अवैध बांगलादेशी निर्वासितांना हद्दपार केले आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली. प्रशासनाने देशभरात पडताळणी प्रक्रिया सुरू केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोठ्या कारवाईनंतर कारवाईच्या भीतीने २ हजारांहून अधिक घुसखोर स्वत: सीमेवर पोहोचले आहेत.

ही प्रक्रिया सुरूच आहे, असे सरकारी सूत्रांच्या हवाल्याने वृत्तात म्हटले आहे. लोकांच्या कागदपत्रांची छाननी करून त्यांच्यावर कारवाई केली जात आहे, विशेषत: राज्ये ही महत्त्वाची आर्थिक केंद्रे आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर या प्रक्रियेला वेग आला आहे. याची सुरुवात गुजरात, दिल्ली आणि हरयाणायेथून झाली आहे. लवकरच इतर राज्यांमध्येही ती सुरू करण्यात येणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आसाम, त्रिपुरा आणि मेघालय सारख्या राज्यांमध्ये ही प्रक्रिया वेगाने सुरू आहे. विविध राज्यांतून पकडलेल्या घुसखोरांना भारतीय हवाई दलाच्या विमानांद्वारे भारत-बांगलादेश सीमेवर आणले जात आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. त्यानंतर त्यांना बीएसएफच्या ताब्यात दिले जाते, जे नंतर त्यांना तात्पुरत्या छावण्यांमध्ये ठेवते. काही तासांच्या नजरकैदेनंतर त्यांना सीमेमार्गे बांगलादेशात पाठवले जाते.

### बॉर्डर गार्ड्स बांगलादेशची प्रतिक्रिया

● मिळालेल्या माहितीनुसार, परत पाठवण्यात आलेल्यांपैकी निम्मे लोक गुजरातमधील आहेत. त्याचबरोबर दिल्ली आणि हरयाणातून मोठ्या प्रमाणात घुसखोरांना परत पाठवण्यात आले. याशिवाय आसाम, महाराष्ट्र आणि राजस्थानमधूनही अवैध स्थलांतरितांना पकडण्यात आले आहे. यासंदर्भात गृहमंत्रालयाकडून सूचना देण्यात आल्या असून राज्य सरकारेही यात पूर्ण सहकार्य करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बॉर्डर गार्ड्स बांगलादेश (बीजीबी) देखील या प्रक्रियेत सहकार्य करत आहे.



## निंबूतला विनापरवाना बैलगाडा शर्यत

**बारामती :** प्रशासनाची परवानगी न घेता बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत तेथे जमलेल्या लोकांच्या जीविताला व सुरक्षिततेला धोका पोहोचेल, असे कृत्य केल्याप्रकरणी निंबूत (ता. बारामती) येथील आठ जणांविरोधात वडगाव निंबाळकर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही घटना गुरुवारी घडली. याप्रकरणी पोलिस कर्मचारी नीलेश चंद्रकांत जाधव यांनी फिर्याद दिली. ओंकार प्रदीप काकडे, राजेंद्र बाबूराव काकडे, हर्षवर्धन चंद्रशेखर जगताप-काकडे, सुजित सर्जेराव काकडे, रोहित गोंडे, राजवर्धन चंद्रशेखर काकडे, सार्थक काकडे व ओकार गोंडे (सर्व रा. निंबूत, ता. बारामती) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी हे करंजेपूल दूरक्षेत्र येथे कर्तव्यावर हजर असताना पोलिस उपनिरीक्षक राहुल साबळे यांना या प्रकरणाची माहिती मिळाली. निंबूत गावच्या हद्दीत निरा-मोरगाव रस्त्यालगत पठारावर ओंकार काकडे व इतर आयोजक साथीदारांनी सतीश टेंगले यांच्या मालकीच्या जमीन गट क्रमांक २२५ मध्ये बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. त्यासाठी पोलिस ठाण्याची परवानगी घेण्यात आलेली नव्हती. शर्यतीसाठी येथे अनेक बैलगाडा मालक, चालक त्यांच्या बैलगाड्यासह आले होते. शर्यत पाहण्यासाठी अनेक लोक जमा झाले होते. त्यानुसार, पोलिस उपनिरीक्षक साबळे, हवालदार अमोल भोसले, हवालदार कडवळे हे घटनास्थळी गेले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन प्रशासनाची परवानगी घेतली आहे का, अशी विचारपूस केली. त्या ठिकाणी कोणीही वैद्यकीय अधिकारी तसेच रुग्णवाहिका उपलब्ध नव्हती. शर्यतीच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने बॅरिकेट्स अथवा अन्य उपाय करण्यात आले नव्हते. बैलगाडा शर्यती सुरू होत्या. मोठ्याने आरडाओरडा केला जात होता. बैलगाडा शर्यतीवरून तेथे वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता होती. पोलिसांनी सांगितल्यानंतरही या शर्यती सुरूच ठेवण्यात आल्या. त्यामुळे पोलिसांनी विनापरवाना आयोजनाबद्दल आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

## नवीन प्रीपेड मीटरला विरोध करा

**अवसरी :** आंबेगाव तालुक्यातील महावितरणच्या ग्राहकांनी नवीन प्रीपेड डिजिटल मीटर बसून घेऊ नये. त्याला ग्राहकांनी विरोध करावा.लवकरच महावितरणच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी ग्राहकांचा मेळावा मंचर येथे आयोजित करून आंदोलनाची दिशा ठरवली जाईल,अशी माहिती हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी दिली. तालुक्यातील विविध गावात नवीन मीटर जोडण्यास महावितरण कंपनीच्या वतीने नियुक्त केलेल्या ठेकेदारांमार्फत चालू केले आहे. ते मीटर कोणीही जोडून घेऊ नका. अनेक ग्राहकांचे बिल वाढून आल्याबद्दल तक्रारी खूप येत आहेत. एक वर्षापूर्वी सुद्धा नवीन मीटर जोडलेले ते काढून हे मीटर बसवत आहेत. त्यामुळे कोणीही मीटर बदलून घेऊ नका. मिळालेल्या माहिती नुसार हे नवीन प्रीपेड मीटर आहे. पण ग्राहकांना स्मार्ट मीटर किंवा डिजिटल मीटर असल्याचे सांगून दिशाभूल महावितरण करीत आहे.त्या निळ्या स्लॉटमध्ये सिम कार्ड बसते. सर्व ग्राहकांना याबद्दल गाफिल ठेवून महावितरण अशा प्रकारचे मीटर बसवत आहे आणि या प्रत्येक मीटरचे १३ हजार रुपये ग्राहकांच्या वीज बिलामधून वसूल करणार आहेत. नवीन मीटरची बिले कोणीही भरू नयेत. महावितरणच्या फसव्या योजना वेळेतच हाणून पाडल्या पाहीजेत. अन्यथा वीज ग्राहकांना महावितरणच्या विरोधात मोठे आंदोलन उभारावे लागेल, अशा इशारा बाबाजी चासकर यांनी दिला.

## राजा-प्रधान, आमदार-मल्हार ओढणार माऊलींचा रथ

**आळंदी :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी बैलजोडीचा मान यंदा घुंडरे घराण्याला मिळाला आहे. घुंडरे घराण्याची बैलजोडी माऊलींचा पालखी रथ ओढणार आहे. विवेक ज्ञानेश्वर घुंडरे, जनार्दन घुंडरे, अर्जुनराव मारुती घुंडरे आणि सचिन बाळासाहेब घुंडरे हे यंदाच्या माउलींच्या पालखी सोहळ्यातील बैलजोडीचे मानकरी ठरले आहेत. विवेक घुंडरे यांनी बावधन (जि. सातारा) येथून राजा-प्रधान ही बैलजोडी बाळासाहेब कदम यांच्याकडून सहा लाख रुपयांना खरेदी केली आहे. तसेच दुसरी बैलजोडी सावकार व संग्राम ही हिंजवडी येथून उमेश साखरे यांच्याकडून पाच लाख रुपयांना खरेदी केली आहे. अर्जुनराव मारुती घुंडरे व सचिन बाळासाहेब घुंडरे यांनी नांदेड सिटी, पुणे येथून ५ लाख ५१ हजार रुपयांना मल्हार व आमदार ही बैलजोडी निखिल कोरडे यांच्याकडून खरेदी केली, तसेच दुसरी बैलजोडी माऊली व शंभू ही उत्तमनगर येथून मुरलीधर नाणेकर यांच्याकडून २ लाख ५१ हजार रुपयांना खरेदी केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी रथ सोहळ्यासाठी बैलांकडून शेती मशागत, बैलगाडी ओढणे असा सराव केला जात आहे. या बैलांसाठी खुराक म्हणून शाळूची वैरण, हिरवा चारा, पेंड, खारीक-खोबऱ्याचा भुगा, बैलखाद्य मिक्स आदी देत आहेत.



# माळीणसारखी दुर्घटना टाळण्यासाठी पुनर्वसन

## आंबेगाव तालुक्यातील धोकादायक गावांसाठी निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मंचर :** आंबेगाव तालुक्यात माळीण सारखी पुनरावृत्ती परत होऊ नये यासाठी धोकादायक गावांचे पुनर्वसन करण्यासाठी आंबेगाव तहसिल कार्यालय घोडेगाव यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. बेंढारवाडी, काळवाडी क्र. १ व २, पसारवाडी, पांचाळे खुर्द या गावांची मोजणी पुर्ण झाली असून त्यांना लवकरच भूखंडाचा ताबा देवून त्यांना मंजुर झालेल्या घरकुलांचे काम सुरू करता येणार आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील पोखरीची बेंढारवाडी, जांभोरी गावाची काळवाडी क्र. १ व २, माळीणची पसारवाडी, पांचाळे खुर्द, फुलवडे येथील भगतवाडी, मेघोली, नानवडेची फणसवाडी ही दुर्गम व डोंगराच्या पायथ्याशी असणारी गावे भूस्खलन व दरडींमुळे वसतिस्थानाच्या दृष्टीने धोकादायक झाली आहेत. मागील काही वर्षांपासून येथे दरडी कोसळणे, जमिनीला भेगा पडणे, जमीन सरकणे यांसारखे प्रकार घडू लागले आहेत. माळीणची घटना घडल्यानंतर या भागातील धोकादायक गावांचा सर्व्हे करण्यात आला. यामध्ये डोंगर पायथ्याशी वसलेली ही गावे भूस्खलनाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असल्याचे लक्षात आले. यापैकी काही गावांमध्ये मोठया प्रमाणात भूस्खलन होऊन दरड कोसळल्याने या धोकादायक गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी तालुक्यातील सर्व विभागांची एकत्र बैठक घेऊन आढावा घेण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचनेनुसार प्रांत अधिकारी गोविंद शिंदे, आंबेगाव तहसिलदार संजय नागटिळक यांनी त्वरीत धोकादायक गावांची पहाणी करत त्यांचे पुनर्वसन त्वरीत व्हावे यासाठी जागा शोधणे, तज्ञ सल्लागारांकडून जागेची पहाणी करून घेणे, मोजणी करणे, भूखंड पाडणे, जागा मालकांकडून जागा खरेदी करणे आदि कामे लवकरात लवकर पुर्ण व्हावीत यासाठी प्रयत्न करत आहेत. त्या अनुषंगाने बेंढारवाडी व जांभोरी अंतर्गत काळवाडी क्र. १ येथील निवड करण्यात आलेल्या जमीनीचे खरेदीखत करून मोजणी करण्यात आली. तसेच बेंढारवाडी येथे १ ते ५४ व काळवाडी क्र. १ येथे १ ते ३४ भूखंड पाडण्यात आले. या जमीनींचे सपाटीकरण लवकरच पुर्ण करण्यात येणार असून बाधित कुटूंबांना भूखंडाचा ताबा देवून तेथे त्यांना घरकुलांचे काम करता येणार आहे. तसेच जांभोरी अंतर्गत काळवाडी क्र. २ , माळीण अंतर्गत पसारवाडी, पांचाळे खुर्द येथील बांधितांच्या पुनर्वसनासाठी निवड करण्यात आलेल्या जागेची खरेदी करण्यात आली असून मोजणीही करण्यात आली आहे. येथील जमीन रेखांकन नकाशास मंजुरी मिळाल्यानंतर बाधित कुटुंबांना भूखंड वाटप करण्यात येणार आहे.

फुलवडे अंतर्गत भगतवाडी येथील धोकादायक घरातील व्यक्तिंनी देवस्थानच्या जागेत स्वतः पुनर्वसन करून घेतले असल्याने येथे पुनर्वसनाची आवश्यकता नाही. तर नानवडी - फणसवाडी येथील ग्रामपंचायत नानवडे यांनी फणसवाडी येथील बाधितांचे पुनर्वसनासाठी जागा निवड निश्चित केली नाही. तसेच मेघोली या गावामध्ये संरक्षणात्मक उपाययोजना करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.

परंतु दरड प्रवण बाधित कुटुंबाचे अशोक शेंगाळे यांनी त्यांच्या जागेत बाधित कुटूंबांचे पुनर्वसन केल्याने त्या बाधित कुटुंबांनी शबरी घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधली आहे. ग्रामपंचायत अंतर्गत कच्चे रस्ते बांधण्यात आलेले आहेत. विज पुरवठा करणेत आलेला आहे. जलजिवन योजनेअंतर्गत पाईपलाईन करणेत आली असल्याचे तहसिलदार संजय नागटिळक यांनी सांगितले.

# ‘यशवंत’च्या जागा खरेदीच्या प्रस्तावास ‘पणन’चा हिरवा झेंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याची सुमारे ९९.२७ एकर जमीन २९९ कोटी रुपयांना खरेदी करण्यासाठीच्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रस्तावास पणन संचालकांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यातील कलम १२ (१) अन्वये हिरवा झेंडा दाखविला आहे.

दरम्यान, असे असले तरी याबाबतच्या अंतिम निर्णयासाठीचा प्रस्ताव सहकार व पणन विभागाच्या प्रधान सचिवांकडे पणन संचालनालयाने पाठविला आहे. त्यावर आता मंत्रालयस्तरावर कॅबिनेटच्या बैठकीतच शिक्कामोर्तब होणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, यशवंत कारखान्यावरील एकूण थकीत देणी रक्कम ही एकरकमी कर्ज परतफेडीद्वारे कमी करून कारखाना सुरू करण्यास संचालक मंडळाने प्राधान्य दिल्याचेही सांगण्यात आले. त्यादृष्टीने ‘यशवंत’च्या जमीन खरेदीचा विषय दोन्ही संस्थांकडून पत्रव्यवहार होऊन मूर्त स्वरूपात आलेला आहे. त्यामध्ये शासनस्तरावरून काढलेल्या त्रुटींवरही बाजार समितीने पणन संचालकांना विस्तृत वस्तुस्थितीदर्शक अहवाल दाखल केला होता.

थेऊर येथील यशवंत कारखान्याची एकूण ९९.२७ एकर जमिनी खरेदी-विक्री करण्यास थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखाना व पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती या दोन्ही संस्थांच्या संचालक मंडळाच्या संयुक्त सभा २८ मार्च २०२५ रोजी झाली. त्यामध्ये निश्चित केलेली रक्कम रुपये २९९ कोटी देणे-घेणेकामी दोन्ही संस्थांनी करावयाची कार्यवाही पणन विभागाने शासनास सादर केलेल्या पत्रव्यवहारात नमूद केल्याचे सांगण्यात आले.

### बाजार समिती कशी करणार निधीची उभारणी?

● पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीकडे सध्या १४१ कोटी रुपयांच्या मुदत ठेवी आहेत. दैनंदिन प्रशासकीय खर्च व पायाभूत सुविधांसाठीच्या खर्चाची रक्कम ठेवून प्रत्यक्षात जागा खरेदीस १०० कोटी रुपये उपलब्ध होतील. नवीन फुलबाजारातील गाळे बांधकाम पूर्णत्वास गेले आहेत. त्यातून पुढील सहा महिन्यांत ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने गाळे वितरणातून समितीस ६५ ते ७० कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतात तसेच समितीच्या मालकीची मौजे कोरेगाव मूळ येथील १२ एकर जागेच्या शासन मंजुरीद्वारे विक्रीतूनही समितीस ६५ ते ७० कोटी रुपये उपलब्ध होतील. त्यानुसार टप्प्याटप्प्याने रक्कम उपलब्ध होऊन त्यानुसार कारखान्यासह ही रक्कम देण्याची तयारी समितीने दर्शविल्याचे सांगण्यात आले.

## राज्यात एकाच वेळी वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** बारा वर्षे सेवेची पूर्ण करणा-या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी तर चोवीस वर्षे सेवा पूर्ण करणा-या शिक्षकांना निवडश्रेणी प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे (डाएट) यांनी तालुकास्तरावर प्रशिक्षण आयोजित केल्यामुळे शिक्षकांना या प्रशिक्षणाचा निश्चितच फायदा होणार असल्याचे, पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय वाळूज यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या मार्फत वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षण पुणे जिल्हयात २ जून ते १२ जून या कालावधीत संपन्न होणार असून सकाळी ९.३० ते ५. ३० वाजेपर्यंत होणार आहे. या प्रशिक्षणाकरिता पुणे जिल्ह्यातील २ हजार ४९३ प्रशिक्षणार्थी उपस्थित राहणार आहे. हे प्रशिक्षण प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी होणार असून फक्त मुळशी व वेल्हे या तालुक्याचे एकत्रित पुशिक्षण इंग्लिश स्कुल बावधन येथे तर पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहरातील शिक्षकांचे एकत्रित प्रशिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे होणार आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, शाळा मूल्यांकन, आश्वासन आराखडा, शिक्षण हक्क कायदा, ऑनलाइन शिक्षण आदि विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.

राज्यस्तरिय प्रशिक्षण २६ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत एससीईआरटी पुणे येथे पार पडले आहे. तर जिल्हास्तरीय प्रशिक्षण २६ मे ते २९ मे या कालावधीत विमलबाई गरवारे माध्यमिक विदयालय पुणे येथे संपन्न झाले असून आता तालुकास्तरीय प्रशिक्षण २ जून ते १२ जून या कालावधीत तालुक्याच्या ठिकाणी होणार असल्याचे पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय वाळूज यांनी सांगितले.

# साखर कारखान्यांना उसाची कमतरता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नारायणगाव :** यंदा ऊस लागवडीचे क्षेत्रात मोठी घट होताना दिसत आहे. तसेच लागवड केलेल्या उसाच्या खोडवा शेतकऱ्यांनी काढून टाकल्याने येत्या २०२५-२६ च्या गळीत हंगामाला साखर कारखान्यांना गेटकेन उसासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. एवढेच नाही तर गाळप हंगामाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कार्यक्षेत्र बाहेर उसाची पळवा पळवी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सध्या सर्वत्र उसाचे क्षेत्र कमी होऊ लागले आहे तसेच एकरी उत्पादन देखील कमी होत असल्याचे निदर्शनात येत आहे. क्षारपड जमीन झाल्याने तसेच वारंवार जमिनीमध्ये एकच उसाचे पीक घेतल्याने उसाचे वजन घटू लागले आहे. तसेच लागवडीच्या व खोडवा उसाचे सरासरी वजन देखील कमी होऊ लागले आहे. साखर कारखान्यांना गळीत हंगामासाठी आडसली, पूर्व हंगामी, सुरू व खोडवा अशा स्वरूपात उसाचा पुरवठा होत असतो. साधारण १४ ते १५ महिन्यांचा ऊस तोडल्यावर त्या उसाची रिकव्हरी देखील चांगली येते.

साखर कारखाने आडसाली, पूर्व हंगामी, सुरू व खोडवा या ऊस लागवडीचे योग्य प्रकारे नियोजन राबविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतात. प्रत्येक गळीत हंगामाला आडसाली उसाची किती गरज आहे? पूर्व हंगामी किती ऊस लागेल? त्याचबरोबर सुरू उसाची किती लागवड होणे अपेक्षित आहे याबाबतचे धोरण साखर कारखाने गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वीच करीत असतात. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना हे धोरणाची आगाऊ माहिती देखील दिली जाते. परंतु शेतकरी या धोरणाप्रमाणे लागवड कधीच करीत नाहीत. त्यामुळे साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचे अनेकदा नियोजन कोलमडते. एवढेच नाही तर उसाच्या तोडणीचा प्रोग्राम देखील राबवणे साखर कारखान्यांना मोठे जिकरीचे होऊन जाते. आडसाली उसाची लागवड एकाच तारखेला अनेक शेतकऱ्यांची होत असल्याने ऊस तोडणी करताना अनेकदा अडचणी येतात व, "माझा ऊस लवकर का तुटला नाही?" यावरून शेतकी कार्यालयामध्ये वाद होण्याच्या घटनाही घडत असतात. शिरूर तालुक्यामध्ये उसाचे क्षेत्र जास्त असल्याने व घोडगंगा कारखाना बंद असल्याने बहुतांशी साखर कारखान्यांचा या भागातील शेतकऱ्यांच्या उसावर डोळा असतो. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम संपला की सगळेच कारखाने तिकडच्या शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन खोडवा उसाची नोंद आमच्याकडे करा, आमच्याकडून उसाचे बियाणे घेऊन लागवडीचे नोंद आमच्याकडे करा अशी विनंती करीत असतात. तर काही कारखाने संबंधित शेतकऱ्यांच्या खाजगी लागवडीची नोंद आपल्याच कारखान्याकडे कशी होईल याबाबतचे नियोजन करू लागले आहेत.

मागील वर्षी तुलनेने पाऊस कमी झाल्याने अनेक कारखान्यांना आपल्या कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध नाही. त्यामुळे हे कारखाने आतापासूनच गेटकेन ऊस मिळवण्याच्या तयारीला लागल्याचे दिसून येत आहे. मागील गळीत हंगामामध्ये उसाचे क्षेत्र अधिकचे असल्याने व शासनाच्या धोरणानुसार साखर कारखाने उशिरा सुरू झाल्याने ऊस तोडणी वेळेवर होत नव्हती. उसाला १८-१९ महिने झाले तरी मागील वर्षी शेतकऱ्यांचा ऊस तुटत नव्हता. यंदा मात्र या उलट परिस्थिती सगळीकडे पाहायला मिळणार आहे. गेट केनचा ऊस मिळवण्यासाठी जो कारखाना ऊसाला जास्तीचा बाजारभाव देईल त्याच कारखान्यांना हा ऊस जास्त मिळू शकतो. जास्तीचा बाजारभाव गेटकेन उसाला कसा द्यायचा? याचाही विचार साखर कारखान्यांना गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वीच करावा लागणार आहे.

# मंचरला तरकारीची आवक वाढली; दर कडाडले




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** मंचर (ता. आंबेगाव) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत फ्लॉवर व भुईमूग शेंगांसह तरकारी शेतमालाची आवक वाढली. त्यामुळे बाजारभावात वाढ झाली, अशी माहिती सभापती नीलेश स्वामी थोरात यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समिती मंचर येथे तरकारी शेतमालाची एकूण ७२७० डाग इतकी आवक झाली. फ्लॉवरला १० किलोला ३३० रुपये, भुईमूग शेंगांला ६०० रुपये, गवारीला ९०० रुपये असा बाजार भाव मिळाला. मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आंबेगाव, खेड, जुन्नर, पारनेर, शिरूर या भागांतून मोठ्या प्रमाणावर तरकारी विक्रीसाठी येते.

या बाजार समितीची वैशिष्ट्ये म्हणजे तरकारी शेतमालाचा लिलाव झाल्यानंतर शेतकऱ्यांना शेतमालाचे वजन, बाजारभाव व एकूण रक्कमेचा एसएमएस लगेच त्यांच्या मोबाईलवर मिळतो. ही विश्वसाईता असल्याने पाच तालुक्यांतून शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी मंचर बाजार समितीत घेऊन येतात, असे उपसभापती सचिन पानसरे यांनी सांगितले.

### भाजीपाला आवक व बाजारभाव

● कारले (२९५) - १२०-४०० रुपये, गवार (२६२) ५२५-९०० रुपये, घेवडा (१६) ९०५ रुपये, चवळी (१०३) ३३०-५८१ रुपये, ढोबळी मिरची (१००) ४००-७०० रुपये, भेंडी (१६१) ३३५-६२१ रुपये, फरशी (५) ३५०-४०० रुपये, फ्लॉवर (२१७०) १७५-३३० रुपये, भुईमूगशेंगा (३३२) २००-६०१ रुपये, दोडका (१३) ३७५-७०० रुपये, मिरची (५४६) २८५-५५० रुपये, तोंडली (१९) १५०-३५० रुपये, शेवगा (११) ४००-५८० रुपये, लिंबू (३) ३००-६०० रुपये, काकडी (५३३) १४५-२७० रुपये, कोबी (३७३) ७०-१२० रुपये, वांगी (११३) २२५-४०० रुपये, दुधीभोपळा (११३) १५०-२८० रुपये, पापडी (२) ७०० रुपये, बीट (१११३) १३५-२६० रुपये, बटाटा (४) १२०-१५० रुपये, आले (१२) ३५० रुपये, गाजर (२८) १५०-२०० रुपये, घोसाळी (११) १५०-३५० रुपये, टोमॅटो (२२३) ८०-३१० रुपये, मका (१७६) ५०-१५० रुपये, कैरी (२६८) २६०-५०० रुपये, फणस (५) २५० रुपये.

# विघ्नहरचे ऊस लागवड धोरण जाहीर

## पुढील हंगामात पुरेसा ऊस उपलब्ध होण्यासाठी तरतूद, सत्यशील शेरकर यांची माहिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नारायणगाव :** श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याने लागवड हंगाम २०२६-२७ साठी पुरेसा ऊस उपलब्ध होण्याकरीता लागवड हंगाम सन २०२५-२६ मध्ये ऊस लागवडीचे धोरण १ जूनपासून सुरू करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी दिली.

ऊस लागवड धोरणाबाबत शेरकर म्हणाले की, आडसाली ऊस लागवडीसाठी १ जुन ते ३१ ऑगस्ट पर्यंतच्या कालावधीमध्ये को. ८६०३२, को. एम. ०२६५, पीडीएन. १५०१२, कोव्हिएसआय-१८१२१, पीडीएन. ११०८२, पीडीएन. १५००५ व पीडीएन. १३००७ या ऊस जातींच्या लागवडीस परवानगी देणेत आली आहे. तसेच पुर्वहंगामी लागवडीसाठी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंतचा कालावधी देण्यात आला असून त्यामध्ये को. ८६०३२, को.एम. ०२६५, पीडीएन. १५०१२, कोव्हिएसआय-१८१२१, पीडीएन. ११०८२, पीडीएन. १५००६, पीडीएन. १३००७, को-९०५७ व व्हीएसआय-०८००५ या ऊस जातींच्या लागवडीस परवानगी देणेत आली आहे.

तसेच यंदाच्या हंगामासाठी १ डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत को. ८६०३२, को.एम. ०२६५, पीडीएन. १५०१२, कोव्हिएसआय-१८१२१, पीडीएन. ११०८२, पीडीएन. १५००६, पीडीएन. १३००७, को-९०५७ व व्हीएसआय-०८००५ या ऊस जातींच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. त्यातील डिंसेंबर महिन्यात कोएम-०२६५ या ऊस जातीच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार कारखाना कार्यक्षेत्रामध्ये सर्व सभासद व ऊस उत्पादकांना १ जुन पासुन वरील प्रमाणे उपलब्धतेनुसार ऊस जातीचे बेणे वाटप करण्यात करण्यात आले आहे.

दरम्यान कारखाना कार्यक्षेत्रात गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध व्हावा म्हणून कारखान्यामार्फत ऊस विकास अभियान प्रमाणावर राबविले जात असून, त्या अंतर्गत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मागणीनुसार उधारी तत्वावर ऊस बेणे व ऊस रोपांचा पुरवठा केला जातो. ऊस लागवड व कारखान्याकडे नोंद झालेनंतर प्रति एकरी ऊस उत्पादन वाढीसाठी प्रत्यक्ष बांधावर जावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. जमिनीतील अन्नद्रव्य पिकाला उपलब्ध होवुन रासायनिक खतांची मात्रा कमी होणेसाठी जीवाणू खतांचा पुरवठा केला जातो. जमिनीची सुपिकता वाढविणेसाठी हिरवळीचे खतासाठी ताग बियाणेचा पुरवठा केला जातो. पाण्याची व रासायनिक खतांची बचत करुन अधिकचे उत्पादन घेणेसाठी कारखान्यामार्फत ठिबक सिंचन योजना राबविणेत येत असल्याचे कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी सांगितले.



## शिक्षक हे प्रेरणादायी व्यक्तिमत्व

**उरुळी कांचन :** प्राथमिक शाळेतील एक आदर्श शिक्षिका विद्यार्थी जीवनात केवळ शिक्षक नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणारी मार्गदर्शक आणि प्रेरणा देणारी व्यक्ती असते असे मत जेष्ठ पत्रकार तथा प्रिंट व डिजीटल मिडिया पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुनील जगताप यांनी व्यक्त केले. पूर्व हवेली तालुक्यातील वळती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पदवीधर शिक्षिका पुष्पा बबनराव दिवेकर ३१ मे रोजी ३७ वर्ष ६ महिने २२ दिवसांची सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाल्या. याप्रसंगी आयोजित सेवापूर्ती स्नेह मेळावा या कार्यक्रमात जगताप बोलत होते. याप्रसंगी वळती गावचे सरपंच व उद्योगपती एल बी कुंजीर, उरुळी कांचन चे सरपंच मयूर कांचन, सोरतापवाडी केंद्रप्रमुख भरत इंदलकर, संजय कुंजीर, शिक्षक संघटना माजी अध्यक्ष रमेश कुंजीर, मुख्याध्यापक नामदेव कुंजीर, प्राचार्य भारत भोसले, आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, माजी सरपंच अमित कांचन,राजेंद्र ब. कांचन, उद्योजक सागर कांचन, संजय आबासाहेब कांचन, माजी उपसरपंच सागरनाना कांचन, सुभाष बगाडे, पृथ्वीराज कड, किशोर मेमाणे, अमोल भोसले,सुवर्णा कांचन, राहुल जाधव, आदित्य यादव, सुदर्शन कांचन, निशांत कड, सागर खेडेकर यांच्यासह वळती व उरुळी कांचन गावचे ग्रामस्थ तसेच दौंड व हवेली तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुष्पा दिवेकर यांचे कुटुंबीय माजी प्राचार्य बबनराव दिवेकर, डॉ राज दिवेकर, डॉ प्रणिता दिवेकर, डॉ निशिगंधा कार्ले, सागर कार्ले, माजी प्राचार्य फक्कडराव गायकवाड, सुनीता गायकवाड, स्नेही व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सूत्रसंचालन संतोषी सुतार यांनी केले, तर आभार माजी प्राचार्य बबनराव दिवेकर यांनी मानले.

## आठ दिवसांपासून शिरोली-पाईट मुख्य रस्ता बंद

**खेड :** अर्धवट कामांचा मोठा फटका सर्वसामान्यांना बसला आहे. मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते आजही बंद आहेत. पावसामुळे शिरोली-पाईट हा मुख्य रस्ता गेल्या आठ दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे लादवडपासून ते वांद्रेपर्यंतच्या ३०-३५ गावांना फटका बसला आहे. तीन चार दिवसांपासून पावसाने उघडीप देऊनही ठेकेदाराने अर्धवट राहिलेली कामे सुरू केलेली नाहीत. सध्या शिरोली-पाईट ते आंबोली रस्त्यावर तीन चार ठिकाणी पुलांचे काम सुरू आहे. चांडोली ते कडूस रस्त्यावरदेखील काही ठिकाणी पुलांचे व मुख्य रस्त्याचे चार पदरी करणाचे काम सुरू आहे. ठेकेदारांनी कामे मंजूर होऊनही कामे सुरू करायला मे महिना लावला. त्यातही सुरू केलेली कामे अंत्यत संथगतीने सुरू आहेत. शिरोली-पाईट ते आंबोली हा एकमेव रस्ता नागरिकांसाठी रहदारीसाठी उपलब्ध आहे. या रस्त्यावर तब्बल ४०-४५ गावे अवलंबून आहेत; परंतु पावसाच्या तोडावर या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. पावसामुळे अनेक रस्ते बंद पडल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

## रिहान आतार याचे घवघवीत यश



**सासवड :** फिरोज साहेबलाल आतार यांचे चिरंजिव रीहान फिरोज आतार याने दहावीच्या परीक्षेत ९५.६० टक्के गुण मिळवून माळशिरस तालुका प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले. अत्यंत खडतर अभ्यास करून हे यश संपादन केल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी सासवड नपा माजी नगरसेवक मोहनआप्पा जगताप, मा नगरसेवक हारुण भाई बागवान, उद्योजक प्रशांत जगताप, उद्योजक अरिफ आतार, शाकिर काझी, संतोष निरगुडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## अपघातात दुचाकीस्वार ठार

**रांजणगाव गणपती :** सोनेसांगवी मलठण अष्टविनायक रस्त्यावरील कडेच्या लोखंडी चॅनलला मोटारसायकल धडकून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार सुरेश दादाभाऊ बोऱ्हाडे (३९, रा.




सोनेसांगवी ता. शिरूर) यांचे अपघाती निधन झाले. याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार योगेश दादाभाऊ बोऱ्हाडे यांनी फिर्याद दिली आहे. ३१ मे रोजी सुरेश दादाभाऊ बोऱ्हाडे हे मलठण गावचे हद्दीतील सोनेसांगवी मलठण अष्ठविनायक रस्त्याने दुचाकीवरून जात असताना सोनेसांगवी मलठण रस्त्यावरती कार्नरला लोखंडी चॅनलला धडकले. या अपघातामध्ये गंभीर दुखापत होऊन त्यांचे अपघाती निधन झाले. अधिक तपास पोलीस निरीक्षक श्रीशैल्य चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस हवालदार वारे करीत आहेत.

# पोलीस-पाटील हे पोलिसांचे नाक व डोळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**रांजणगाव गणपती :** पोलीस पाटील हे पोलिसांचे नाक व डोळे आहेत. त्यामुळे गावामध्ये घडणाऱ्या अनुचित प्रकारांची, संशयित व अनोळखी आलेल्या नागरिकांची माहिती कोणी चांगला द्यावी, तसेच ग्रामपंचायत प्रशासन,पोलीस पाटील व पोलिसांनी व ग्रामस्थांनी नोकरी व्यवसायानिमित्त आलेल्या भाडेकरूंची माहिती अध्यावयत करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक संदीप सिंग गिल यांनी केले.

खंडाळे व रांजणगावच्या हद्दीत आढळून आलेल्या मृतदेहांचा तपास विशेष पोलिस पथकाद्वारे करण्यात येणार असल्याचे ही पोलीस अधिक्षक संदीप सिंह गिल यांनी सांगितले. यावेळी पोलीस पाटलांनी शिरूर तालुक्यामधील काही समस्या पोलीस अधिक्षक संदीप सिंह गिल यांच्यासमोर मांडल्या. यामध्ये मोटार चोरीचे प्रमाण वाढलेले आहे, बिबट्याचा वापर वाढला आहे. बेट भागात वाढलेले अवैध धर्मांतरण, शिरूरच्या पूर्व पट्ट्यात गुन्हाळामुळे परप्रांतीयांचे वाढलेले प्रमाण, चाकण शिक्रापूर रस्त्यावर धोकादायक अपघातांचे वाढते प्रमाण, पुणे अहिल्यानगर महामार्गावरील वाढलेली वाहतूककोडी अशा समस्या मांडण्यात आल्या. या समस्यांवर लवकरात लवकर उपायोजना केल्या जातील त्याचबरोबर

शाळा व विद्यालय बाहेर फिरणाऱ्या टवाळ खोरांचा बंदोबस्त करण्यासाठी तत्पर राहणार, अनोळखी व संशयित व्यक्तीची पोलिसांना माहीती द्यावी, एक गाव एक अंमलदार प्रमाणे काम झाले पाहिजे, अंमलदाराने आठवड्यातून एकदा गावाला भेट दिली पाहिजे. पोलीस पाटलांनी गावातील माहीती महिन्यातून एकदा अधिकाऱ्यांना दिली पाहिजे, रोमिओचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामस्थांचा व कुटुंबाचा सहभाग गरजेचा आहे. मुलीना स्वस्वंरक्षणाचे धडे दिले पाहिजे, तरुण मुलांनी, सायबर क्राईमकडून बचाव होण्यासाठी सजग राहिले पाहिजे, ग्रामसूरक्षा यंत्रणा कार्यरत करणे व सर्व ग्रामपंचायतीनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या सूचनाही गिल यांनी यावेळी दिल्या.

केंदूर ग्रामपंचायत ने सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याशिवाय घराची नोंद करणार नसल्याचा ठरव ग्रामसभेत घेतला आहे, जातेगांव बुद्रुक येथे मुलींसाठी लाठी काठीचे प्रशिक्षण दिले जात आहे. या दोन्ही उपक्रमांचे गिल यांनी कौतुक केले.

## नांदगाव येथे शाळकरी मुलाचा रेबीजने मृत्यू

**पारगाव :** दौंड तालुक्यातील नांदगाव येथील १३ वर्षीय मुलाला चार महिन्यांपूर्वी पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्यानंतर रेबीजची लक्षणे दिसू लागली. उपचारासाठी त्याला पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाला. शौर्य गणेश खराडे, असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. माजी उपसरपंच गणेश खराडे यांचा तो मुलगा आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शौर्य याला (दि.१९) मार्च रोजी रंगपंचमीच्या दिवशी पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतला होता. त्यादिवशी शौर्य यास पिसाळलेल्या कुत्र्याने किरकोळ ओरखडले होते. त्यानंतर याकडे शौर्य आणि त्याच्या कुटुंबीयाने दुर्लक्ष केले.

त्यानंतर दोन महिन्यांनी तो आजारी पडला. त्यावेळी केडगाव येथील डॉ. भरत खळदकर यांना शौर्य याच्याबद्दल शंका आली. त्याची लक्षणे पाहता त्यांनी शौर्य यास पुणे येथील नायडू हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यास सांगितले. ससून हॉस्पिटलमध्ये शौर्याची रेबीज तपासणी करण्यात आली. या तपासणीत शौर्य हा रेबीज पॉझिटिव्ह आल्याचे समजले. आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नाने त्यास नायडू हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. गुरुवार (दि. २९) उपचारादरम्यान शौर्यची मृत्यूची झुंज अपयशी ठरली. शौर्य याच्या मृत्यूने गावाने हळहळ व्यक्त केली.

## सासवड आगारात साजरा झाला एसटीचा वाढदिवस



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सर्वसामान्यांची जीवनवाहिनी, लालपरी म्हणजेच एसटीचा ७७ व्वा वाढदिवस सासवड येथील आगारात साजरा करण्यात आला. रंगीबेरंगी फुगे, फुलांच्या माळा, सुंदर रांगोळी, एस टी ची छोटी प्रतिकृती केक कापून व उपस्थित प्रवाशांना गुलाबपुष्प देऊन हा सोहळा पार पडला. आगार प्रमुख सागर गाडे, स्थानक प्रमुख प्रवीण माळशिकारे,मासूम संस्थेच्या जया नलगे, जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले ,प्रवाशी संघटनेचे तानाजी सातव, नगरपालिका पथारी संघटनेचे गुलाब सोनावणे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

एसटीचे उत्पन्न, खासगीकरणाकडे होत असलेली वाटचाल, बेकायदेशीर प्रवाशी वाहतूक, काही उपाय व सूचना करत यावेळी उपस्थित हेमंत ताकवले, जया नलगे श्रीकांत लक्ष्मी शंकर, तानाजी सातव, गुलाब सोनावणे यांनी या प्रसंगी आपली मनोगते व्यक्त करत उपक्रमास शुभेच्छा दिल्या. आगार प्रमुख सागर गाडे यांनी एसटीची सद्यस्थिती, प्रवाशांनी दिलेली साथ, भविष्यातील काही तरतुदी व उपाय योजना यांवर भाष्य केले. वाहतूक नियंत्रक पोपट जैनक यांनी सूत्रसंचालन केले तर संघटनेचे कैलास जगताप यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमास प्रवीण गायकवाड, महेश भोंगळे, विकास काकडे, सुजाता बर्गे, नितीन ओंबळे, गंगा मोरे,रामभाऊ गावडे, मासूम संस्थेच्या महिला भगिनी, देवा भालेराव यांसह अनेक मान्यवर मंडळींनी हजेरी लावली.

# स्थानिकांना टोल सूट देण्यासाठी आंदोलन



**ओतूर :** अहिल्यानगर- कल्याण महामार्गावर असलेला डुंबरवाडी (ता.जुन्नर) टोलनाक्यावर स्थानिक नागरिकांकडून दरमहा साडेतीनशे रूपये तसेच मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना साडेसहा हजार रूपये टोल आकारणी करण्यासाठी टोल कंपनीने सक्ती केल्याने येथील स्थानिक संतप्त नागरिकांनी शांततेच्या मार्गाने रविवारी दि. १ जून रोजी टोलबंद आंदोलन केले.

या आंदोलनात ज्येष्ठ समाजसेवक तानाजी तांबे, माजी जि.प. सदस्य मोहित ढमाले, जयसिंग तांबे, जालंदर पानसरे, अनिल तांबे, सुनील डुंबरे, देविदास तांबे, किरण भोर यांच्यासह शेकडो स्थानिक वाहनचालक, नागरिक या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. यावेळी तानाजी तांबे म्हणाले की, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हटले होते की, जोपर्यंत अहिल्यानगर- कल्याण महामार्गाच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे व रस्ता दुभाजक काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत डुंबरवाडीचा टोल सुरू होऊ देणार नाही, असे सांगितले होते.

मग या रस्त्याचे काम अपूर्ण तरी तुम्ही टोल कसा सुरू केला? असा सवाल तांबे यांनी उपस्थित करून, टोल आकारणी करणाऱ्या कंपनीमध्ये अहिल्यानगरचे दोन पार्टनर आहेत आणि यांचा तिसरा छुपा स्थानिक पार्टनर कोण ? असा सवाल देखील तांबे यांनी उपस्थित केला. आम्ही टोलची तोडफोड करणार नाही, शासनाचे कुठल्याही प्रकारचे नुकसान करणार नाही, तुम्ही जोपर्यंत स्थानिक नागरिकांना टोल मधून सूट देत नाही, तो तोपर्यंत आम्ही शांततेच्या मार्गाने ठिय्या आंदोलन करणार आहोत अशी भूमिका स्थानिक नागरिक वाहनचालकांनी घेतली होती.

# पुरंदरमधील फळ उत्पादक शेतकरी संकटात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड:** पुरंदर तालुक्यात गेल्या १० दिवसांपासून मुसळधार पावसासोबत वातावरणातील बदलामुळे अंजीर, पेरू, सीताफळ, डाळिंब बागांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर पुन्हा संकट कोसळले आहे. या पावसाने फळबागांचे अर्थकारण ठप्प केले आहे.

पुरंदर तालुक्यातील ५२ हेक्टरवर अंजीर लागवड केली आहे. सोनोरी, दिवे, काळेवाडी, गुऱ्होळी, राजेवाडी, वाघापूर, सुपे खुर्द, वनपुरी, आंबळेसह अनेक गावांमध्ये अंजिराचा खट्टा बहार आहे. मात्र, पावसामुळे व वातावरणातील बदलामुळे अंजीर तडकणे, फळकुज, तांबेराचा प्रादुर्भाव वाढला आहे. लाल कोळी, मावा, तुडतुड्याचा प्रभाव आहे. पावसाच्या नुकसानीतून बचावलेल्या फळबागांवर औषध फवारणी सुरू आहे. तालुक्यात सीताफळाची लागवड २२०० हेक्टरवर केली आहे. परंतु, काही प्रमाणात उन्हाळी सीताफळाची फुलधारणा सुरू आहे. मात्र, मे महिन्यात झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने फुलधारणाही गळून जात आहे. त्यामुळे पुढील वर्षी सीताफळाचे उत्पन्न घटण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. तालुक्यात डाळिंबाची ३०० हेक्टरवर लागवड केली आहे.

> **तालुक्यात पेरूची २८० हेक्टर लागवड करण्यात आली आहे. तालुक्यात अवकाळी पावसामुळे पेरूची झाडे काही ठिकाणी उन्मळून पडली. या पिकाला देवी, फळकुज, फळमाशीचा प्रादुर्भाव होणार आहे. पेरूला शंभर ते तीनशे रुपये प्रतिक्रेट सासवड बाजारपेठेत भाव मिळत आहे. अवकाळी पावसाने पुरंदर तालुक्यात फळबागा, कांदा, तरकारी पिकांसह गहू, ज्वारी, हरभरा, पिकाचे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजित नुकसान अहवाल वरिष्ठ कार्यालयास कळविला आहे. वरिष्ठांचे आदेश आल्यास तत्काळ महसूल विभाग, कृषी विभाग व पंचायत समितीतर्फे संयुक्त पंचनामे करण्यात येतील.**
>
> **- सूरज जाधव,** कृषी अधिकारी, पुरंदर

# ११ जोश

# जिमला न जाता स्लिम!

आजकालच्या प्रत्येकाला आपण बारीक असावे, असे वाटत असते. बारीक असल्यामुळे हवी ती फॅशन करता येते. परंतु, जाड शरीरयष्टी असलेल्यांचा मात्र मूड जातो. मग बारीक होण्यासाठी जिम हा पर्याय निवडला जातो. परंतु, काही वेळा जिम लावली किंवा डाएट केले तरी वजन कमी होत नाही. काही ड्रेसिंग टिप्स फॉलो केल्यावर तुम्ही सहज बारीक दिसू शकता. बऱ्याचदा ड्रेसिंग करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे फार गरजेचे असते. तुम्ही कपड्यांची योग्य निवड केली तर त्या कपड्यात बारीक दिसू शकता. त्यामुळे कपडे निवडताना काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे. ✽ कपड्याचे फिटिंग उत्तम असावे : तुम्ही परिधान करत असलेले कपडे जास्त घट्ट किंवा जास्त सैल नसावे. त्याचे फिटिंग परफेक्ट असावे. कपड्याचे फिटिंग परफेक्ट असल्यास तुम्ही स्लिम दिसाल. ✽ डार्क रंगाचे कपडे परिधान करावे : डार्क रंगाचे कपडे परिधान केले तर बारीक दिसण्यास मदत होईल. कारण डार्क रंगाचे कपडे दिसायला ही खूप सुंदर दिसतात. तुम्ही याकरता काळा, राखाडी, तपकिरी, मरुन इत्यादी रंगाचे विविध प्रकारचे कपडे परिधान करु शकता. ✽ मोठ्या प्रिंट्सचे कपडे परिधान करणे टाळा : कपडे खरेदी करताना मोठ्या प्रिंटेडचे कपडे खरेदी करु नका. कारण मोठ्या प्रिंटमुळे तुम्ही अधिक जाड दिसू शकता. त्यामुळे कपडे खरेदी करताना बारीक प्रिंटचे कपडे खरेदी करा. ✽ कॉन्ट्रास्ट कपडे परिधान करु नये : सेम रंगाचे कपडे परिधान केल्यामुळे तुम्ही स्लिम दिसू शकता. तुम्ही कॉन्ट्रास्ट कपडे परिधान केले तर त्यात जाड दिसू शकता. ✽ वर्टिकल लाइन्सचे कपडे परिधान करावे : वर्टिकल लाइन्स असलेले कपडे तुम्हाला स्लिम लूक देतील. त्यामुळे कधीही हॉरिजेंटल किंवा क्रॉस लाइन्सचे कपडे परिधान करु नये. यामुळे तुम्ही अधिक जाड दिसाल.

ग्रुमिंग

---

जगभरात २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात अंदाजे ४२ दशलक्ष विधवा महिला आहेत. आपल्या देशामध्ये विधवांबद्दल अजूनही काही गैरसमज प्रचलित आहेत. त्यामध्ये परिवर्तन होणे अत्यंत आवश्यक आहे.

# संवेदनशील अमित!

ती न वर्षांचा असतानाच अमित वडील गेले. घर चालवण्यासाठी त्याच्या आईने शिवणकामाचे छोटेसे दुकान उघडले. त्याच्या कुटुंबावर जुन्या कर्जाचा बोजा होता. त्यामुळे त्याचे काका त्याच्या शिक्षणाचा आणि इतर गरजांचा खर्च करत. दरम्यान, समाज त्याच्या विधवा आईला धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून दूर ठेवत होता. त्याच्या भावाच्या लग्नामध्ये तिला मेहंदी लावण्याचीदेखील परवानगी नव्हती. तो अनेक वेळा आईची बाजू घेण्याचा प्रयत्न करायचा, परंतु प्रत्येक वेळी समाजासमोर असहाय्य ठरत होता. त्यातूनच प्रेरणा घेऊन विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी अमितने 'मिट्टी के रंग' नावाची संस्था स्थापन केली.

ही संस्था स्थापन करण्याची प्रेरणा आईने त्याला दिली. त्याच्या अंगी असलेल्या गुणांकडे बघून आईने विधवा महिलांसाठी काही तरी कर, असा सल्ला दिला. परंतु, त्याला सामाजिक कार्याचा फारसा अनुभव नव्हता. सुरुवातीला अनुभव मिळवण्यासाठी त्याने काही संस्था आणि देणगीदार यांच्यामधील मध्यस्थ म्हणून काम करायला सुरुवात केली आणि अवघ्या दीड वर्षांमध्ये शंभरहून अधिक स्वयंसेवक तयार केले. पुरेसा अनुभव पाठीशी असल्याची खात्री करून त्याने पुण्यात 'मिट्टी के रंग' नावाची स्वतःची संस्था सुरू केली.

या संस्थेचा मुख्य उद्देश भारतातील विधवा आणि अविवाहित महिलांना हिंसाचाराविरुद्ध थेट कारवाई करण्यासाठी तसेच त्यांचे पुनर्वसन करून सक्षम करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे असा आहे. आत्मविश्वासाच्या जोरावर गेल्या वर्षी त्याने कॉमनवेल्थ युथ कौन्सिलचा सदस्य होण्यासाठी अर्ज केला. तो लगेच स्वीकारण्यात आला. या सदस्यत्वाचा फायदा असा झाला की त्याच्या सामाजिक कार्याशी संबंधित विचारांची व्याप्ती भारतातच नव्हे तर इतर देशांमध्येही पोहोचली. त्यातून त्याची मानसिक जडणघडण झाली. आता सहकाऱ्यांच्या मदतीने तो गुरुग्राम, गाझियाबाद आणि मुंबई येथे केंद्रे सुरू करणार आहे. येथील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्याची संस्था रांगोळी डिझायनिंग, बॅग मेकिंग, विविध प्रकारची शिल्पे आणि इतर प्रकारच्या हस्तकला उत्पादनांचे प्रशिक्षण देत आहे. इथून बाहेर पडलेल्या महिलांना विविध कंपन्यांमध्ये नियमित नोकरीही मिळाली आहे. पुण्यात आणखी तीन केंद्रे सुरू करण्याचा आणि त्या माध्यमातून अनेक

अचिव्हर



---

## शेर की जुबानी

किसी के दिल में
क्या छुपा है, ये बस
खुदा ही जानता है
दिल अगर बेनकाब होते
तो कितना बवाल होता।

पल दो पल मेरे साथ बिताना तुम
हो सके तो इस बरसात
ठहर जाना तुम।

एकही बात इन लकिरों में
अच्छी है, धोका देती है,
मगर रहती हाथ में ही है।

---

## सोशल मीडिया

### जीमेलचे सीक्रेट फिचर्स

तुम्ही अनेक वर्षांपासून जीमेलचा वापर करत असाल. पण त्यातील काही खास फिचर्सबद्दल जाणून घेऊ या. ✽ गोपनीय ईमेल आपण जीमेलद्वारे पाठवू शकतो. ते इनेबल करण्यासाठी नवीन ई-मेल पाठवताना तुम्हाला लॉक साईनवर क्लिक करावे लागेल. ✽ इंटरनेटशिवाय मेल्स बघायचे असल्यास व्ह्यू ई-मेल्स ऑफलाईन हा पर्याय आहे. यासाठी सेटिंग्जमध्ये जाऊन Enable offline email वर क्लिक करावे लागेल. ✽ जीमेल मध्ये आपण शॉर्टकट किजही वापरू शकतो. मार्क ॲज रीड करण्यासाठी Shift + I दाबा. ईमेल पाठवण्यासाठी Command किंवा Ctrl + Enter दाबा. याशिवाय, रेसीपिएंट ॲड करण्यासाठी Shift + Ctrl + B दाबा.

## स्मार्ट टिप्स

### व्हॉट्सॲपवर टाका मोठा व्हिडीओ



व्हॉट्सॲपने युजर्ससाठी एक नवीन आणि उपयुक्त फीचर आणण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आता स्टेटसमध्ये मोठा व्हिडीओ टाकणे सोपे होणार आहे. आता व्हिडीओची लांबी एक मिनिटाची नाही तर ९० सेकंदांची राहणार आहे. यापूर्वी तुम्ही एकावेळी फक्त ६० सेकंद पर्यंतचा व्हिडीओ अपलोड करू शकत होता. म्हणजेच आता ही मर्यादा ३० सेकंदांनी वाढवली जाणार आहे. याचा थेट फायदा मोठे व्हिडीओ स्टेटस शेअर करणाऱ्यांना होऊ शकतो. अर्थात सध्या हे फीचर फक्त व्हॉट्सॲप च्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ असा आहे की ॲपची चाचणी आवृत्ती वापरतात तेच हे फीचर वापरू शकतात. लवकरच हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी जारी केले जाईल. हे नवीन फीचर व्हॉट्सॲप ॲंड्रॉइड व्हर्जन २.२५.१२.९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## ॲप वर्ल्ड

### हटके अन् कलरफुल ईयरबड्स!



कुठेही बाहेर जाताना आपण मोबाईलसोबतच ईयरबड्स नक्कीच घेतो. अनेकदा ते सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारे नसतात. पण आता खिशाला परवडणारे आणि हटके डिझाइन असणारे ईयरबड्स लॉन्च झाले आहेत. 'प्रोमेट'ने 'नथिंग' ईयरबड्स लॉन्च केलेत. याची किंमत दोन हजारांच्या आत आहे. या ईयरबड्सचे डिझाइन खास असून ते ट्रान्सपरंट आहेत. ब्लॅक, ब्लू, व्हाईट, पिंक या रंगामध्ये हे ईयरबड्स उपलब्ध आहे. हे ईयरबड्स २६ तासांपेक्षा जास्त प्लेबॅक टाइम देतात. ॲक्टिव्ह नॉइज कॅन्सिलेशन फिचरदेखील या ईयरबड्समध्ये आहे.

## स्मार्ट ॲडव्हाइज

### स्टोरी, रील्ससाठी 'या' स्टिकर्सची मदत

लाखो लोक त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा उपयोग करत असतात. इन्स्टाग्रामवर एखादी फोटो स्टोरी शेअर करताना तुम्ही तिथे काही नवीन स्टिकर्स पाहिले असतील. स्टोरी तयार करताना स्टिकर्स चिन्हावर टॅप करा आणि 'रिव्हल' स्टिकर निवडा. पोस्ट केलेल्या स्टोरीमागे काय असू शकते, याविषयी युजर्सना संदेश लिहिण्यासाठी तुम्हाला सूचित केले जाईल. स्टोरी पोस्ट केल्यानंतर तुम्ही डीएम केले तरच फॉलोवर्स तुमची स्टोरी पाहू शकतात. इन्स्टाग्रामने फ्रेम्स स्टिकरदेखील जोडले आहे. हे स्टिकर तुम्हाला फोटो व्हर्च्युअल पोलरॉइडमध्ये बदलू देतो. ते पाहण्यासाठी वापरकर्त्यांना त्यांचे फोन हलवावे लागतील किंवा शेक टू रिव्हल बटण दाबावे लागेल. 'कटआउट' या फिचरमध्ये वापरकर्त्यांना फोटो किंवा व्हिडीओचा एक भाग स्टिकरमध्ये रुपांतर करून घेता येईल. वापरकर्ते बोटांनी फोटो किंवा व्हिडीओमधून एखादा फोटो कट करू शकतात.

---

# पेट ग्रुमिंगचे हटके क्षेत्र



प्राण्यांची आवड असणाऱ्यांसाठी पेट ग्रूमिंग हे फायदेशीर क्षेत्र आहे. 'पेट ग्रूमर्स' नक्की काय करतात? तर प्राणी सुंदर दिसावेत म्हणून हे पेट ग्रूमर्स विविध प्रयत्न करत असतात. त्याचबरोबर प्राण्यांची काळजी घेणे, स्वच्छता ही देखील ग्रूमर्सची जबाबदारी असते. कुत्र्यांना अंघोळ घालणे, केस कापणे, केसांच्या स्टाइल्स करणे, नखे कापणे, गरज असल्यास मसाज करणे, स्पा करणे, प्राण्यांच्या त्वचेची निगा राखणे अशी कामे ग्रूमर्स करतात. म्हणजे माणसांसाठी जसे ब्यूटी पार्लर, स्पा असते तशा सुविधा प्राण्यांना देण्याचे काम पेट ग्रूमर्स. ऐच्छिक कालावधीसाठी काम करण्याची मुभा, कमी भांडवलावर व्यवसायाची सुरुवात करता येणे ही या क्षेत्राची बलस्थाने आहेत. या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी ठराविक शैक्षणिक पात्रता असणे गरजेचे नाही. मात्र पाळीव प्राण्यांच्या प्रजाती, स्वभाव वैशिष्ट्ये, शरीररचना तसेच प्राथमिक वैद्यकीय माहिती असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संयम आणि एका जागी खूप वेळ उभे राहून काम करण्याची क्षमताही गरजेची आहे. परदेशात अनेक विद्यापीठ आणि संस्थांमधून पेट ग्रूमिंगचे प्रशिक्षण दिले जाते. इंग्लंडमधील हॅडलो कॉलेज, ऑस्ट्रेलियन स्कूल ऑफ पेटकेअर स्टडीज येथे पदविका अभ्यासक्रम आहेत. ए.सी.एस. डिस्टंस एज्युकेशन, नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल पेट सिटर्स या संस्था ऑनलाही खासगी संस्था या विषयाचे प्रशिक्षण देतात. बंगळुरु येथील फुझी-वुझी पेट ग्रुमिंग प्रशिक्षण देते. तसेच दिल्ली येथील स्कूबी स्क्रब ही संस्था प्रशिक्षण वर्ग चालवते. बेसिक आणि ॲडव्हान्स असे दोन स्तरात हे प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेच्या पुण्यासह देशात १९ शाखा आहेत. पेट बोर्डिंग म्हणजे ठराविक कालावधीसाठी प्राणी ठेवण्यात येतात असे आश्रम, पशुवैद्य, पेट स्पा किंवा पार्लर्स, प्राण्यांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था या ठिकाणी कामाची संधी मिळू शकते. त्याचप्रमाणे स्वतःचे स्पा सेंटर सुरू करणे, फिरते पार्लर सुरू करणे, घरोघरी जाऊन सेवा देणे अशा प्रकारे स्वतःचे व्यवसायही सुरू करता येऊ शकतात.

वेगळ्या वाटा

---

# पर्यावरणपूरक पर्यटनासाठी...

गेल्या वर्षभराच्या काळात पर्यटनाला नवे आयाम मिळाले आहेत. लोक निसर्गाच्या जवळ जाऊ लागले आहेत. शहरातलं धकाधकीचं जीवन आणि सिमेंटचं जंगल सोडून निसर्गरम्य वातावरणात रमणं प्रत्येकालाच हवंहवंसं वाटू लागलं आहे. आपल्या भारतात काही पर्यावरणपूरक पर्यटनस्थळं आहेत. त्यामुळे पुढच्या वेळी पर्यटनाला निघायचं असेल तर या ठिकाणांचा विचार करायला हरकत नाही.




✽ सिक्कीम हे देशातलं पूर्वेकडचं राज्य. सिक्किममधलं कांचनजंगा राष्ट्रीय उद्यान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. या ठिकाणी तुम्ही ट्रेकिंगचा आनंद लुटू शकता. कांचनजंगा राष्ट्रीय उद्यानातला निसर्ग आपलं मन मोहवून टाकतो. इथली घनदाट झाडी, डोंगरदऱ्या निवांततेची अनुभूती देतात. या राष्ट्रीय उद्यानात विविध प्रजातींचे प्राणीही पहायला मिळतात. त्यामुळे पुढच्या सहलीसाठी सिक्किमला जायला हरकत नाही.



✽ आशियातलं सर्वात स्वच्छ गाव मेघालयात आहे. मॉलिनाँग असं या गावाचं नाव असून इथेही निवांत क्षण घालवता येतील. इथली स्वच्छता डोळ्यात भरते. इथे प्लास्टिकवर पूर्ण बंदी आहे. इथल्या रस्त्यांवर बांबूच्या कचऱ्यापेट्या पहायला मिळतात. इथल्या लोकांना निसर्गाचं भान असून ते पर्यावरणरक्षणासाठी कटिबद्ध आहेत. इथे येऊन पर्यावरणरक्षणाचे धडे गिरवता येतील.

भटकंती



✽ केरळमधलं थेनमला हे ठिकाणही पर्यावरणपूरक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. गर्द झाडी हे इथलं वैशिष्ट्य. निसर्गाच्या सानिध्यात रमायला आवडत असेल तर या ठिकाणी जायला हवं. पक्षीनिरिक्षणाचा छंद असेल तर इथे यायला हवं. इथे ट्रेकिंगची सोयही आहे.

---

# ट्रेंड टाय डाय टी शर्टचा

दोस्तांनो, एकाच पद्धतीच्या, प्लेन आणि कंटाळवाण्या टी शर्टसचा जमाना कधीच मागे पडला आहे. बाजारात रंगीबेरंगी, ट्रेंडी टी शर्टस उपलब्ध आहेत. त्यातच सध्या टाय डाय प्रिंट्सची चांगलीच चलती असल्याचं दिसून येत आहे. हे रंगीत, आकर्षक आणि फंकी टी शर्टस तरुणांचं लक्ष वेधून घेत आहेत. टाय डाय हा प्रकार हिप्पी समुदायामुळे ६० आणि ७० च्या दशकात बराच लोकप्रिय झाला होता. आता हा ट्रेंड पुन्हा आला आहे. ✽ रंगीबेरंगी टी शर्टसचा ट्रेंड असला तरी काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा टाय डाय टी शर्ट भाव खाऊन जातो यात शंका नाही. ब्लॅक ॲंड व्हाईटची फॅशन कधीही जात नाही. त्यामुळे तुम्ही ब्लॅक ॲंड व्हाईट टाय डाय टी शर्ट नक्की विकत घ्या. साध्या, कॅज्युअल लूकसाठी तुम्ही लाईट वॉश डेनिमवर हा टी शर्ट घालू शकता. ✽ बेज आणि पांढऱ्या रंगांची सरमिसळ असणारा टाय डाय टी शर्ट नेहमीच्या कॅज्युअल लूकसाठी परफेक्ट आहे. हा टी शर्ट घरी असताना किंवा गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाहेर जाताना घालता येईल. ✽ पेट्रोल ग्रीन टाय डाय स्वेटशर्ट हटके दिसतो. हा शर्ट हिवाळ्यातच नाही तर उन्हाळ्यातही कॅरी करता येतो. पांढऱ्या, निळ्या किंवा काळ्या जीन्सवर हा शर्ट शोभून दिसेल. ✽ चंदेरीफंकी रंगांची आवड असेल तर निऑन ब्लू रंग तुमच्यासाठी आहे. या रंगाचा टाय डाय टी शर्ट घ्या. ✽ पिंक ॲंड ब्लॅक टी शर्ट आणि जॉगर्स हे कॉम्बिनेशनही छान दिसेल. मग काय ई कॉमर्स साईटसना भेट द्या आणि तुमच्या आवडीचा टाय डाय टी शर्ट विकत घ्या.

फॅशन पॅशन



---

# टॅंगी कुकीज ॲंड क्रीम पॉपकॉर्न

दोस्तांनो, तुम्ही विविध फ्लेवर्सचे पॉपकॉर्न खाल्ले असतील. सॉल्टी, चीज, टोमॅटो, कॅरेमल असे एकापेक्षा एक चविष्ट फ्लेवर्सचे पॉपकॉर्न चित्रपट बघताना किंवा सहज म्हणून तोंडात टाकले जातात. तुम्हीही पॉपकॉर्नचे चाहते असाल तर 'कुकीज ॲंड क्रीम पॉपकॉर्न' नक्की ट्राय करा. हॉस्टेलमध्ये मित्रमंडळींसोबत चित्रपट बघताना किंवा गप्पांचा फड रंगवताना हे पॉपकॉर्न खाता येतील.

**सामग्री:** तयार पॉपकॉर्न, १० ते १५ ओरिओ बिस्किट आणि व्हाईट व्हॅनिला आल्मंड बार्क

**कृती:** ओरिओ बिस्किट बारीक कुस्करून घ्या. व्हाईट व्हॅनिला आल्मंड बार्क पाकिटावरच्या सूचनांनुसार वितळवून घ्या. हा बार्क नीट पातळ व्हायला हवा. बाउलमध्ये पॉपकॉर्न घ्या. त्यावर वितळलेला बार्क ओता. वरून ओरिओ बिस्किटांचा चुरा भुरभुरा. हा चुरा समप्रमाणात पॉपकॉर्नवर पसरायला हवा. आल्मंड बार्क थोडा घट्ट झाल्यावर पॉपकॉर्न खाता येतील.

झटपट रेसिपी



---

# वजन कमी करण्यासाठी धावताय?

बरेच जण फिटनेससाठी तर काही जण वजन कमी करण्यासाठी धावतात. धावणं हा कार्डिओ वर्कआउटचा एक प्रकार असल्यामुळे बऱ्याच कॅलरी खर्च होतात. मुख्य म्हणजे तुम्ही कुठेही धावू शकता. वजन कमी करणं हे उद्दिष्ट समोर ठेऊन धावणार असाल तर या टिप्स लक्षात ठेवा.

✽ स्ट्रेचिंग केल्याशिवाय धावायला सुरुवात करू नका. स्ट्रेचिंगमुळे शरीर आणि स्नायू व्यायामासाठी सज्ज होत असल्यामुळे संभाव्य दुखापत टाळता येते. विविध प्रकारचे वॉर्म अप आणि स्ट्रेचिंग व्यायामप्रकार करून तुम्ही स्नायूंना लवचिकता देऊ शकता.

✽ कोणतेही बूट किंवा चप्पल घालून धावू नका. नियमित धावणार असाल तर दर्जेदार बूट विकत घ्या. चांगल्या बुटांमुळे दुखापत होण्याची शक्यता बरीच कमी होते.

✽ धावण्याआधी फार खाऊ नका. खाल्ल्यानंतर धावल्याने अन्नपचन होतं हा गैरसमज आहे. कारण धावताना रक्तपुरवठा धावण्याचं कार्य करणाऱ्या स्नायूंच्या दिशेने होत असल्यामुळे पचनसंस्थेकडे कमी प्रमाणात रक्त पोहोचतं. यामुळे अन्नपचन होतच नाही. यामुळे हातापायात तीव्र स्वरूपाचे गोळे येणं तसंच वेदना जाणवण्यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

✽ भरपूर पाणी पिणं ही वजन कमी करण्याची गुरुकिल्ली आहे. तुम्ही वजन कमी करण्यासाठी धावत असाल तर सतत पाणी पित रहा. पाण्यामुळे शरीरातली ऊर्जा बराच काळ टिकून राहते. मात्र साखरयुक्त तसंच फसफसणारी पेयं पिऊ नका.

✽ वजन कमी करण्यासाठी सातत्य आणि चिकाटी हवी. दोन दिवस धावून काहीच फायदा होणार नाही. वजन कमी करणं ही एक धीमी प्रक्रिया आहे. त्यामुळे झटपट निकाल मिळण्याची अपेक्षा करू नका. व्यायामासोबतच सकस आहारही घ्यायला हवा. नियोजनबद्ध पद्धतीने वजन कमी करणं कधीही चांगलं. अतिरेकी डाएट्या आहारी जाऊ नका.

फिटनेस फंडा






# पंजाब फायनलमध्ये

## पंजाबने ११ वर्षांनी मिळवलं आयपीएल फायनलचं तिकीट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद :** इंडियन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत पंजाब किंग्सने अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी सुरू झालेल्या क्वालिफायर २ सामन्यात पंजाबने मुंबई इंडियन्सचा मध्यरात्री ५ विकेट्सने पराभव केला. या विजयासह पंजाब किंग्स आयपीएलमध्ये दुसऱ्यांदा अंतिम सामन्यात पोहचले आहेत. यापूर्वी २०१४ मध्ये पंजाबने अंतिम सामना गाठला होता. पण त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. रविवारी पंजाबच्या विजयाचा शिल्पकार कर्णधार श्रेयस अय्यर ठरला.

मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्ससमोर विजयासाठी २०४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग पंजाब किंग्सने १९ षटकात ५ विकेट्स गमावत २०७ धावा करत पूर्ण केला. श्रेयस अय्यरने नाबाद अर्धशतकी खेळी केली.

दरम्यान, या पराभवामुळे मुंबई इंडियन्सचे सहाव्या आयपीएल विजेतेपदाचे स्वप्न यंदा तरी भंगले आहे. मुंबईचे आयपीएल २०२५ मधील आव्हान या पराभवासह संपुष्टात आले. विशेष म्हणजे पहिल्यांदाच मुंबई इंडियन्सविरुद्ध प्रतिस्पर्ध्यांनी २०० पेक्षा अधिक धावांचा पाठलाग करून सामना जिंकला आहे.

आता पंजाब किंग्सला अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना करायचा आहे. अंतिम सामना मंगळवारी (३ जून) अहमदाबादमध्येच होणार आहे.

क्वालिफायर २ सामन्यात २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्सकडून प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी सलामीला फलंदाजी केली होती. पण प्रभसिमरनला तिसऱ्याच षटकात ट्रेंट बोल्टने रिस टोप्लीच्या हातून झेलबाद केले.

पण नंतर प्रियांश आणि जोश इंग्लिस यांनी डाव सावरला. जोश इंग्लिसने ५ व्या षटकात जसप्रीत बुमराहविरुद्ध २० धावा फटकावल्या. पण त्यांची भागीदारीही फार काळ अश्वनी कुमारने टिकू दिली नाही. त्याने प्रियांश आर्यला २० धावांवर हार्दिक पांड्याच्या हातून झेलबाद केले.

पण नंतर जोश इंग्लिसला कर्णधार श्रेयस अय्यरची साथ मिळाली. पण हार्दिक पांड्याने ८ व्या षटकात आक्रमक खेळणाऱ्या इंग्लिसला ३८ धावांवर बाद करत पंजाबला मोठा धक्का दिला. त्याने २१ चेंडूत ५ चौकार आणि २ षटकार मारले. तो बाद झाल्यानंतर मात्र श्रेयस अय्यर आणि नेहल वढेरा यांनी धावांची गती कमी होऊ दिली नाही. त्यांनी चौथ्या विकेटसाठी महत्त्वाची ८४ धावांची भागीदारी केली. पण ही भागीदारी १६ व्या षटकात अश्वनी कुमारने तोडली. त्याने वढेराला मिचेल सँटेनरच्या हातून झेलबाद केले. वढेराने २९ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ४८ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर शशांक सिंगही १७ व्या षटकात २ धावांवर धावबाद झाला.







## १२व्या पीकेएलच्या लिलावात मोहम्मदरेझाला विक्रमी किंमत



**पुणे :** इराणच्या मोहम्मदरेझा शादलुईने सलग तिसऱ्या वर्षी 2 कोटीहून अधिक रक्कम मिळवताना प्रो कबड्डी लीगच्या 12 व्या मोसमासाठी पार पडलेल्या लिलावाचा सर्वोच्च मानकरी ठरण्याचा मान मिळवला. गेल्या मोसमातील मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर हा मान मिळवणाऱ्या शादलुईला गुजरात जायंटस संघाने 2.23कोटी रुपयांना खरेदी केले. सलग तिसऱ्या वर्षी हा मान मिळवणारा तो पहिलाच खेळाडू ठरला. देवांक दलाल हा 2कोटी हून अधिक रक्कम मिळवणारा दुसरा खेळाडू ठरला. गेल्या मोसमात सर्वोत्तम चढाई पटू ठरलेल्या देवांकला बेंगाल वॉरियर्स संघाने 2.205कोटी रुपयांना खरेदी केले. पीकेएल इतिहासातील तो पाचव्या क्रमांकाचा सर्वात महागडा खेळाडू ठरला. पीकेएल 12व्या मोसमाच्या लिलावात फायनल बीड मॅच(एफबीएम) हा नियम लक्षवेधी ठरला. या नियमानुसार कोणत्याही संघाला त्यांनी रिलीज केलेला खेळाडू एक किंवा दोन मोसमासाठी त्याच्या अंतिम लिलाव रकमेला पुन्हा खरेदी करता येणार आहे. या नियमाचा वापर करून दबंग दिल्ली के. सी. संघाने आपला स्टार चढाई पटू आशू मलिकला पुढच्या दोन मोसमांसाठी 1.90कोटी रुपयांना पुन्हा खरेदी केले. अ गटातील सर्वाधिक किंमत मिळालेल्या अन्य खेळाडूंमध्ये तमिळ थलाइवाज संघाने अर्जुन देशवाल याला 1.405कोटी रुपयांना खरेदी केले. तर, बेंगळुरू बुल्स संघाने योगेश दहियाला 1.125कोटी रुपयांना खरेदी केले.

## डी गुकेशच्या डावपेचात अडकला!

**नवी दिल्ली:** विश्वविजेत्या डी गुकेश याने नॉर्वे ओपन स्पर्धेत क्लासिकल डावात जागतिक क्रमवारीतील अव्वल मॅग्नस कार्लसनचा पराभव केला. डी गुकेशचे डावपेच ओळखण्यात अपयशी ठरल्यानंतर कार्लसनला राग अनावर झाला अन् चेक-मेट होताच त्याने राग टेबलवर काढला. त्याने जोरात टेबलवर हात आपटला आणि त्यामुळे पटावरील सर्व सोंगट्या पडल्या. आपली चूक लक्षात त्याने त्याने लगेच त्या सोंगट्या व्यवस्थित केल्या आणि गुकेशला हात मिळवून तिथून निघून गेला. नॉर्वे ओपनच्या सहाव्या फेरीत गुकेशने हा विजय मिळवला. क्लासिकलमध्ये गुकेशचा हा कार्लसनवरील पहिलाच विजय ठरला. क्लासिकल प्रकारात कार्लसनला हरवणे ही खूप मोठी गोष्ट आहे, कारण या प्रकारात त्याचा दबदबा सर्वांना माहीत आहे. पण, काल ३४ वर्षीय कार्लसनकडून काही चुका झाल्या आणि त्याचा गुकेशने फायदा उचलला. घरच्या चाहत्यांसमोर झालेला पराभव पचवणे कार्लसनला अवघड झाले होते. दरम्यान, भारताच्या अर्जुन एरोगेसी याने शनिवारी झालेल्या लढतीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या अमेरिकेच्या हिकारु नाकामुरा याला पराभवाचा धक्का दिला. या विजयासह अर्जुन याने सहा गुणांसह नावें बुद्धिबळ स्पर्धेमध्ये चौथे स्थान पटकावले आहे. मॅग्नस कार्लसन यनि ९.५ गुणांसह पहिले स्थान कायम राखले आहे.

## पीएसजीची 'पंचतारांकित' विजेतेपदावर मोहर

**नवी दिल्ली :** लुईस एनरिक यांच्या मार्गदर्शनात पॅरिस सेंट जर्मेन (पीएसजी) क्लबने शनिवारी मध्यरात्री फुटबॉलच्या रणांगणात ऐतिहासिक कामगिरी केली. फ्रान्सच्या पीएसजी क्लबने इटलीच्या इंटर मिलान क्लबचा ५०० असा धुव्वा उडवत पहिल्यांदाच चॅम्पियन्स लीग या प्रतिष्ठेच्या फुटबॉल स्पर्धेच्या अजिंक्यपदावर मोहर उमटवली. याआधी २०१९-२० मध्ये बायर्न म्युनिच संघाकडून पराभूत झाल्यामुळे पीएसजी क्लबला चॅम्पियन्स लीग स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यंदा मात्र त्यांनी विजेतेपदाला गवसणी घालण्याचे स्वप्न पूर्ण केले. २०२३ नंतर इंटर मिलान क्लबला पुन्हा उपविजेतेपदच मिळाले. १९ वर्षीय डेसिरे हुए याने पीएसजीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. पीएसजीने केलेल्या पाचपैकी दोन गोल त्याने केले. चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत गोल करणारा तो तिसरा युवा खेळाडू ठरला. डुएचे सध्याचे वय १९ वर्षे व ३६२ दिवस आहे. याआधी एजाक्स क्लबसाठी पॅट्रिक क्लूवर्ट याने व पोर्टो क्लबसाठी कार्लोस अॅल्बर्टो याने कमी वयामध्ये गोल करताना दमदार कामगिरी केली होती.

## छत्रपती संभाजी, विश्व टायगर्स संघ उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट संघटने तर्फे आयोजित आणि ऑक्सिरीच पुरस्कृत 'पिंपरी चिंचवड प्रीमीअर लीग' (पीसीपीएल) टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत छत्रपती संभाजी किंग्ज् आणि विश्व टायगर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला आहे.

हिंजवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सईश शिंदे याने केलेल्या अष्टपैलु कामगिरीच्या जोरावर छत्रपती संभाजी किंग्ज्ने मोरे पाटील पॅकर्सचा २६ धावांनी पराभव करून आगेकूच केली. पहिल्यांदा फलंदाजी करताना छत्रपती संभाजी किंग्ज्ने २० षटकामध्ये १३४ धावांचे लक्ष्य उभे केले. कृष्णा चौधरी याने ४६ धावांची तर, सईश शिंदे (२८ धावा) आणि अथर्व भोसले (२२ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. मोरेपाटील



संघाच्या सार्थक गायकवाड याने तीन गडी बाद केले. या आव्हानाला उत्तर देताना मोरे पाटील पॅकर्सचा डाव १०८ धावांवर संपुष्टात आला. तिलक जाधव (३२ धावा) आणि समर्थ जगताप (२८ धावा) यांनी धावा करून प्रतिकार केला. छत्रपती संभाजी किंग्ज्कडून अक्षय डावखरे याने तीन गडी बाद केले. सईश शिंदे आणि विशाल गव्हाणे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाचा विजय निश्चित केला. दुसऱ्या सामन्यामध्ये अमेश शेवळे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे बंट्स वॉरीयर्स संघाने असवानी डेअरडेव्हिल्स्चा १६ धावांनी पराभव केला.

## बॅडमिंटन स्पर्धेत आराध्या जोशी, शौर्या भुजबळ, अर्चित, शौनक यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रायसोनी फाऊंडेशन पुरस्कृत योनेक्स सनराइज जीएच रायसोनी मेमोरियल पुणे जिल्हा सुपर 1000 बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत आराध्या जोशी, शौर्या भुजबळ, अर्चित खान्देशे, शौनक केळकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

शिवाजीनगर येथील पीडीएमबीए बॅडमिंटन हॉलमध्ये आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत 15 वर्षाखालील मुलींच्या गटात पात्रता फेरीत आराध्या जोशीने मिताक्षी डेरेचा 15-09, 15-17, 16-14 असा कडवा प्रतिकार केला. शौर्या भुजबळ याने शौर्य मानेचा 15-07, 15-02 असा तर, अनिका बनकेने अनन्या बाबरचा 15-12, 15-12 असा पराभव केला.





13 वर्षाखालील मुलांच्या गटात रुद्र गाडगीळ याने अद्वैय केळकरला 15-13, 13-15, 15-13 असे पराभुत केले.

अजिंक्य शिंदेने कोविद करंदीकरवर 14-16, 15-06, 15-12 असा विजय मिळवला. अर्चित खान्देशेने शौनक अटळेला 15-08, 15-07 असे नमविले. शौनक केळकरने विवान सिंगचा 15-03, 15-05 असा पराभव केला. स्पर्धेत जिल्ह्यातून 1750 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे.

## राष्ट्रीय धनुर्धर गाथा दिपाली खडके हिची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टेंभुर्णीतील राष्ट्रीय धनुर्धर गाथा दिपाली खडके हिची कॅनडा येथे होणाऱ्या वर्ल्ड आर्चरी युथ चॅम्पियन्सशिप 2025 या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. गाथा खडके हिची पुणे येथील आर्मी स्पोर्ट इन्स्टिटयूटच्या मैदानावर झालेल्या निवड चाचणी स्पर्धेत संपूर्ण भारतात अव्वल स्थान पटकाविल्याने तिची या स्पर्धेकरिता निवड झाली आहे. 17 ते 24 ऑगस्ट 2025 दरम्यान विनिपेग कॅनडा येथे ही स्पर्धा होणार आहे.

गाथा खडके हिने अवघ्या वयाच्या सातव्या वर्षी 2017 मध्ये आर्चरी खेळण्यास सुरूवात केली. उत्तराखंड येथे झालेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत दोन सुवर्णपदक पटकावली आहेत. सन 2024 मध्ये झारखंड येथे झालेल्या 44 वी वरिष्ठ राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सांघिक मध्ये कांस्यपदक पटकावले आहे. सन 2023 मध्ये गुजरात राज्यातील शालेय राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सांघिक मध्ये रौप्यपदक पटकावले आहे.

सन 2024 मध्ये गुजरात राज्यात झालेल्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सांघिकमध्ये सुवर्ण पदक मिळविले आहे. धाराशिव येथील राज्यस्तरीय शालेय क्रिडा स्पर्धेत तिने सुवर्णपदक मिळविले आहे. गाथा खडके हि टेंभुर्णीतील ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ आनंदराव खडके व डॉ. दिपाली खडके यांची कन्या असून आर्चरी मध्ये नेत्रदीपक कामगिरी केली आहे.तिने टेंभुर्णी शहरास आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवून दिला आहे. आतापर्यंत राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय स्पर्धेत अनेक सुवर्णपदक, रौप्यपदक व कांस्यपदक प्राप्त केली आहेत.

स्पोर्ट्स डिरेक्टर एस. पी. कॉलेज पुणे आर्चरी अकॅडमी चे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रा. रणजित



चामले, त्यांचे सहकारी राम शिंदे, विशाल डुमणे, मयांक गोडसे, तसेच टेंभुर्णीतील सह्याद्री आर्चरी अकॅडमीचे राष्ट्रीय कोच सागर सावंत, महाराष्ट्र आर्चरी संघाचे उपाध्यक्ष हरिदास रणदिवे, राष्ट्रीय प्रशिक्षक सावता घाडगे याचे गाथा खडके हिला मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल गाथा आनंदराव खडके हिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## रोहन बोपण्णा, युकी भांब्रीचे आव्हान संपुष्टात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय टेनिसपटूंसाठी फ्रेंच ओपन या टेनिस ग्रँडस्लॅममधील रविवारचा दिवस निराशाजनक ठरला. रोहन बोपण्णा - अॅडम पावलासेक व युकी भांब्री - रॉबर्ट गॅलोवे या दोन्ही जोड्यांचा पुरुष दुहेरीत पराभव झाला. यामुळे त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

भारताचा रोहन बोपण्णा व त्याचा साथीदार अॅडम पावलासेक या जोडीला फ्रेंच ओपन या टेनिस ग्रँडस्लॅममध्ये निराशेचा सामना करावा लागला. फिनलँडचा हॅरी हेलिओवारा व ग्रेट ब्रिटनचा हेन्री पॅटेन या जोडीने सरळ दोन सेटमध्ये रोहन-अॅडम जोडीला पराभूत करीत पुढे पाऊल टाकले. हॅरी हेलिओवारा-हेन्री पॅटेन या जोडीला फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत दुसरे मानांकन देण्यात आले.


पहिल्या सेटमध्ये हॅरी-हेन्री या जोडीने ५-१ अशी आघाडी घेत दमदार सुरुवात केली. यानंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. पहिला सेट त्यांनी ६-२ असा आपल्या नावावर केला. दुसऱ्या सेटमध्ये दोन्ही जोड्यांमध्ये कडवी झुंज रंगली; पण हॅरी-हेन्री या जोडीने दबावाखाली आपला खेळ उंचावला आणि ७-६ असे यश मिळवले. सी. हॅरिसन व इ किंग या जोडीने युकी भांब्री व रॉबर्ट गॅलोवे या जोडीवर ६-४, ६-४ अशी सरळ दोन सेटमध्ये मात केली. युकी - रॉबर्ट या जोडीचा एक तास व १७ मिनिटांमध्ये पराभव झाला.

## स्विमिंग लीग २०२५ स्पर्धेत कट्क्कर शार्क्स संघ आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित पहिल्या पीवायसी लोहिया जैन मालपाणी स्विमिंग लीग स्पर्धेत कट्क्कर शार्क्स संघाने दिवस अखेर 63 गुणांसह भक्कम अशी आघाडी मिळवली आहे.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या स्विमिंग पूल या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत कट्क्कर शार्क्स संघाने 63 गुणांसह आघाडी प्राप्त केली. तर, एलजेएम ऍक्वा वॉरियर्स संघ 45 गुणांसह दुसऱ्या स्थानी आहेत. एससीज ऍक्वा टायटन्स संघ 43 गुणांसह तिसऱ्या स्थानी असून बेलवलकर बेलुगस संघ 39 गुणांसह चौथ्या स्थानी आहेत.



50मी. ब्रेस्ट स्ट्रोक 16 ते 30 वर्षाखालील गटात टायटन्सच्या अभिषेक गोडबोले याने(38.13से) वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. तर, बेलुगसच्या मिहिर विंझे (41.33से), वॉरियर्सच्या नील गोवईकर(41.25से) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. 50मी. फ्री स्टाईल 16 ते 30 वर्षाखालील गटात डॉल्फिन्सच्या पार्थ सूर्दीकर(32.00से) वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. तर, वॉरियर्सच्या इंद्रसेन माने(33.53से) याने दुसरा आणि , वॉरियर्सच्या पार्थ केळकर(34.74से) याने तिसरा क्रमांक पटकावला. 50मी. ब्रेस्ट स्ट्रोक 31 ते 45 वर्षाखालील गटात शार्क्सच्या विश्वेश कटक्कर(38.22से) याने पहिले स्थान मिळवले. याच गटात फ्री स्टाईल प्रकारात शार्क्सच्या श्रीनिवास चाफळकर याने 29.67सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक मिळवला.

### आठवी 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धा

## मॅथ्युज् फुटबॉल अॅकॅडमी संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आठव्या 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धेत मॅथ्युज् फुटबॉल अॅकॅडमी संघाने १५ वर्षाखालील गटाचे विजेतेपद संपादन करून मुकूट पटकावला.

बावधन येथील हॉटफुट अॅकॅडमीच्या मैदानावर १५ वर्षाखालील गटामध्ये झालेल्या अंतिम गटसाखळी सामन्यामध्ये रोनित मेनन याने केलेल्या एकमेव गोलामुळे स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीने कॉन्शस् स्पोर्टस् पुणे संघाचा १-० गोल असा पराभव



केला. पार्थ शिंदे याने केलेल्या दोन गोलांच्या कामगिरीमुळे मॅथ्युज् फुटबॉल अॅकॅडमीने फाल्कन्स् फुटबॉल अॅकॅडमीचा २-० असा पराभव केला. स्पर्धेत मॅथ्युज् फुटबॉल अॅकॅडमीने १४ विजय, एक पराभव अशा कामगिरीसह ४२ गुणांसह अव्वल क्रमांक मिळवून विजेतपद संपादन केले. स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीने १३ विजयांसह दोन ड्रॉ अशा कामगिरीसह ४१ गुणांसह दुसरा क्रमांक मिळवून उपविजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुणे हॉटफुटचे मुख्य (ऑपरेशन) इवॅन डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संयोजक केतन सरोदे, सहभागी संघांचे प्रशिक्षक, खेळाडू आणि पालक उपस्थित होते.

#रा